|| जय माता जी ||



|| माता वारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १४ | अंक : ८ | सोमवार दि. ९ मार्च २०२६ ते रविवार दि. १५ मार्च २०२६ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड


## वासनांध नराधमासमोर नाही झुकली अब्रू वाचवताना अखेर प्राणास मुकली

पुणे : क्राईम रिपोर्टर

दिवेघाट परिसरातच रस्त्याच्या कडेला झोपणाऱ्या महिलेवर लैंगिक अत्याचाराला विरोध केल्याने निघृण खून केल्याची धक्कादायक घटना पुण्यात घडली आहे. हडपसर-सासवड रस्त्यावरील दिवेघाटाच्या पायथ्याशी ही घटना घडली असून पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. ३ मार्च रोजी दिवेघाटाच्या पायथ्याशी एका अनोळखी महिलेचा अर्धनग्न अवस्थेतील मृतदेह आढळून आला होता. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली होती. या प्रकरणी फुरसुंगी पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल ...पान २ वर

## ज्यांना जन्माला घातले त्यांनीच म्हातारपणी केला घात आई वडिलांच्या रक्ताने माखले दोन सख्ख्या भावांचे हात





श्रीवर्धन : क्राईम रिपोर्टर

विज्ञान युगात माणसाने किती जरी प्रगती केलेली असली तरी त्याच्यातली माणुसकी संपलेली असल्याने आजकाल त्याला नात्यागोत्याची सुद्धा ओळख राहिलेली नाही. आणि पैशांमुळे सर्वकाही विकत घेता येत असल्याने पैसा आणि धन संपत्तीसाठी माणूस रक्ताच्या नात्याचाही विचार करीत नाही. ज्या आई-वडिलांनी जन्माला घातले स्वतः काबाडकष्ट करून मुलाला त्याच्या पायावर उभे केले, तो मुलगा आई वडिलांच्या म्हातारपणी त्यांचा आधार बनण्याऐवजी त्यांच्या जीवावर उठतो, हा प्रकारच भयंकर आहे. मुलांच्या याच कृतघ्न पणामुळे आज अनेक वृद्धांना त्यांच्या आयुष्यातील अखेरचे क्षण बेवारसपणे वृद्धाश्रमात घालवावे लागत आहेत. तर काही मुलांचा आई-वडिलांच्या संपत्तीवर डोळा असल्याने आपल्या जन्मदात्यांचा घात करायलाही ते मागे पुढे पाहत नाहीत. त्यामुळे सध्याच्या काळात आई वडिलांचा मुलांवर विश्वास राहिलेला नाही. आपला मुलगा कधी आपल्यासाठी काळ बनून आपला जीव घेईल याची व्रिध आई-वडिलांना शाश्वती राहिलेली नाही. त्यामुळे वृद्धाश्रम हेच वयोवृधांसाठी सुरक्षित ठिकाण बनले आहे. कारण आई वडिलांच्या संपत्तीवर डोळा असलेली मुले कधी जीव घेतील याचा नेम नाही. तशा घटनाही घडत आहेत. रायगड जिल्ह्याच्या म्हसळा तालुक्यातील मेंडदी गावात संपत्तीच्या वादातून दोन सख्ख्या भावांनी त्यांच्या वृद्ध आई वडिलांची हत्या केली. या घटनेने संपूर्ण रायगड जिल्ह्यात मोठी खळबळ माजली असून पोलिसांनी आरोपी भावना अटक केली आहे.

रायगड जिल्ह्याच्या म्हसळा तालुक्यात माणुसकीला काळिमा फासणारी घटना घडली आहे. इथं दोन भावांनी आपल्या वयोवृद्ध आईवडिलांची निर्घृण हत्या केली आहे. संपत्तीवरून झालेल्या वादानंतर आरोपींनी संगनमत करून जन्मदात्यांना संपवलं आहे. दुहेरी हत्याकांडाची ही घटना उघडकीस येताच परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे. घटनेचा पुढील तपास केला जात आहे. ही घटना रायगड जिल्ह्यातील म्हसळा तालुक्यातील मेंदडी गावात घडली. दोन सख्ख्या मुलांनीच मालमत्तेच्या वादातून आई वडिलांची हत्या केल्याचं समोर आलं आहे. शनिवारी घरामध्ये वृद्ध दाम्पत्याचे मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळून आले. पोलिसांनी या घटनेचा तपास सुरू केला असता मुलांनीच ही हत्या केल्याचं समोर आलं आहे. मृत महादेव बाळ्या कांबळे (९५) व त्यांच्या पत्नी विठाबाई महादेव कांबळे (८३) असं मयत दाम्पत्याचं नाव आहे. ते मेंदडी गावातील रहिवासी होते. त्यांची दोन मुले नरेश महादेव कांबळे (६३) चंद्रकांत महादेव कांबळे (६०) ही वृद्ध आईवडिलांना ...पान २ वर

## अनैतिक संबंध सर्वांना कळले पतीने पत्नीला जिवंत जाळले





नाशिक : ललित खरे

मुलगा आणि मुलगी यात आजकाल कुणी भेदभाव करीत नाहीत. पण काही जुन्या विचारांच्या लोकांना खास करून ग्रामीण भागातील जनतेत मुलगा हाच संसाराचा दिवा आहे असे समजले जाते. त्यामुळे त्यांना मुलगा हवा असतो. अशावेळी मुलीला जन्म देणाऱ्या सुनेचा सासरच्या लोकांकडून छळ केला जातो. कळवण येथे असेच झाले. पूजाने मुलीला जन्म दिल्यापासून सासू सासरे आणि पतीही तिचा छळ करू लागला. त्यातच पतीचे दुसऱ्या महिलेशी अनैतिक संबंध जुळले हि बाब पूजाने तिच्या वडिलांना सांगताच त्यांनी जावयाच्या प्रेयसीला धमकावले. आपल्या सासऱ्याने आपल्या प्रेयसीला धमकावल्याचे पूजाच्या पतीला आवडले नाही आणि एके रात्री पतीसह सर्वांनी मिळून पुजाला जिवंत जाळून मारले. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.

शिर्डी, ता. राहाता येथील पूजा हिचा विवाह दि. २५ नोव्हेंबर २०२३ रोजी सुरज हरिचरण छजलाणी याच्याबरोबर झाला आणि ती नाशिक जिल्ह्यातील कळवण तालुक्यामध्ये नांदावयास आली. तिच्या या सासरच्या कुटुंबात पती सुरज, सासू शांताबाई आणि विवाहित नणंद योगिता उर्फ बबली असे रहावयास होते. नव्याचे नऊ दिवस याप्रमाणे विवाहानंतर पूजाला तिच्या सासरच्या लोकांनी चांगली वागणूक दिली. वर्षभरातच तिला एक मुलगी झाली. तिचे नाव क्रितीका असे ठेवण्यात आले. सासरच्या लोकांना खरे म्हणजे पूजाकडून पहिले अपत्य मुलगा हवा होता, पण तिला मुलगी झाली. मुलगा-मुलगी जन्माला येणं काही मनुष्याच्या हातात नसतं, असं असलं तरी आजचा करंटा समाज सारा दोष नवविवाहितेवर लावतो. जसे काही तिनेच मुलगी मागून घेतली आहे. पूजाचे सासरचे लोक यापेक्षा वेगळे नव्हते. पूजाची सासू व नणंद आता तिला करंटी समजू लागली. 'आम्हाला मुलगा पाहिजे होता. तुला तर मुलगी झाली. तू करंटी आणि दलिंदर आहेस.' असे म्हणून सर्व जण तिला शिवीगाळ करत असत. एवढेच नव्हे तर तिला आता ते 'तुला काम व्यवस्थित येत नाही. तुझ्या आई-वडीलांनी लग्नात आम्हाला मान-पान दिला नाही.' असेही म्हणू लागले. तिचा नवरा सुरजही यामध्ये पुढाकार घेवू लागला. इतकेच नव्हे तर तिला मारहाणही करू लागला. उपाशीपोटी ठेवून तिचा मानसिक व शारिरीक ...पान २ वर

## नव्याने संसार मांडण्यास दिला नकार चिडलेल्या पतीनेच पत्नीला केले ठार



मुंबई : क्राईम रिपोर्टर

पती पत्नी मधील वाद वेळेवर मिटले नाहीत, तर त्यातून पुढे काहीही घडू शकते. खास करून एकदा तुटलेला संसार पुन्हा जोडणे वाटते तितके सोपे नसते. कौटुंबिक वादामुळे ठाण्यातील राजेश छेत्री आणि त्याची पत्नी एकमेकांपासून वेगळे राहत होते. मात्र राजेशला पुन्हा पत्नी सोबत एकत्र राहायचे होते. पण तिने नकार दिला. त्यामुळे चिडलेल्या राजेशने भर रस्त्यात चाकूचे वार करून पत्नीची हत्या केली.


मुंबईच्या उपनगरातील अंधेरी पूर्व येथील मरोळ परिसरात शुक्रवारी भरदिवसा एका पतीने आपल्या पत्नीची चाकूने सपासप वार करून निर्घृण हत्या केली. या थरारक घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून एमआयडीसी पोलिसांनी आरोपी ...पान २ वर

## इन्स्टाग्रामवरील 'लव्ह स्टोरी'ची शोकांतिका झाली प्रेयसीची हत्या करून प्रियकरानेही आत्महत्या केली

जळगाव : क्राईम रिपोर्टर

पूर्वी शाळा कॉलेजात प्रेमाचे अंकुर फुलायचे, पण आता सोशल मिडीयावरील फेसबुक, व्हॉट्सअॅप आणि इंस्टाग्रामच्या माध्यमातून दोन ओळख होते आणि त्यातून प्रेमाची बीजे रुजतात. आश्चर्याची गोष्ट म्हणजे सोशल मिडीयाच्या माध्यमातून केवळ अविवाहितच नव्हे तर विवाहित स्त्री पुरुषामधेही अनैतिक नाती जुळतात. जळगाव जिल्ह्यातील अकुलखेडा येथील २ मुलांची आई असलेल्या अनिता हिचे इन्स्टावरून देवानंद धनगर नावाच्या इसमाशी अनैतिक संबंध जुळले आणि दोघांमध्ये चॅटिंग सुरु झाली. हि गोष्ट अनिताच्या पतीला समजली आणि त्याने तिला चांगलेच धारेवर धरले. त्यामुळे यापुढे आपण असे वागणार नाही असे तिने पतीला सांगितले आणि तेंव्हा पासून ती देवानंदला टाळू लागली. अनिता आपल्याला वेळ देत नाही हे पाहून तो चिडला आणि एके दिवशी त्याने तिच्या घरी जावून तिची हत्या केली आणि स्वतःही आत्महत्या केली.







चोपडा या तालुक्याच्या गावापासून काही अंतरावर अकुलखेडा हे गाव आहे. या गावी जगदीश काशिनाथ पाटील हा अवघा ३४ वर्ष वयाचा तरुण राहतो. मुळ निमगव्हाण येथील रहिवासी असलेल्या जगदीश पाटील याचे वयाच्या विसाव्या वर्षी लग्न झाले. योग्य वेळी योग्य वयात जगदीश पाटील या तरुणाचे अनिता या अठरा वर्षाच्या तरुणीसोबत विवाह झाला. योग्य वयात विवाह झालेल्या जगदीशचे वैवाहीक जीवन सुखात सुरु होते. ...पान २ वर

## भांडणात मध्यस्थी करून फसला उमेशकुमार जीव गमावून बसला



कोल्हापूर : क्राईम रिपोर्टर

आजकाल कुणाच्या भांडणात मध्यस्थी करू नये. कारण ज्यांची भांडणे झालेली असतात ते चिडलेले असल्याने मध्यस्थी करणाऱ्याचा त्यांना राग येतो आणि रागाच्या भरात त्यांच्या हातून काहींही घडू शकते. कोल्हापूरच्या कागलमध्ये असेच घडले. परप्रांतीय कामगारांच्या भांडणात मध्यस्थी करायला गेलेल्या उमेश कुमार या कामगाराला आपला जीव गमवावा लागला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

कोल्हापुर जिल्हयातील मोठी पंचतारांकित इंडस्ट्री म्हणून कागल एमआयडीसीला ओळखले जाते. या एमआयडीसीत अनेक परप्रांतीय मजुर कामाला आहेत. उत्तरप्रदेश राज्यातील नवेरिगा जिल्हयतील श्रीवस्ती गावातील उमेशकुमार बरसाती कुमार हा तरूण गोकुळ शिरगाव एमआयडीसीतील एका कारखान्यात कामाला आहे. तो आणि त्याचा गावाकडचा मित्र सत्यकुमार श्रीराजाराम ...पान २ वर

## जमीन जाण्याच्या भीतीने पती कासावीस झाला अखेर मित्राच्या मदतीने त्याने पत्नीचा गेम केला

धारवाड (कर्नाटक) : क्राईम रिपोर्टर



पती पत्नीतील वाद न्यायालयात गेला कि निकालाबाबत धास्ती असते. त्यामुळे काही लोक निकालाच्या अगोदरच पुढे काय करायचे याची तयारी करून ठेवतात. कर्नाटकातील अमीनभावीमध्ये राहणाऱ्या उदय आणि ललिता यांच्यातील वाद कोर्टात गेला होता. ललीताने घटस्फोटासाठी न्यायालयात धाव घेतली आणि पतीच्या जमिनीतील २ एकर बागायती जमीन आपल्याला मिळावी अशी मागणी केली. न्यायालयातील सुनावणी पूर्ण झाली होती. निकाल यायचा बाकी होता. पण निकाल आपल्या विरोधात गेला तर आली जमीन जाईल या भीतीने धास्तावलेल्या उदयने निकालापुर्वीच पत्नीची हत्या करून अपघाताचा बनाव केला. पण त्याच्या गाडीच्या बाजूने जाणाऱ्या कर्नाटकच्या एसटी बसमधील डॅशबोर्डवरील कॅमेऱ्याने ललिताच्या अपघाताची बातमी टिपली आणि तो अपघात नसून खून होता हे सिद्ध झाले. त्यामुळे उदयने केलेला बनाव फसला आणि सर्व आरोपींना अटक झाली.



धारवाड जिल्हयातील सौंदती बेळगावी बैलहोंगल रोडवरील अमीनभावी गावातील उदय हतरगी याचा विवाह सोमपुर येथील ललिता हिच्याशी सन २०००मध्ये झाला. सुरूवातीला त्यांचा संसार छान सुखाने चालला. उदय हतरगी याच्या घरची परिस्थीती तशी सधन असल्याने घरात कोणत्याच गोष्टीची कमतरता नव्हती. लग्नानंतर या दाम्पत्यांना दोन मुले झाली. घरची परिस्थीती सधन असल्याने उदयच्या खिशात नेहमी पैसे खणखणत होते. त्यातूनच त्याला दारूचे व्यसन लागले. सुरूवातीला कमी दारू पिणारा उदय नंतर नंतर जास्तच दारू पिऊ लागला. घरात दारू पिऊन आला की त्याचे पत्नी ललिताशी नेहमी भांडण तंटा होऊ लागला. ...पान ६ वर

## चारित्र्याचा संशय काळ ठरला पतीनेच पत्नीचा गळा चिरला



गोवा (म्हापसा) : क्राईम रिपोर्टर

पती पत्नी मधील वाद हे प्रामुख्याने घरातील आर्थिक बाबीवरून किंवा चारित्र्याच्या संशयावरून होत असतात. संसाराला लागणाऱ्या गरजांसाठी आवश्यक असलेले पैसे जेंव्हा पतीकडून मिळत नाही केंव्हा पती कारण नसताना पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेतो आणि दारू पिवून तिला मारहाण करतो. तेंव्हा चिडलेली पत्नी आपल्या पतीचा जराही मुलाहिजा ठेवत नाही. त्यातून दोघांमधील वाद वाढतात. विनोद आणि रुक्मिणी हे जोडपे मुळचे कर्नाटकातील होते. पण कामानिमित्त गोव्यात आले. मात्र विनोदला दारूचे व्यसन लागले. त्यातच तो पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेवू लागला. त्यामुळे दोघांमध्ये भांडे होऊ लागली आणि याच भांडणात एके दिवशी विनोदने पत्नीची गळा चिरून हत्या केली आणि स्वतःहून पोलिसांसमोर हजर झाला.

कर्नाटकातील गदग जिल्हयातील लहानशा ...पान ६ वर

## जमिनीच्या वाटणीचे केवळ निमित्त ठरले धाकट्या भावाने थोरल्याला ठार मारले



निलंगा : शकील मनियार

ग्रामीण भागात शेती हेच प्रामुख्याने उत्पनाचे साधन असल्याने माणूस जमिनीच्या तुकड्यासाठी कोणत्याही थराला जातो अगदी रक्ताची नाती सुद्धा ओळखत नाही. लातूर जिल्ह्याच्या निलंगा तालुक्यातील रामलिंग मुदगड येथे राहणाऱ्या उल्हास खरोसे याला जमिनीची वाटणी हवी होती. पण बाप ऐकत नव्हता. आपल्या बापाला आपला मोठा भाऊ गुलाब हाच आपल्या विरुद्ध फितवतो, त्यामुळे बाप जमिनीची वाटणी करीत नाही असे उल्हासला वाटत होते आणि याच संशयातून त्याने मोठ्या भावाची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी उल्हासला अटक केली आहे.

कासार शिरशी पोलीस ठाणे हद्दीतील मौजे रामलिंग मुदगड शिवारातील असलेल्या एका पाणी कालव्यात पुरुष जातीचा मृतदेह आढळून आला असून त्या मृतदेहावर मोटर सायकल पडली असल्याची माहिती कासार शिरशी पोलीस ठाण्यात येऊन धडकली. घटनेची माहिती मिळतात कासार शिरशी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक



प्रवीण राठोड यांनी घटनेचे गांभीर्य ...पान ६ वर

09 TO 15 MARCH 2026 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 3/7/2026 8:10 PM Page 1



पान १ वरून....

## वासनांध नराधमासमोर नाही ...

करण्यात आला होता. फुरसुंगी पोलीस आणि गुन्हे शाखेकडून या गुन्ह्याचा समांतर तपास सुरू होता. तपासादरम्यान परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी प्रकाश बिभीषण माने (वय २९, रा. वडकी नाला, ता. हवेली, जि. पुणे) याला ताब्यात घेतले. पोलिसांनी केलेल्या चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. आरोपी प्रकाश माने हा एका खाजगी कंपनीत सुपरवायझर म्हणून काम करत आहे. ज्या परिसरात तो काम करत होता, त्याच परिसरात ही महिला मागील काही दिवसांपासून फिरत होती. ती दिवेघाट परिसरातच रस्त्याच्या कडेला झोपत असे. तेव्हापासून आरोपीची तिच्यावर नजर होती. रविवारी रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास आरोपीने दिवेघाटाच्या पायच्याशी त्या महिलेला गाठले. त्याने तिच्यासोबत जबरदस्तीने शरीर संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला. मात्र महिलेने त्याला विरोध करत आरडाओरडा सुरू केला. त्यामुळे आपला भांडाफोड होईल या भीतीने आरोपीने संतापाच्या भरात तिच्या डोक्यात दगड घातला आणि त्यानंतर गळा आवळून तिचा खून केला, अशी माहिती पटलेली नाही. तिचे वय अंदाजे ३० ते ४० वर्षे असल्याच पोलिसांनी सांगितले हीकारवाई गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त निखिल पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. युनिट सहा चे पोलीस निरीक्षक सुदर्शन गायकवाड तसेच पोलीस कर्मचारी तानाजी देशमुख, प्रमोद टिळेकर, बाळासाहेब सकटे आणि त्यांच्या पथकाने आरोपीला अटक केली.

## ज्यांना जन्माला घातले त्यांनीच...

घरखर्चासाठी पैसे देत नसल्याने, आईवडिलांनी त्यांना घरात येण्यास बंदी घातली होती. त्याचवेळी मालमत्ता आईवडिलांच्या नावे होती. त्यामुळे वाटणीवरून आईवडिलांचे व मुलांचे वाद झाले होते. याच वादातून नरेश आणि चंद्रकांत या दोन मुलांनी आईवडिलांची गळा दाबून हत्या केली आणि घरातून पोबारा केला. शनिवारी सायंकाळी घरातून दुर्गंधी येऊ लागल्यानंतर शेजाऱ्यांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी वृद्ध दाम्पत्याचे मृतदेह ताब्यात घेत तपास केला. घटनास्थळी फॉरेन्सिक पथक, डॉग स्क्वाड व फिंगरप्रिंट तज्ज्ञांना पाचारण केले. तपासात मुलांनीच हत्या केल्याचं समोर आलं. पोलिसांनी दोन्ही आरोपी मुलांना अटक केली आहे.

## अनैतिक संबंध सर्वांना कळले...

छळ करू लागला. पूजाचा छळ होवू लागला होता. ती साऱ्या गोष्टी माहेरी सांगेल म्हणून तिला माहेरच्या लोकांशी फोनवरून बोलण्यासही बंदी घालण्यात आली. त्यातूनही ती फोनवरून बोलली तर तिला शिवीगाळ करत मारहाण करायचे. याबाबत पूजाने माहेरच्या लोकांकडे त्यांच्याविषयी तक्रारी केल्या होत्या. एके दिवशी पूजाला पती सुरजचा मोबाईल पहावयास मिळाला असता तिच्या लक्षात आले की तिचा नवरा सुरज याचे नाशिक येथील एका गीता नामक महिलेसोबत अनैतिक संबंध आहेत. ते पाहून तिच्या पायाखालची वाळूच सरकली होती. ती खूप दुःखी झाली. पूजाने याबाबत सुरजला विचारणा केली असता त्याने तिला शिवीगाळ केली. 'तू माझ्या अनैतिक संबंधाविषयी तुझ्या माहेरकडील लोकांना काही सांगितले तर तुला जिवंत सोडणार नाही. तू आत्महत्या करून घे. म्हणजे मला गीताबरोबर संसार करता येईल,' असे म्हणत तिला दमदाटी करत असे. या अनैतिक संबंधावरून सुरज हा पूजाशी भांडण करून तिला शिवीगाळ, दमबाजी व मारहाण करून माहेरी हाकलून देत असे. त्यावेळी पूजाचे माहेरचे लोक सुरजला समजावून सांगत तिला पुन्हा सासरी पाठवत असत.सुरजच्या स्वभावात काही फरक पडला नव्हता. त्याचे अनैतिक संबंध सुरूच होते. त्यावरून तो पूजाला त्रास देवून मारहाण करत असे. ही बाब पूजाने वडीलांना सांगितली, तेंव्हा ते चिडले आणि ज्या गीताशी सुरजचे अनैतिक संबंध होते, तिला नाशिकमध्ये जावून गाठले. 'तू सुरजशी असलेले अनैतिक संबंध तोडून टाक नाही तर तुझे कॅके तोडून टाकेन' अशी तिला दमबाजी केली. तिने ही बाब लगेच सुरजला सांगितली, तेंव्हा सुरजने सासऱ्याला दमबाजी केली की तुम्ही तिला काही बोलला तर तुम्हा सर्वांना जाळून मारून टाकेन. दि. २९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास पूजाने आईला फोन केला आणि तिला सांगितले की, माझ्या पतीच्या वागण्यात कुठलाच फरक पडत नाही. ते गीताशी असलेले संबंध तोडत नाहीत. आईला सांगताच तिला हुंदका आवरला नाही. ती फोनवरच रडू लागली. तिचे ते रडणे पाहून आईलाही रडू आवरले नाही. दि. ३० जानेवारी २०२६ रोजी रात्री २.३० वाजता पूजाच्या घराशेजारी रहाणारे अमोल गोयर यांनी पूजाच्या भावाला कळवले की, तुझी बहीण पूजा ही तिच्या घरात पेटली आहे, तरी तुम्ही लवकरात लवकर कळवणला या. हा निरोप मिळताच भावासह सर्व जण हादरले. काहीतरी विपरित घडले आहे अशी भीती त्यांना वाटू लागली. भाऊ बॉबी राजपाल याने आई-वडील, पत्नी व मित्रांना सोबत घेतले आणि तातडीने सर्व जण पहाटेच कळवण येथे निघाले असता त्यांना निरोप मिळाला की पूजाला नाशिक येथे नेण्यात आले आहे. त्याप्रमाणे सर्व जण एका खाजगी हॉस्पिटलमध्ये पोहोचले.त्या हॉस्पिटलमध्ये पूजा. उपचार घेत असतांना तिने भावाला सांगितले की, माझा नवरा सुरज याच्याविरोधात तक्रार करू नको. नाही तर तो माझ्या मुलीला मारून टाकेल. उपचार सुरू असतांना तिची प्रकृती बिघडली. पूजाला नॅशनल बर्न सेंटर, एरोली येथे हलवण्यात आले. तेथे तिच्यावर उपचार सुरू असतांना दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री पावणेआठ ते आठ वाजण्याच्या सुमारास पूजाचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ आणि मृतदेहाचा पंचनामा केला. रूग्णालयात मृतदेहाचे पोस्टमार्टम केल्यावर अंत्यसंस्कारासाठी मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. या प्रकरणी बॉबी अशोक राजपाल रा. शिर्डी, ता. राहाता याने दिलेल्या फिर्यादीवरून कळवण पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. २६/२०२६ नुसार बी.एन.एस. १०८, ८५, ११५ (२), ३५२, २५१ (२), ३५१ (३) व ३ (५) कलमाखाली पती सुरज हरिचरण छजलाणी, सासू शांताबाई हरिचरण छजलाणी, योगिता उर्फ बबली हरिचरण छजलाणी सर्व रा. शिर्डी व प्रेयसी गीता यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक आदित्य मिरेखेलकर, उपअधीक्षक किरणकुमार सुर्यवंशी व पोलीस निरीक्षक खगेंद्र टेंभेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश बोरसे यांनी तपास कामाला गती दिली. गीतासोबत सुरजचे अनैतिक संबंध असल्याने सुरज व पूजाचे रोज भांडण होवू लागले. भांडणात तो तिला अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करून मारून टाकण्याची धमकी देवू लागला. भांडण वाढल्यावर तो तिला मारहाणही करू लागला. कौटुंबिक कलह वाढल्याने आणि पूजा अनैतिक संबंधास सतत विरोध करू लागल्याने त्या रात्री सुरज व पूजाचे कडाक्याचे भांडण झाले आणि त्या भांडणात सुरजने पूजाला जाळल्याचा आरोप तिच्या माहेरच्या लोकांनी केला आहे, तर सुरजचे अनैतिक संबंध आणि सतत होणाऱ्या पैशांच्या मागणीसाठी होत असलेल्या छळाला कंटाळून पूजाने स्वतःला जाळून घेवून आत्महत्या केल्याची माहिती पोलिसांनी दिली. मुलीचा संसार टिकावा म्हणून पूजाच्या माहेरच्या लोकांनी वेळोवेळी सुरजला आर्थिक मदत केली, परंतु पैशाची हाव संपली नाही आणि त्याच्या अनैतिक संबंधामुळे त्रासाला कंटाळून पूजाने आत्महत्या केली. पोलिसांना पती सुरज हा शिक्षक असल्याचे समजले. पोलिसांनी त्याला अटक करून गजाआड केले. सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश बोरसे, हवालदार प्रशांत तिडवे, पुंडलिक डंबाळे, रामदास गवळी, पोपट महाले, पंकज शेवाळे, अशोक ठाक पुढील तपास करत आहेत.

## नव्याने संसार मांडण्यास दिला ...

पतीला अटक केली आहे. कौटुंबिक वादातून पतीनं हे टोकाचं पाऊल उचलले. धारदार शस्त्रानं वार झाल्यानं पत्नी रक्ताच्या थारोळ्यात पडली होती. ही घटना २८ फेब्रुवारी रोजी दुपारी ४:३० वाजताच्या सुमारास मरोळ भागात घडली. आरोपी राजेश छत्रे (४६) हा मूळचा ठाण्याचा रहिवासी असून तो व्यवसायाने रिक्षाचालक आहे. त्याची पत्नी साकीनाका परिसरात राहत होती. कौटुंबिक वादामुळे गेल्या काही काळापासून दोघेही एकमेकांपासून वेगळे राहत होते. २८ फेब्रुवारी रोजी आरोपीने मरोळ भागात पत्नीला अडवले आणि तिला पुन्हा सोबत राहण्याचा आग्रह केला. मात्र, तिने नकार दिल्याने दोघांमध्ये वाद झाला. वादादरम्यान राजेशने पत्नीचा हात पकडून तिला जीवे मारण्याची धमकी दिली आणि स्वतःसोबत आणलेल्या धारदार चाकूने तिच्यावर सपासप वार केले. हा हल्ला इतका भीषण होता की, महिला रक्ताच्या थारोळ्यात कोसळली आणि तिचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी पोलिसांनी तातडीने धाव घेत आरोपीला ताब्यात घेतले. पोलिसांनी घटनास्थळावरून रक्ताने माखलेले कपडे आणि गुन्ह्यात वापरलेले शस्त्र जप्त केले आहे. आरोपीने चाकू आधीच सोबत आणला असल्याने, ही हत्या पूर्वनियोजित असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला असून आरोपी राजेश छत्रे याला अटक करण्यात आली आहे. भरदिवसा घडलेल्या या घटनेमुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## इन्स्टाग्रामवरील 'लव्ह स्टोरी'ची ...

आर ओ वॉटर फिल्टर प्लँटचा व्यवसाय त्याने थाटला. या व्यवसायातून त्याला चांगले उत्पन्न सुरु झाले. बघता बघता त्याने एक चारचाकी वाहन देखील खरेदी केले. ते वाहन त्याने भाड्याने दिले. त्याच्या संसार वेलीवर एक पुत्र आणि एक कन्या रत्नाचे आगमन झाले. एकंदरीत त्याचा सुखाचा संसार सुरु होता. दरम्यानच्या कालावधीत त्याची पत्नी अनिताच्या हातात एक अँड्रॉईड मोबाईल आला. हाती अँतड्रॉईड मोबाईल आल्यामुळे ती फेसबुक, इंस्टाग्राम, व्हाटस ॲअप असे विविध सोशल मिडीया प्लॅटफॉर्म लिलया हाताळू लागली. कर लो दुनिया मुठ्ठीमे या स्लोगनने मोबाईल युगाची सुरुवात झाली होती. मोबाईलच्या माध्यमातून जग तिच्या अगदी जवळ आणि मुठीत आले. बघता बघता अनिताला मोबाईलचे वेड लागले. यु ट्युब, व्हाटस ॲतप हाताळता हाताळता तिला इंस्टाग्रामचे वेड लागले. ती दररोज इन्स्टाग्रामवरील रिल बघू लागली. तिला इन्स्टाग्रामवरील रिल बघण्याचे वेड अर्थात व्यसन जडले. त्या माध्यमातून ती देवानंद धनगर या पस्तीशीतील तरुणाच्या संपर्कात आली. देवानंद धनगर हा शिरपूर तालुक्यातील भामपूर येथील रहिवासी होता. ज्याप्रमाणे अनिता विवाहीत होती तसाच देवानंद देखील विवाहीत होता. दोघे विवाहीत इन्स्टाग्राम या सोशल मिडीया प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून एकमेकांच्या जवळ आले. दोघे एकमेकांसोबत मोबाईलवर चॅटींग करु लागले. अहिराणी भाषेत एक गाणे तयार करण्याचा प्रस्ताव देवानंद याने अनिताजवळ ठेवला होता. त्या गाण्यात अनिताला रोल देण्याची त्याची इच्छा होती. हा प्रकार एके दिवशी तिचा पती जगदीशला समजला. जगदीशने या बाबत अनिताला जाब विचारला. त्यावेळी तिने आपले देवानंद सोबत व्हाटस ॲापवर चॅटींग झाल्याचे कबुल केले. मात्र मी मरेपर्यंत तुझीच राहीन असे तिने पती जगदीशला सांगून हाताबाहेर जाणारी परिस्थिती काबुत ठेवली. त्यामुळे जगदीश शांत झाला. आपला लग्नाचा पतीअसूनहम दो हमारे दो असाआपला सुखाचा चौकोनी परिवार आहे हे तिने समजून घेतले. त्यामुळे तीने देवानंद सोबतची अटॅचमेंट कमी करण्याचा प्रयत्न सुरु केला. ती त्याला टाळू लागली. मात्र गेल्या चार ते पाच वर्षापासून अनिताच्या संगतीत राहण्याची, तिच्यासोबत चॅटींग़ करण्याची सवय जडलेला देवानंद तिचा दिवाना झाला होता.त्याने आपल्या छातीवर अनिताच्या टॅटूसह 'अनु' माझी बायको असे गोंदून घेतले होते. काही केल्या देवानंद तिचा नाद सोडण्यास तयार नव्हता. देवानंदने आपल्या छातीवर अनिताचा फोटो आणि तिचे नाव गोंदून घेतल्याचे त्याच्या पत्नीच्या लक्षात आले. आपला पती परस्त्रीच्या नादी लागल्याचे बघून त्याची पत्नी त्याला कायमची सोडून निघून गेली. पत्नी सोडून गेल्यामुळे देवानंदला रान मोकळे झाले. मात्र इकडे अनिता त्याला टाळत होती. त्यामुळे एकाकी पडलेला देवानंद काही केल्या अनिताचा नाद सोडण्यास तयार नव्हता. दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ शनिवारचा दिवस उजाडला. या दिवशी सकाळी सात वाजता नेहमीप्रमाणे अनिताची मुले शाळेत गेली. अनिताचा पती जगदीश हा मुळ गावी निमगव्हाण येथे त्याच्या आईला पापड देण्यासाठी गेला. यावेळी अनिता घरी एकटीच होती. सकाळी नऊ वाजता तिने गल्लीतील इतर महिलांच्या मदतीने स्वत:च्या अंगणात कुरडया तयार केल्या. आज आपल्या जीवनातील अखेरचा दिवस असल्याचे तिला माहितीच नव्हते. ते केवळ नियतीला माहिती होते. साडे दहा वाजता शाळेत गेलेली तिची मुलगी घरी परत आली. त्यावेळी घर बंद होते. घराचा लोखंडी दरवाजा उघडण्यासाठी तिच्या मुलीने बारीक जाळीतून हात टाकत आतून बंद असलेला दरवाजा उघडला. घराचा दरवाजा उघडताच अनिताची मुलगी एका क्षणासाठी निशब्द झाली. तिच्या तोंडून शब्द निघत नव्हते. मात्र पुढच्याच क्षणी ती जोरजोरात ओरडत धाय मोकलून रडू लागली. तिने पाहिलेले दृश्य भयावह होते. तिची आई अनिता रक्ताच्या थारोळ्यात पडलेली होती. तिच्या शेजारीच देवानंद धनगर हा देखील रक्ताच्या थारोळ्यात निपचीप पडलेला होता. बाजूलाच एक पिस्टल आणि दोन काडतुसे पडलेली होती. एकुणच भयावह दृश्य अनिताच्या मुलीने बालपणात पाहिले होते. ते दृश्य तिच्या बालमनावर कोरले गेले. ते दृश्य तिच्या नजरेसमोरुन सरकण्यास तयार नव्हते. प्रसंग बाका होता. प्रसंगाचे भान ठेवत तिने वडील जगदीश पाटील यांना कॉल लावला. पप्पा तुम्ही लवकर घरी या आपल्या घरात आई व तिच्या जवळ अजुन एकजण रक्ताच्या थारोळ्यात पडलेला आहे असा तिने निरोप दिला. मुलीचा रडवेला आवाज आणि निरोप ऐकताच जगदीशच्या मनात धस्स झाले. निमगव्हाण येथे आईला पापड देण्यासाठी आलेला जगदीश आईला सोबत घेऊन लागलीच अकुलखेडा येथे येण्यास निघाला. घराच्या बाहेर मोठ्या प्रमाणात गर्दी जमलेली होती. जगदीश व त्याच्या आईने घरात जावून पाहिले असता घरात अनिता व देवानंद या दोघांचे मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडलेले त्यांना दिसून आले. देवानंद याने हंबरडा फोडताच त्याला गल्लीतील लोकांनी घराबाहेर काढत शांत केले. या घटनेची चोपडा शहर पोलिसांना माहिती देण्यात आली होती. माहिती मिळताच उप विभागीय पोलिस अधिकारी अण्णासाहेब घोलप, चोपडा शहर पोलिस स्टेशनचे प्रभारी पोलिस निरीक्षक मधुकर साळवेआदींनी आपापल्या पथकासह घटनास्थळी धाव घेत पुढील कारवाईला सुरुवात केली. दोघांचे मृतदेह उत्तरीय तपासणीकामी उप जिल्हा रुग्णालयात रवाना करण्यात आले. उप विभागीय पोलिस अधिकारी अण्णासाहेब घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक मधुकर साळवे यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने पुढील तपासाला सुरुवात केली. मयत देवानंद धनगर यास अनिताचा पती जगदीश याने यापुर्वी कधी पाहिले नव्हते. मात्र अनिताचे देवानंद नावाच्या व्यक्तीसोबतमोबाईलवर चॅटींग़ होत असल्याचे त्याला माहिती होते. पोलिसांनी त्याचा मोबाईल तपासला असता त्याचे नाव देवानंद सुभाष धनगर असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे आपल्या पत्नीसोबत इन्स्टाग्रामच्या माध्यमातून चॅट करणारा हाच तो देवानंद धनगर असल्याचे जगदीशच्या लक्षात आले. अनिता ही देवानंद यास वेळ देत नसल्यामुळे तो तिला मारुन टाकणार असल्याचा आणि स्वत: देखील आत्महत्या करणार असल्याचा मेसेज पोलिसांना त्याच्या मोबाईलमधे आढळून आला.देवानंदने स्वतःच्या मोबाइलवर, 'जगदीश मला माफ कर माझे आणि अनिताचे प्रेम आहे, मी तिच्याशिवाय राहू शकत नाही. मला ती टाळत आहे. दुसऱ्यासोबत बोलते, मी तिला सोडणार नाही आणि मी पण जिवंत राहणार नाही' असा व्हॉट्सॲप मेसेज देवानंद याने टाइप केला होता.हा मेसेज जगदीशला रवाना करण्याचे राहून गेल्याचे समजते. या कालावधीत अनिता आणि देवानंद यांच्यात वाद व वादाची परिणीती गोळीबारीत झाल्याचे म्हटले जाते. हत्या व आत्महत्येच्या या घटने प्रकरणी मयत अनिताचा पती जगदीश काशिनाथ पाटील याने दिलेल्या फिर्यादीनुसार चोपडा शहर पोलिस स्टेशनला देवानंद सुभाष धनगर याच्याविरुद्ध कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा रजि नं ६५/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) सह आर्म ॲक्ट ३/२५ प्रमाणे हा गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस निरीक्षक मधुकर साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे. सोशल मिडीयाचा दुरुपयोग केल्याने काय परिणाम होतात हे या घटनेतून दिसून येते. अनिताच्या प्रेमात दिवाना झालेल्या देवानंद याने स्वत:च्या छातीवर तिचा फोटो आणि नाव गोंदून घेतले होते. त्यामुळे त्याच्या पत्नीने त्याला सोडचिठ्ठी देत त्याच्यापासून सुटका करुन घेतली. देवानंदची पत्नी त्याच्यापासून मुक्त झाली. देवानंद याने स्वत:वर गोळी झाडून जीवनातून आपली मुक्तता करुन घेतली. याशिवाय अनिता देखील देवाघरी गेली. मात्र अनिताचा पती एकाकी झाला. महत्वाचे म्हणजे तिची दोन्ही मुले मातृप्रेमाला कायमची पारखी झाली.

## भांडणात मध्यस्थी करून फसला...

कुमार हे दोघे जण एमआडीसीपासून जवळच असणाऱ्या तळसंदे गावात भाड्याने खोली करून राहयला आहेत. एमआयडीसीत अनेक परप्रांतीय कामगार असल्याने उमेशकुमार याची ओळख ही त्या कामगाराशी झालेली होती. त्यातीलच नीलमणी विनोद कुशवाह अजय राजेंद्र कुशवाह हे दोघे सत्यकुमार आणि उमेशकुमार याच्या परिचयाचे होते. हे चौघे ही उत्तरप्रदेश राज्यातील असल्याने त्याची चांगलीच ओळख झालेली. त्यातून हे चौघे ही कधी कधी दारू पिण्यासाठी एकत्र बसत होते. त्यातून त्याची भांडणे वादा वादी ही बऱ्याच वेळेला होत होती. नीलमणी कुशवाह याची सत्यकुमार बरोबर मागे एकदा वादावादी झाली. त्यावेळी सत्यकुमार याने नीलमणी याला मारहाण केली होती. नीलमणी हा सत्यकुमार याचेबरोबर डुख धरून होता. सत्यकुमार याने आपल्याला मारहाण केली आहे त्याचा बदला घ्यायचा असे त्याने मनात ठरविले होते.तो तशा संधीच्या शोधात होता. पण त्याला तशी संधी सापडत नव्हती. सत्यकुमार याला सोडायचे नाही असे त्याने आपला मित्र अजय कुशवाह याला सांगितले. त्या दोघांनी सत्यकुमार याला एकटयाला गाठून मारण्याचे ठरविले. सत्यकुमार हा बुधवार दिनांक ४ फेब्रुवारी रोजी तो रात्री उशिरा कामावरून घरी चालला.तळदंगे येथे जाण्यासाठी वाहन ही त्याला मिळत नव्हते.तो एमआयडीसीतल ए स्केवअर इंजिनिरीग जवळ आला असता त्या परिसरात मोठा अंधार होता. अंधारातून कुठे एकटे जायचे म्हणून त्याने आपला मित्र उमेशकुमार बरसाती याला फोन लावला. फोनवर त्याने उमेशकुमारला सांगितले की, भैय्या यहाँ अंधेरा बहुत है. तळदंगे अभी बहुत दुर है. तु मेरे को लेने के लिए आ सकता है क्या, त्यावेळी उमेशकुमारने त्याला सांगितले की, तु जहॉ है. वही रूख मै अभी अपनी बाईक लेके तेरे को लेने के लिए आता है. असे म्हणून त्याने फोन बंद केला. सत्यकुमार हा रात्री अंधरात ए स्कवेर इंजिनियरींगजवळ उमेशकुमार याची वाट बघत थांबला. तो तेथे थांबला असताना ए स्केवर इंजिनियरीगच्या वॉचमेनला त्याची शंका आली.तो वॉचमेन त्याच्याकडे जात तु इथे का थांबला आहेस चल इथून निघून जा असे सांगत होता. तर सत्यकुमार हा हिंदीमध्ये मी इथे माझ्या मित्रांची वाट बघत थांबलो आहे. तो बाईकने इथे यायला निघाला की मी जातो,तुम्ही काही वेगळा अर्थ काढू नका. परंतु त्या वॉचमेनचा त्याच्यावर विश्वास बसेना, तो त्याला तेथून हाकलायला लागला. त्यावेळी सत्यकुमार आणि त्या वॉचमेनमध्ये थोडीसी वादावादी झाली. त्याची वादावादी होत असताना तेवढयात तेथे उमेशकुमार ही बाईक घेऊन आला. सत्यकुमार याची वॉचमेन सोबत वादावादी होत असताना तेथे नीलमणी कुशवाह आणि अजय कुशवाह हे दोघे बाईकवरून आले. त्या दोघांनी दारू प्यालेली असल्याने ते दोघे ही नशेत होते. नीलमणी आणि अजय यांनी त्या वॉचमेनची बाजु घेत सत्यकुमार याच्याशी वाद घालायला सुरूवात केली. तु त्या वॉचमेनशी कशाला वाद घालतोस म्हणत त्या दोघांनी सत्यकुमार याला लाथाबुक्क्यांनी मारहाण करायला सुरूवात केली. सत्यकुमारला नीलमणी आणि अजय दोघेजण मारहाण करीत असल्याचे बघून उमेशकुमार हा त्याच्या भांडणाच्या मध्ये पडला.तो सत्यकुमार याला त्याच्या तावडीतून सोडवून घेत असताना नीलमणी याला उमेशकुमार याचा भयंकर राग आला. त्या दोघांना तो शिवीगाळ करीत होता. उमेशकुमार याला नीलमणी याने बाजुला ढकलून दिले. तसे तो जवळच असणाऱ्या कंपाउंडजवळ जावून पडला.त्याच्या डोक्याला थोडासा मार लागल्याने तो डोके धरून खाली बसला उमेशकुमार हा विनाकारण आपल्या भांडणाच्या मध्ये पडला आहे हे बघून नीलमणी याने कंपाउंडजवळ पडलेली लोखंडी पाईप उचलली आणि ती पाईप उमेशकुमार याच्या डोक्यात जोरात हाणली. त्या सरशी उमेशकुमार याचे डोके फुटून त्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. परप्रांतीय हे दारू पिऊन नेहमीच एकमेकाशी भांडत असल्याचे बहुदा अनेकांना माहित असल्याने सहसा त्याच्या भांडणात कुणी पडत नाही. तसा वॉचमेन ही त्याच्या भांडणात मध्ये पडला नाही. उमेशकुमार याच्या डोकीत लोखंडी पाईप घातली गेल्याने तो जागेवरच तडपडत होता. सत्यकुमारने त्याला वाचविण्याचा प्रयत्न करू लागला. तो आराडा ओरडा करून आजुबाजुच्या लोकांना बोलावू लागला. परंतु कुणी ही त्याच्या मदतीला धावून आले नाही. उमेशकुमार याचा जागेवरच मृत्यु झाला. दुरून हि घटना पाहणाऱ्यांनी लागलीच या घटनेची माहिती गोकुळ शिरगाव पोलीसांना दिली. काही वेळातच घटनास्थळी गोकुळ शिरगाव पोलीस स्टेशनचे पोलीस दाखल झाले. त्यांनी या घटनेची माहिती सत्यकुमार याच्याकडून घेतली. ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे यातील संशयीत आरोपी कोण आहेत हे सत्यकुमारने पोलीसांना सांगितले.पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. घटनास्थळी गोकुळ शिरगाव पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी श्रीमती टी.जे.मगदुम यांनी भेट देवून या घटनेची माहिती घेतली. पंचनाम्यानंतर पोलीसांनी मृतदेह उतरीय तपासणीसाठी कोल्हापुर येथील सीपीआर रुग्णालयात दाखल केला. सत्यकुमारने या घटनेची फिर्याद गोकुळ शिरगाव पोलीसात देवून यातील संशयीत आरोपीची नावे पोलिसांना सांगितली असल्याने पोलीसांनी या घटनेतील संशयीत आरोपीचा कसून शोध घ्यायला सुरूवात केली. या घटनेतील दोघे ही संशयीत आरोपी हे घटनेनंतर पळून गेले असल्याने पोलीसांनी पंचतारांकित एमआडीसीत त्याचा शोध घ्यायला सुरूवात केली. त्यातच हे दोन्ही आरोपी कोल्हापुरच्या दिशेने गेल्याची माहिती पोलीसांना मिळाल्यावर पोलीसांनी त्याच्या मोबाईलच्या लोकेशनवरून त्यांना पाचगाव येथून ताब्यात घेतले. त्यांना गोकुळ शिरगाव पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी पोलीसांनी केली असता ते दोघे ही पोलीसांना उडवा उडवीचे उत्तरे देत होते.पोलीसांनी त्यांना पोलीसी खाक्या दाखविताच लागलीच त्यांनी आपला गुन्हा कबुल करून उमेशकुमार याला आम्ही मारणार नव्हतो सत्यकुमार याला आम्ही मारणार होतो, परंतु सत्यकुमार याला आम्ही मारहाण करीत असताना उमेशकुमार हा आमच्या भांडणाच्या मध्ये पडला त्यावेळी आम्ही त्याला ढकलून दिले असता तो कंपाऊंडवर जावून पडला.त्याच्या डोक्याला मार लागल्याने तो आम्हाला शिवीगाळ करू लागल्यावर आम्ही त्याच्या डोक्यात लोखंडी पाईप घातला. त्यात त्याचा मृत्यु झाला. त्या दोघांनी आपला गुन्हा कबुल केल्याने या घटनेची फिर्याद सत्यकुमार याने पोलीसात दिल्याने त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी उमेशकुमार बरसाती कुमार (३०) रा. श्रीवास्ती, नेवरिया उत्तरप्रदेश सध्या रा.तळगदे कागल याच्या खुन प्रकरणी नीलमणी नारायण कुशवाह (२८) रा.जंगल लाल छपरा, कुशीनगर उत्तरप्रदेश सध्या रा.कागल एमआयडीसी आणि अजय राजेंद्र कुशवाह (३०) रा.मैनपुरी, कुशीनगर उत्तरप्रदेश याच्या विरोधात भा.दं.वी. कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. गोकुळ शिरगाव पोलीसांनी त्यांना कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्यांना चार दिवसाची म्हणजे ९ मार्च पर्यंतची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान त्याच्याकडून पोलीसांनी गुन्हयात वापरलेली लोंखडी पाईप आणि एक टु व्हिलर जप्त केली.या घटनेचा पुढील तपास गोकुळ शिरगाव पोलीस करीत आहेत. मागील भांडणाचा राग नीलमणी कुशवाह याच्या डोक्यात होता. त्यातच घटनेच्या वेळी सत्यकुमार याचा वॉचमेनशी वाद चालला होता. केवळ सत्यकुमारला मारायचे म्हणून नीलमणी आणि अजयने त्याच्या भांडणात वॉचमेनची बाजु घेतली परंतु सत्यकुमारला मारहाण होत असताना उमेशकुमार त्याला सोडवायला गेला आणि आपल्या जीवाला मुकला. दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा बळी जातो तसाच प्रकार या घटनेत झाला असल्याचे या घटनेतून दिसून येते. परप्रांतीय महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात रोजी रोटीसाठी येतात, परंतु येथे काम करीत असताना दारूच्या आणि इतर व्यसनाच्या इतके आहरी जातात की त्यातून त्याच्या भांडणाने टोक गाठले जाते आणि मग एकाद्याच्या हातून नको ती गोष्ट घडून जाते. क्षुल्लक आणि किरकोळ कारणावरून झालेले भांडण कोणते वळण घेते त्यातून भांडण सोडविणाऱ्याचाच जीव जातो हे ही या घटनेतून दिसून येते.

पान ८ वरून....

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व...

येथे शिबिराची सुरुवात होणार आहे. त्यानंतर ९ मार्च - सेंट जोसेफ कॉलेज (नंदाखाल -कोपराड), १४ मार्च - अण्णासाहेब वर्तक स्मारक विद्यामंदिर (विरार पूर्व), १६ मार्च - विश्वकर्मा हॉल (नवघर, वसई रोड पश्चिम), १० एप्रिल - तलाठी मंडळ अधिकारी कार्यालय (निर्मळ), १३ एप्रिल - जैन मंदिर पोमन, १७ एप्रिल - एम. जी. परुळेकर हायस्कूल (वसई गाव), ८ मे - मदर मेरी हायस्कूल (आचोळे) आणि १५ मे - ग्राम महसूल कार्यालय (उमराळे) येथे शिबिरे आयोजित करण्यात आली आहेत. ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिलांचे महसूलविषयक प्रश्न तात्काळ निकाली काढून प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्याच्या उद्देशाने हे अभियान राबविण्यात येत आहे. नागरिकांनी संबंधित कागदपत्रांसह उपस्थित राहून शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार दीपक गायकवाड यांनी केले आहे.

## निसर्गाला देखील संघर्ष करावा ...

असून समाजाला निसर्गाची किमया कळावी व त्याचे जतन करता यावे याचा संदेश जणूकाही विविध कवितांतून देण्यात आला आहे. त्यामुळे या काव्यसंग्रहाचे व कवियित्री स्नेहा पंडित यांचे मान्यवरांनी भरभरून यावेळी कौतुक केले यावेळी प्रास्ताविक साहित्य जल्लोष प्रतिष्ठानचे संदेश जाधव यांनी केले.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण**, सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे**, कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे**. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

क्राईम संध्या | सोमवार दि. ९ मार्च २०२६ ते रविवार दि. १५ मार्च २०२६ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ३

# ‘कोकण सरस’ विरार येथे महिला स्वयंसहायता समूहांच्या उत्पादनांचे भव्य विक्री आणि प्रदर्शन

**पालघर : वार्ताहर**




महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद), जिल्हा परिषद पालघर आणि वसई विरार महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने कोकण सरस २०२६ अंतर्गत महिला स्वयंसहायता समूहांच्या विविध उत्पादनांचे भव्य प्रदर्शन व विक्री मेळाव्याचे आयोजन म्हाडा मैदान (स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स), जकात नाका, विरार पश्चिम, ता. वसई, जिल्हा - पालघर येथे दिनांक १२ ते १६ मार्च २०२६ दरम्यान दररोज सकाळी १०.०० ते रात्री १०.०० या वेळेत करण्यात आले आहे.

ग्रामीण महिलांच्या कर्तृत्वाचा आणि कौशल्याचा उत्सव ठरणाऱ्या या मेळाव्यात स्वयंसहायता समूहांनी तयार केलेले विविध खाद्यपदार्थ, घरगुती मसाले, पारंपरिक ग्रामीण हस्तकला, कलाकुसरीच्या वस्तू, वारली पेंटिंग, कापडी पिशव्या तसेच विविध हस्तनिर्मित उत्पादने नागरिकांसाठी उपलब्ध असणार आहेत. महिलांना त्यांच्या उत्पादनांसाठी व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देणे, त्यांचे उत्पन्न वाढविणे आणि आर्थिक सक्षमीकरणाला चालना देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. यंदाच्या मेळाव्यात खवय्यांसाठी खास मेजवानीही सज्ज असणार आहे. कोकणातील सिंधुदुर्गापासून ते मोखाड्यापर्यंतच्या ग्रामीण पारंपरिक चवींचा आस्वाद येथे घेता येणार आहे. पुरणपोळी, उकडीचे मोदक, घावणे, रस शिरवाळे, कोंबडी-वडे, नाचणीच्या भाकरी यांसह कोकणातील ताज्या समुद्री खाद्यपदार्थांची रुचकर रेलचेल नागरिकांना अनुभवता येणार आहे. पारंपरिक पाककलेचा अस्सल आणि घरगुती स्वाद या मेळाव्यातून अनुभवता येणार आहे. कोकण विभागातील विविध जिल्ह्यांतील स्वयंसहायता समूहांचा या मेळाव्यात सहभाग राहणार असून हस्तकला, प्रक्रिया उद्योग व खाद्यपदार्थांचे एकूण १५० स्टॉल उभारण्यात येणार आहेत. नागरिकांच्या सोयीसाठी नियंत्रण कक्ष तसेच आरोग्य कक्षाचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

सदर उपक्रम मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालिका डॉ. रूपाली सातपुते यांच्या नियोजनातून राबविण्यात येत आहे. तसेच वसई विरार महापालिकेचे महापौर अजीव पाटील, आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी (भा.प्र.से.), अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे व दीपक सावंत यांच्या सहकार्यातून हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. कोकण स्तरावरील या सरस मेळाव्यामुळे महिला स्वयंसहायता समूहांच्या उत्पादनांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध होणार असून त्यांना दीर्घकालीन ग्राहकवर्ग निर्माण करण्याची संधी मिळणार आहे. तरी नागरिकांनी दिनांक १२ ते १६ मार्च २०२६ दरम्यान विरार येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहून ग्रामीण महिलांच्या उत्पादनांची खरेदी करून तसेच कोकणच्या पारंपरिक खाद्यसंस्कृतीचा आस्वाद घेऊन या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे तसेच आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांनी केले आहे.

# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या देवणी अध्यक्षपदी प्राचार्य गोपीनाथ सगर



**देवणी : वार्ताहर**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची बैठक माजी प्राचार्य गोपीनाथ सगर यांच्या अध्यक्षते खाली योगेश्वरी विद्यालयात संपन्न झाली. या बैठकिला महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य सरचिटणीस उतरेश्वर बिरादार, लातुर कार्याध्यक्ष दसरथ भिसे, लातुर शहर कार्याध्यक्ष डॉ. गणेश गोमारे उपस्थित होते. यावेळी अंधश्रद्धा, बुवाबाजी, अमानवीय प्रथा नस्ट करणे, वैज्ञानिक विचार रुजवाने या विषयावर उपस्थित मान्यवारणी मार्गदर्शन केले. यावेळी सर्वानुमते कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. अध्यक्ष पदी प्रा. गोपीनाथ सगर, उपाध्यक्ष पदी मनोहर पाटील, सिद्राम डोंगरे,कार्याध्यक्ष प्रा. रामदास मालवडे, प्रधानसचिव प्रा. संदीप दाभाडे, व दयानंद लुल्ले, क्रांती पाटील, नागनाथ हुमनाबाद, सरोजा देवणीकर, राहुल चव्हाण, सतीश चव्हाण, पवन पवार, प्रा. नरसिंग सूर्यवंशी, यांची विविध पदावर निवड करण्यात आली. सूत्रसंचालन प्रा. संदीप दाभाडे यांनी केले. अध्यक्षिय समारोप सगर सरांनी केले. आभार प्रा. नरसिंग सूर्यवंशी यांनी केले. या कार्यक्रमांस तालुक्यातील कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिवसेना पुणे शहर व साईनाथ टॅक्सी संघटनेतर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांना विनम्र अभिवादन

**पुणे : शंकर जोग**

रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे शिवसेना शिंदे गट पुणे शहर व साईनाथ टॅक्सी संघटना पुणे अंतरराष्ट्रीय विमानतळ येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाचे संतोष ढोके यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी राष्ट्रपती पुरस्कार प्राप्तकरते भाऊसाहेब पुंडे, वैभव शिंदे, शिवसेना शिंदे गट पुणे शहर जिल्हा शिक्षक शिक्षकेतर संघाचे अध्यक्ष अनिल गडकरी सर, पुणे शहर समन्वयक शंकर संगम, शिवसेना पुणे शहर उपप्रमुख सुनील जाधव, साईनाथ टॅक्सी संघटनेचे चेअरमन सागर काकडे, महेंद्र गायकवाड, कामगार सेनेचे पुणे जिल्हा प्रमुख रोहित कसबे, शिवसेना वडगाव शेरी प्रभाग प्रमुख रितेश शिंदे, मागासवर्गीय विभाग पुणे शहर प्रमुख महेंद्र गायकवाड, पंडित दरगुडे, प्रमोद प्रभुणे, नासिर सय्यद, अजय ठोंबे आदी यावेळी उपस्थित होते.



# तारापूरमध्ये चारित्र्याच्या संशयावरून पतीकडून पत्नीची हत्या

**बोईसर : वार्ताहर**

तारापूरमध्ये होळीच्या दिवशी चारित्र्याच्या संशयावरून पतीने पत्नीचा गळा आवळून हत्या केली. पत्नी घराशेजारील पुरुषासोबत मौजमज्जा करताना दिसल्यानंतर पतीने रागाच्या भरात टोकाचे पाऊल उचलले. पत्नीच्या हत्येप्रकरणी आरोपी पतीला पोलिसांनी ताब्यात घेत अटक केली आहे. तारापूर पोलीस ठाणे हद्दीत सर्व नागरिक होळीचा सण आनंदाने साजरा करीत असताना पतीने आपल्या पत्नीची गळा आवळून निर्घुण हत्या केल्याने खळबळ निर्माण होऊन होळीच्या सणाला गालबोट लागले आहे. तारापूर पोलीस ठाणे हद्दीतील परनाळी आंबात पाडा या गावांमध्ये होळी सणाच्या मध्यरात्री १२.३० वाजेच्या सुमारास




संशयित आरोपी नितेश सुरेश आबांत याने आपल्या घराच्या अंगणात पत्नी आशा नितेश आंबात (२४) हिला गावातीलच दिनेश उर्फ टिल्लू दांडेकर या परपुरुषासोबत अर्धनग्न अवस्थेत बघितल्याने त्याचा राग अनावर झाला. नितेश आंबात याने पत्नीवर चारित्र्याचा संशय घेऊन संतापाच्या भरात जवळच पडलेल्या प्लास्टिकच्या दोरीने पत्नीचा गळा आवळून निर्घृणपणे हत्या केली. गावातील नागरिकांनी हत्येच्या घटनेची माहिती पोलिसांना दिल्यानंतर तारापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक निवास कणसे आणि इतर कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलीस पथकाने हत्या झालेल्या ठिकाणाचा पंचनामा करून महिलेचा मृतदेह ताब्यात घेत शवविच्छेदनासाठी तारापूर येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवला. तर पत्नीची हत्या करून लपून बसलेल्या आरोपी पतीला मंगळवारी संध्याकाळी सात वाजेच्या सुमारास पोलिसांनी ताब्यात घेऊन अटक केली आहे. पत्नीच्या हत्येप्रकरणी आरोपी नितेश आंबात याच्या विरोधात तारापूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) अन्वये गुन्हा दाखल करून पालघर येथील न्यायालयात हजर केले असता पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

# अल्पवयीन मुलीस पळून नेणाऱ्याला दोन तासात पोलिसांनी घेतले ताब्यात

**देवणी : वार्ताहर**




दिनांक ५ मार्च गुरुवारी देवनी पोलीस ठाण्यात फिर्यादीने आपल्या अल्पवयीन मुलीस अज्ञाताने फूस लावून पळवल्याची फिर्याद दिल्याने देवणी पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तपासाची चक्रे गतिमान करत गुप्त खबऱ्या मार्फत मुलीचा शोध घेतला असता सदर मुलगी बोर्डाचा पेपर अवघड गेल्याने रागाच्या व तणावाच्या भरत तिने उत्तर अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थाचे गाव गाठून तेथे मंदिर परिसरात असल्याचे आढळून आले. देवणी पोलिसांनी त्वरित अक्कलकोट पोलीस स्टेशनला संपर्क करून सदर मुलीस ताब्यात घेण्यास विनंती केली अक्कलकोट पोलिसांनी सदर मुलीस त्वरित ताब्यात घेऊन तसे देवणी पोलीस ठाण्यास कळवले मुलीस ताब्यात घेण्याची कार्यवाही अक्कलकोट पोलीस व देवणी पोलीस यांनी अवघ्या दोन तासात पार पाडली. अल्पवयीन मुलीस ताब्यात घेण्याची आठ दिवसातील ही दुसरी घटना आहे. या कार्यवाहीनंतर सदर मुलीस ताब्यात घेऊन मुलीच्या वडिलाकडे सुपूर्द केले आहे. सदर कार्यवाही जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल ढुमे व देवणी चे सहाय्यक पोलीस निरीक्षक भीमराव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली फत्ते करण्यात आली आहे. पुढील तपास आर जी लामतुरे हे करीत आहेत.

# वसईत वाहतूक पोलिसावर जीवघेणा हल्ला

## दुचाकीवरून ट्रिपल सीट कारवाई दरम्यान तरुणाचा राडा

**वसई : वार्ताहर**



वसईत ट्रिपल सीट जाणाऱ्या दुचाकीस्वारावर वाहतूक पोलिसाने कारवाई केल्याचा राग मनात धरून त्याने वाहतूक पोलीसावर दगड डोक्यात घालून त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची खळबळजनक घटना समोर आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी तरुणाला ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध कारवाई सुरू केली. अभिषेक जैसवार (२१) असे या हल्लेखोर तरुणाचे नाव आहे. होळी व धुळवडीच्या निमित्ताने वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यावर कारवाई करण्यासाठी पोलिसांनी शहरात विविध ठिकाणी नाकाबंदी लावली होती. मिळालेल्या माहितीनुसार, ३ मार्च २०२६ रोजी दुपारी साडेतीनच्या वाजेच्या सुमारास वसई पूर्व येथील रेंज नाका, टॉप टेन मोबाईल शॉपजवळ वाहतूक पोलीस जसवंत वळवी व पोलीस नाईक विनोद माने यांच्यासह वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई सुरू होती. याच दरम्यान अभिषेक राजदेव जैसवार (२१) हा एम एच ४८, डी एन ४५११ या क्रमांच्या दुचाकीवरून ट्रिपल सीट जात होता. याच दरम्यान पोलिसांनी त्याला थांबवून त्याच्या विरुद्ध कारवाई सुरू केली होती. या कारवाईवरून अभिषेक याने पोलिसांच्या सोबत वाद घातला. वाद इतका विकोपाला गेला की या अभिषेक याने रागाच्या भरात रस्त्यावर पडलेला दगड उचलून वाहतुक पोलीस जसवंत वळवी यांच्या डोक्याच्या मागील बाजूस जोरात मारला. यात पोलीस कर्मचारी जमिनीवर कोसळल्यानंतरही आरोपी थांबला नाही; त्याने जीवे मारण्याच्या उद्देशाने दगडाने त्यांच्या डोक्यावर अनेक वार करून त्यांना गंभीर जखमी केले आहे. वाहतूक पोलिसांवर कारवाई दरम्यान झालेल्या हल्ल्यानंतर मोठी खळबळ उडाली आहे. वालीव पोलीस ठाण्यात पोलिसांनी आरोपी अभिषेक जैसवार विरुद्ध शासकीय कामात अडथळा आणि खुनाचा प्रयत्न कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

# श्री ग्रमदैवत महादेव मंदिर यात्रा महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी आश्विन लांडगे, तर सचिवपदी सूरज अंबुलगे

**देवणी : वार्ताहर**



देवणी येथील श्री ग्रमदैवत महादेव मंदिर यात्रा महोत्सव समिती २०२६ ची बैठक शुक्रवारी महादेव मंदिर येथे संपन्न झाली. या बैठकीमध्ये यात्रा विषयी अनेक धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. यानंतर यात्रा महोत्सव पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी अश्विन लांडगे तर सचिव पदी सूरज अंबुलगे यांची एकमताने निवड करण्यात आली. उर्वरित कार्यकारणी मध्ये उपाध्यक्ष अँड. उदयकुमार बिराजदार, ईश्वर पाटील सहसचिव महेश धनुरे, मयूर पटणे, कोषाध्यक्ष काशिनाथ भद्रशेट्टे तर कार्यकारणी सदस्य म्हणून अँड.बस्वराज ईश्वरशेट्टे, श्रीमती मनोरमा बोंद्रे, बस्वराज बिराजदार, गुंडप्पा कंटे, सोमनाथ कुडते, निलेश लांडगे, अभिजीत सौंदाळे, अविनाश धनूरे, माणिक मानकरी, रोहित पडसलगे, शशिकांत कप्ते, महंतेश हरनाळे, सतीश वासगे, कैलास पडसलगे, कैलास जीवने, विजयकुमार लुल्ले, गणेश बोंद्रे, उद्धव मल्लेशे, स्वप्निल भद्रशेट्टे, मनोज बुदे, दीपक मळभगे, अटलविश्वास धनूरे, रमेश घटबाळे तर मार्गदर्शक म्हणून वैजनाथ अष्टुरे, शिवराज बिराजदार, पृथ्वीराज पाटील-जिवणे आदींची निवड करण्यात आली.


**महाराष्ट्र शासन**
**कृषि विभाग**
**उपविभागीय कृषि अधिकारी, पालघर, जि. पालघर**
**ई-निविदा सूचना क्र. २६/उविकृअपा/२०२५-२६**

PMKSY 2.0 अंतर्गत सन २०२५-२६ मधील पालघर जिल्ह्यातील पालघर व डहाणू तालुक्यातील खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे विविध कामे करण्यासाठी उपविभागीय कृषि अधिकारी, पालघर, जि. पालघर फोन नं. ०२५२५ २४१९२७ बी-१ प्रपत्रात निविदा सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून आमंत्रित करण्यात येत आहेत. सविस्तर माहीती उपविभागीय कृषि अधिकारी, पालघर, जि. पालघर कार्यालयात दिनांक पासून पहावयास व विक्रीसाठी https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील सर्व शुध्दीपत्रक, दुरुस्त्या सुध्दा उपविभागीय कृषि अधिकारी, पालघर, जि. पालघर कार्यालयात पहावयास मिळेल. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार उपविभागीय कृषि अधिकारी, पालघर / जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, पालघर यांनी राखून ठेवला आहे. कामाचे संक्षिप्त वर्णन खालील प्रमाणे :-

| अ. क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम | बयाना रक्कम (१ टक्के) | निविदा शुल्क | कामपूर्ण करण्याचा कालावधी | नोंदणी वर्ग | निविदा विक्री सुरू करण्याचा दिनांक व वेळ | निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | निविदा उघडणे दिनांक व वेळ | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १२७ | मौजे- शेणसरी मजगी गट क्रमांक -०१ ते ०६ व जुनी भात शेती दुरुस्ती गट क्रमांक ०१ ते १५, धरमपूर - जूनी भात शेती दुरुस्ती गट क्रमांक - ०१ ते १८ ता.डहाणू, जि. पालघर निविदा प्रक्रियेत सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत कंत्राटदार भाग घेवू शकतील. (खुला) | १०३२४०३ | १०३२४ | ५९० | ३० दिवस | १ ते ९ | ०९/०३/२०२६ १४.०० | १६/०३/२०२६ १७.०० | १८/०३/२०२६ १०.०० | निविदा प्रक्रियेत सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत कंत्राटदार भाग घेवू शकतील. (खुला) |

**ई-निविदेबाबत खालीलप्रमाणे अटी व शर्ती निविदाधारकांस बंधनकारक राहतील :-**

१. मा. संचालक कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील ई-निविदा मार्गदर्शक सुचना दि. ०६ एप्रिल २०२३ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून ई-निविदा सादर करावी.
२. मा.कृषि आयुक्त पुणे यांचेकडील शुद्धीपत्रक दि. २६ ऑगस्ट २०२४ नुसार जिओ टॅग बाबत असलेल्या मुद्दा क्र. ११ व त्याचे संदर्भातील इतर सर्व तरतुदी रद्द करण्यात येत आहेत.
३. ई-निविदे बाबतचे शुद्धीपत्रक, दुरुस्त्या आवश्यक असल्यास उपविभागीय कृषि अधिकारी, पालघर, जि. पालघर यांचेमार्फत संकेतस्थळावर करण्यात येतील.
४. गतिमान पाणलोट विकास कार्यक्रम अंतर्गत मार्गदर्शक सूचना बंधनकारक राहतील.
५. भौगोलिक व नैसर्गिक परिस्थितीनुसार कार्यारंभ आदेशाबाबत कार्यवाही करण्यात येईल.
६. ठेकेदाराने अटी व शर्ती असलेली निविदा सादर केल्यास ती स्वीकारली जाणार नाही.
७. निविदा प्रक्रियेमध्ये शासन स्तरावर निविदा प्रक्रियेच्या अनुषंगाने वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णय बंधनकारक राहतील.
८. ई-निविदा सादर केल्यानंतर त्रुटी असल्यास एकदाच त्रुटीबाबत संबंधित कंत्राटदाराला कळविण्यात येईल.

सही/-
उपविभागीय कृषि अधिकारी,
पालघर, जि. पालघर

जिमाका/पालघर/ जाहि २०९/१०८/२०२६ दिनांक : ०५/०३/२०२६

09 TO 15 MARCH 2026 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 3/7/2026 8:11 PM Page 1



# आश्वासनांची पुरणपोळी पण सरकारची रिकामी झोळी!

महाराष्ट्रावर ९ लाख कोटींचे कर्ज आहे. त्यामुळे यंदाच्या अर्थसंकल्पात खर्चाला कात्री लावली जाईल असे वाटले होते. पण राज्य बुडाले तरी चालेल पण सरकार आणि पक्ष यांच्या प्रतिमेला तडा जात नये हेच सरकारचे धोरण आहे. त्यामुळेया अर्थसंकल्पात अनेक मोठ्या घोषणा करण्यात आल्या. यामध्ये राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्यातील शेतकऱ्यांना २ लाख पर्यतच्या कर्जमाफीची मोठी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. तसेच १००० लोकसंख्या असणाऱ्या गावांमध्ये सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते सरकार बनवणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांकडून करण्यात आली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे सरकारवर ९ लाख कोटींचे कर्ज आहे. सरकारची तिजोरी खाली असताना लाडकी बहीण योजना अविरतपणे सुरु राहणार असल्याची देखील माहिती मुख्यमंत्र्यांकडून देण्यात आली. यासोबतच मुंबई, पुणे शहरांसाठी अनेक मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत. या अर्थसंकल्पात महिला, विद्यार्थ्यासह सर्व घटकांचा विचार करुन विविध योजना जाहीर करण्यात आल्या. राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर. ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीककर्ज थकित असलेल्या पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यत कर्जमाफी, नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपये अनुदान कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर लाभ देण्यासोबतच बँकिंग यंत्रणा सक्षम करण्यासाठी, तसेच शेतकऱ्यांना कायमस्वरुपी कर्जमुक्त करण्यासाठी समितीच्या शिफारसींनुसार कार्यवाही करणारजून ते ऑक्टोबर २०२५ शेतकऱ्यांना १५,४९२ कोटी रुपये वितरित केलेशेतीमालाला जागतिक बाजारपेठ देण्यासाठी १० ते १५ पिकांची एकात्मिक मूल्यसाखळी निर्माण करणार जून ते ऑक्टोबर २०२५ शेतकऱ्यांना १५,४९२ कोटी रुपये वितरित केले.शेतीमालाला जागतिक बाजारपेठ देण्यासाठी १० ते १५ पिकांची एकात्मिक मूल्यसाखळी निर्माण करणार असल्याची घोषणाॲग्रीस्टॅक, महावेध, क्रॉपसॅप, महाडीबीटी, को. ऑप स्टॅक इत्यादी डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून एकात्मिक इकोसिस्टीम उभारणार असल्याचे सांगण्यात आले आहे.शेतीत एआयचा वापर. महाविस्तार एआय, वसुधा व्हॉईस टेलिफोनी, पुश टेलिफोनी, महाराष्ट्र ॲग्रीकल्चर डेटा एक्सचेंज, एआय सक्षम सँडबॉक्स इत्यादी उपक्रम सुरु करण्याची घोषणाआता ४ कृषी विद्यापीठे एआय क्षमता आणि कृषी स्टार्टअपला प्रोत्साहन देण्यासाठी आर्टिफिशियल इंटिलिजन्स इनोव्हेशन अँड इन्क्युबेटर सेंटरची स्थापना करणार. उत्पादन खर्चात २५ टक्के घट होऊन उत्पादकता वाढीला चालना दिली जाईल.जानेवारी २०२६ पर्यत १ कोटी ३१ लाख फार्मर्स आयडी तयार. आता त्यात आदिवासी वनपट्टेधारक शेतकरी समाविष्ट करणारकृषी समृद्धी योजना २०२६-२७ पासून ४ वर्षात भांडवली गुंतवणूक वाढवणार असल्याची घोषणा नवीन प्राकृतिक शेती अभियानांतर्गत ५ लाख हेक्टर क्षेत्र प्राकृतिक शेतीखाली आणणारनवीन मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना : राज्य आणि जिल्हा योजनांचे एकत्रिकरण करुन पशुधनात स्वयंपूर्णता, रोजगारनिर्मिती. आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्षानिमित्त गो-पालक, कुक्कुटपालक व शेळीपालक यांच्यासाठी विशेष कार्यक्रम राबवला जाणार आहे.मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना : प्रतिवर्षी १२४० कोटी रुपये देणार, २०,५९४ मासेमारांना लाभमुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना सुरुच राहणार, यंदा सुमारे २०,००० कोटींची तरतूद, फेब्रुवारी २०२६ पर्यत ३२,७५६ कोटी रुपये दिले असल्याचे सांगण्यात आले.मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० : १६ हजार मे.वॅ.ऊर्जाक्षमता स्थापित करण्याचे उद्दिष्ट, यातून १०० टक्के कृषीपंपांना दिवसा वीजपुरवठा, डिसेंबर २०२६ पर्यत १० हजार मे.वॅ. क्षमता स्थापित होणार, सध्या ३३४९ मे.वॅ. क्षमता स्थापितमागेल त्याला सौर कृषीपंप : आतापर्यत ६,६३,३२४ सौर कृषीपंप दिले, अंमलबजावणीत स्व. गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान योजनेत शेतमजुरांचा समावेश करण्यात आला आहे. २०४७ ची गरज लक्षात घेता ग्रामीण भागात दरडोई प्रतिदिन ५५ लिटर आणि शहरी भागात दरडोई १३५ लिटर पाण्याच्या उपलब्धतेचे लक्ष्य असल्याचे सांगण्यात आले. जलसंपत्तीची डिजिटल, प्रमाणित आणि ऑनलाईन माहिती प्राप्त करण्यासाठी नाशिक येथे राज्य जल माहिती केंद्र. यासाठी ७१.२० कोटी रुपये मंजूर केले. कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील पूर निवारणासाठी जागतिक बँकेच्या मदतीने २२४० कोटींचा प्रकल्प, कृष्णा खोऱ्यातील पुराचे पाणी भिमा खोऱ्यातील पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागात वळवणारवैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प ९४,९६८ कोटीची तरतूद केली. वैतरणा व उल्हास खोऱ्यातील ५४ टीएमसी पाणी गोदावरीत वळवणार, डीपीआर कार्यवाही सुरुदमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदीजोड प्रकल्प : १३,४९७ कोटीनार -पार गिरणा नदीजोड प्रकल्प ७४६५ कोटी त्याच बरोबरदमणगंगा - एकदरे-गोदावरी नदीजोड प्रकल्प : २२१३ कोटीबारामती-पुरंदर तालुक्यातील अवर्षणप्रवण क्षेत्राला पिण्याचे पाणी आणि सिंचनासाठी निरा-कऱ्हा नदीजोड प्रकल्प राबविणार आहे. २०२६ मध्ये अल-निनोचा संभाव्य धोका तसेच मान्सूनवर विपरित परिणामाची, दुष्काळाची शक्यता लक्षात घेता पिण्याचे पाणी राखून ठेवणार, जलयुक्त शिवार, जलसंधारण योजना राबवणार. वैरण विकास उपाययोजना राबविणार असल्याचे म्हटले आहे. जागतिक बँकेच्या सहाय्याने राज्यातील शहरांमध्ये ५८६० कोटींचा महाराष्ट्र नागरी जलपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, पुनर्वापर प्रकल्प राबविणार. नागरी सांडपाण्यावर १०० टक्के प्रक्रिया आणि प्रभावी पुनर्वापर करणार आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसाठी भरीव तरतूद (लाडकी बहीण योजना बंद होणार नाही. योजनेसाठी भरीव तरतूद केली आहे, असं मुख्यमंत्री अर्थसंकल्प सादर करताना म्हणाले) अंगणवाडी सेविकांना आर्थिक नियोजनाबाबत प्रशिक्षण, योजनेतील लाभार्थ्यांना आर्थिक साक्षर करुन लाभाचे व्यवस्थापन, गुंतवणुकीचे मार्गदर्शन करणार.एकल महिला धोरण सर्व जिल्ह्यात एकल महिलांचे सर्वेक्षण सुरु असून, अहवालाचे विश्लेषण करुन धोरण आणणार आहे. लखपती दिदी : राज्यात २७ लाख लखपती दिदी झाल्या, २०२६-२७ मध्ये आणखी २५ लाख लखपती दिदी करणार. असल्याचे आश्वासनमहिला बचतगटांच्या वस्तु उत्पादन, विक्रीसाठी १३ जिल्ह्यात उमेद मॉलयुवा-शिक्षण-क्रीडाएज्युसिटी : नवी मुंबईत ६ देशांचे विद्यापीठ, सर्व विद्यापीठे याचवर्षी सुरु होणार, याच धर्तीवर ८ ते १० शैक्षणिक शहरे विकसित करणारविद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची ओढ निर्माण करण्यासाठी मुख्यमंत्री विज्ञान वारी : इस्त्रो आणि अमेरिकेतील नासा या जगप्रसिद्ध संस्थांना भेट देण्याची संधी या योजनेतून मिळणार आहे. महाराष्ट्र एजन्सी फॉर होलिस्टिक इंटरनॅशनल मोबिलिटी अँड ॲडव्हान्समेंट (महिमा) वा संस्थेची स्थापना परदेशी नोकऱ्यांसाठी आवश्यक भाषा, कौशल्य प्रशिक्षण, आर्थिक मार्गदर्शन समूपदेशन सेवा विस्तार आणि अधिक संघटित व्यवस्थेसाठी ३६ नवदिशा केंद्र स्थापन करणार आहे. स्टार्टअप, युनिकॉर्नमध्ये महाराष्ट्र नंबर १, पुढील ५ वर्षात १.२५ लाख उद्योजक घडवणार, ५० हजार स्टार्टअपला चळ देणारमुख्यमंत्री उद्योजकता महाफंडमधून स्टार्टअप्सना थेट आर्थिक मदत, सर्वोत्तम ५० स्टार्टअप्सना नाविन्यपूर्ण प्रकल्प शासनात राबविण्यासाठी २५ लाखांपर्यतच्या शासकीय कामाचे थेट वर्कऑर्डर्समिशन लक्ष्यवेध : ॲथलेटिक्स, बॅडमिंटन, बॉक्सिंग, वेटलिफ्टिंग, हॉकी, कुस्ती, आर्चरी, शुटिंग, रोईंग, सेलिंग, लॉनटेनिस, टेबल टेनिस या १२ खेळांचे राज्य स्तरावर ८ हायपरफॉर्मन्स सेंटर्स सुरु, आता आणखी ४ केंद्र सुरु करणार असल्याचे म्हटले आहे. विभागीय स्तरावर २५ क्रीडा उत्कृष्टता केंद्र आणि जिल्हा स्तरावर ९६ क्रीडा गुणवत्ता विकास केंद्र सुरु करणार, यासाठी निधीची तरतूद करणार आहे. वारसा/संस्कृती जतन करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या युनेस्को यादीतील १२ किल्ल्यांच्या वारसा जतन करण्यासाठी उपाययोजना करणार.पुणे जिल्ह्यातील आंबेगाव शिवसृष्टी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राजकोट किल्ला परिसर विकासासाठी निधी देणारछत्रपती शिवाजी महाराजांचे आग्रा येथील स्मारक आणि पानिपत, हरियाणा येथील काला अंब येथील मराठा शौर्य स्मारकासाठी सहाय्यसातारा जिल्ह्यातील छत्रपती शिवाजी महाराजांचा वासोटा किल्ला : मुनावळे ते वासोटे किल्ला रोपवे प्रकल्प हाती घेणारछत्रपती संभाजी महाराजांच्या मौजे तुळापूर स्मारकाचे काम जून २०२६ पर्यत, मौजे वढू बुद्रुक समाधीस्थळाचे काम जून २०२७ पर्यत पूर्णत्त्वाचे नियोजन, रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर स्मारकाचा नियोजन आराखडा अंतिम टप्यात, निधी देणारसातारा जिल्ह्यातील अजिंक्यतारा किल्ला आणि संगम माहुली येथील महाराणी ताराबाई आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधीस्थळांचे जतन, संवर्धन, जिर्णोद्धार करणारमहात्मा ज्योतिबा फुले यांची २०० वी जयंतीः ११ एप्रिल २०२६एक समिती स्थापन करुन विविध सामाजिक उपक्रम राबवणार, त्यासाठी निधी देणार. महात्मा फुले यांचे जन्मगाव मौजे कटगुण, जिल्हा सातारा येथे भव्य स्मारक उभारणार ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव नायगाव, जिल्हा सातारा येथे स्मारक आणि महिला प्रशिक्षण केंद्र भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महाड, चवदार स्थळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त पायाभूत सोयीसुविधांचा विकास आराखडा करणार,असल्याचे सांगितलेसंत गाडगेबाबा यांचे १५० वे जयंतीवर्ष त्यांचे जन्मस्थळ, कर्मभूमी, अंतिम श्रद्धास्थान यांना एकत्रित करुन संत गाडगेबाबा तीर्थक्षेत्र सर्किट विकसित करणार.राज्यस्तरिय अभियाने एकत्र करुन संत गाडगेबाबा ग्राम समृद्धी अभियान राबविणार. ७५ गावांत एआयच्या सहाय्याने नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी पथदर्शी प्रकल्प राबविणार. महात्मा फुले, संत गाडगेबाबा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतिंचे विशेष वर्ष म्हणून २०२६-२७ हे 'सामाजिक समता आणि समरसता वर्ष' म्हणून साजरे करणार असल्याची घोषणा केली. जगदगुरु तुकाराम महाराजांचे देहू येथील जीर्ण घर आणि जन्मस्थानाच्या जतन, संवर्धनासाठी आराखडा तयार करणार असल्याची घोषणा. नाशिक-त्र्यंबक कुंभमेळ्यासाठी भरीव तरतूद, नवरगाव, रामटेक येथे राज्यातील तिसरी चित्रनगरी विकसित करणार, महाकवि कालिदास यांचे जीवनचरित्र नव्या पिढ्यांना कळण्यासाठी चित्रपट निर्मिती करणार असल्याची घोषणारामटेक विकास आराखडा टप्पा-२ ची कामे करणार असल्याचे सांगितले आहे ज्योर्तिलिंग विकासाची कामे सुरु, महानुभाव पंथीय विविध धार्मिक स्थळांच्या ठिकाणी सुविधांसाठी निधी देणार. एमटीडीसीच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त ५० पर्यटनस्थळी पायाभूत सुविधा निर्मितीमराठी भाषेतील साहित्य व ग्रंथ अन्य भाषांमध्ये तसेच अन्य भाषांमधील दर्जेदार साहित्य मराठीत अनुवादित करण्यासाठी 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र अनुवाद अकादमी' स्थापन करणार ओबीसी, धनगर, गोवारी घटकांसाठी भरीव तरतूदसारथी, बार्टी, आर्टी, टीआरटीआय, महाज्योती, वनार्टी, अमृत, मार्टी या संस्थांसाठी भरीव तरतूददिव्यांगांसाठी सर्व सुविधा एका ठिकाणी आणण्यासाठी दिव्यांग सहाय्यक संकेतस्थळ, जिल्हा वार्षिक योजनेत १ टक्के निधी राखीव तृतीयपंथियांच्या विकासासाठी स्वयंरोजगार, व्यवसायासाठी बीज भांडवल देणार, आकांक्षित जिल्हे आणि तालुके कार्यक्रमाचा विस्तार करणार. गडचिरोली, नंदूरबार, धाराशिव, वाशीम जिल्ह्यांसोबत आता हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे, परभणी या ६ नवीन जिल्ह्यांचा समावेश. या एकूण १० जिल्ह्यातील ७७ तालुके आणि उर्वरित जिल्ह्यातील १०० तालुक्यांचा गतिमान विकासचर्मकला डिझाईन व उत्पादन अद्ययावत केंद्र मुंबईतील बांद्रयात स्थापन करणारआदिवासी जमातीतील युवांना नाविन्यतेवर आधारित उद्योजक, उद्योग निर्माते घडविण्यासाठी 'भारत इनोव्हेशन, रिसर्च, स्टार्टअप्स फॉर आत्मनिर्भरता-बिरसा' ही योजना ७) आरोग्य राज्यातील २९ महानगरपालिका, २४७ नगरपालिका, १४७ नगरपंचायतींमध्ये राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम, आरोग्य विभागाच्या सर्व गुणवत्तापूर्ण सुविधा देण्यासाठी शझी आरोग्य आयुक्तालयाची स्थापना करणारसार्वजनिक आरोग्याच्या सर्वकष उन्नतीसाठी एम्स, आयआयएमच्या धर्तीवर उच्च गुणवत्तेच्या प्रशिक्षण आणि संशोधनासाठी नागपूर येथे महाराष्ट्र आरोग्य सार्वजनिक संस्था स्थापन करणार. भारतीय सार्वजनिक आरोग्य संस्था यासाठी सहकार्य करणारकर्करोग, मधुमेह, हृदयविकार यासारख्या आजारांचे निदान करण्यासाठी आशियाई विकास बँकेच्या मदतीतून ग्रामीण भागासाठी ४५०० कोटींची प्रगती योजनाराज्यात डिजिटल सार्वजनिक आरोग्य परिसंस्था निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र डिजिटल आरोग्य तंत्रज्ञान अभियान' राचविणार, रिअल-टाईम डॅशवोर्डच्या आधारे प्रभावी निर्णय आणि संनियंत्रण राज्यात ३५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, ११ महाविद्यालयांची कामे विविध टप्प्यांचरमहात्मा फुले जनारोग्य योजना उपचारांची संख्या १३५६ वरुन २३९९, रुग्णालयांची संख्या १७९२ वरुन ४५३७ तसेच ९ प्रकारच्या अवयव प्रत्यारोपणाच्या उपचारांसाठी २२ लाखांपर्यतचा खर्च राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या राखीव निधीतून करण्यास मान्यतास्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंचाजोगाई या संस्थेच्या इमारतीच्या एकत्रिकरणासाठी वृहद आराखडा तधार करणारबीड जिल्हा रुग्णालयाच्या विस्तारीकरणासाठी ३६० खाटांचे रुग्णालय बांधकाम, नर्सिंग कॉलेज, वसतीगृहाचे काम प्रस्तावितसातारा जिल्ह्यातील दो येथे निसर्गोपचार केंद्र, ताणतणाव, जीवनशैलीजन्म आजार, मानसिक आरोग्य तसेच प्रतिबंधात्मक आरोग्यसेवांसाठीमुंबई महानगर परिसरात सर्वांगिण आरोग्य आणि वेलनेसचे जागतिक केंद्र ट्रिलियन अर्थव्यवस्थेकडे दमदार वाटचाल, २०४७ पर्यत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर्सची करणार असल्याचे म्हटले आहेशेतीचा जीडीपी ५५ अब्ज डॉलर्सवरुन ५०० अब्ज डॉलर्सवर नेणारउद्योग क्षेत्राचे स्थूल उत्पन्न १२३ अब्ज डॉलर्सवरुन १५०० अब्ज डॉलर्सवर नेणारसेवा क्षेत्राचे स्थूल उत्पन्न ३१२ अब्ज डॉलर्सवरून ३००० अब्ज डॉलर्सवर नेण्याचे उद्दिष्टसहाव्या राज्य वित्त आयोगाचा अहवाल कृती अहवालासह पुढील अधिवेशनात सादर करणार, प्रशासकीय सुधारणा आणि आर्थिक विकेंद्रीकरण यातून सक्षम स्थानिक स्वराज्य संस्थांची निर्मिती २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात ७,६९,४६७ कोटी रुपयांची तरतूद. महसुली जमा : ६,१६,०९९ कोटी रुपये अंदाजितमहसुली खर्च : ६,५६,६५१ कोटी रुपये अंदाजित ४०,५५२ कोटी रुपये तूट अंदाजित राजकोषिय तूट स्थुल उत्पन्नाच्या ३ टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यात सरकारला यश. ती नेहमीच १ टक्क्यांपेक्षा कमीक्रेन आधारित वाहने यांच्या वाहन किंमतीवर ७ टक्के प्रमाणे एकरकमी कर होता. परंतू मोठ्या किंमतीची वाहने अन्य राज्यात नोंदणी होत असल्याने कराची कमाल मर्यादा ३० लाख प्रस्तावितवाहन वितरकास व्यवसाय प्रमाणपत्र ५ वर्षाचे. मात्र कर १ वर्षाचा. त्यामुळे त्याच्या दरात सुधारणा प्रस्तावित मुद्रांकांवर दस्त निष्पादित केल्यास अपराधसिद्धीनंतर सक्तमजुरी व शास्तीची तरतूद. या शास्तीच्या रकमेत फेररचना करुन ५००० वरुन १ लाख अशी वाढ. यामुळे कमी मुद्रांकावर दस्त निष्पादन करण्याचे प्रमाण नियंत्रणात येणार. ९) पायाभूत सुविधाशाश्वत शहरी विकासासाठी १० हून अधिक सक्षम प्रादेशिक विकास प्राधीकरणे, ५० हून अधिक सुनियोजित, वहुपयोगी शहरी समूह विकसित करणार, शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सेवा १०० टक्के डिजिटाईज करणार. जलवाहतूक : १२५ कि.मी.चे जलमार्ग जाळे ३४० कि.मी. चेकरणार, २१ जलमार्गावरील २० टर्मिनल्सचे अद्ययावतीकरण, १९ नवीन जलमार्गावर २४ नवीन टर्मिनल्स, यासाठी ६६०० कोटी, मुंबईतील रेडिओ कानव येथील नवीन जेट्टी डिसेंबर २०२७ पर्यत पूर्ण करणारवडाळा, मुंबई येथे जागतिक दर्जाचे स्टार्टअप आणि इनोव्हेशन हबमुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनची ठाणे ते तलासरी मार्गावरील तीन स्थानके फेब्रुवारी २०२७ पर्यत पूर्ण होणार. विरार, बोईसर, ठाणे स्थानकाभोवती विकासाचा बृहद आराखडा तयार करणारअटलसेतूला जोडून २०० चौरस कि.मी. क्षेत्रात तिसरी मुंबई घडवणार : कर्नाळा, साई, चिरनेर नवनगर आणि नवी मुंबई विमानतळअधिसूचित क्षेत्र ही ग्रीनफिल्ड शहरे तयार करणारवाढवण बंदर चौथी मुंबई, लॉजिस्टीक्स आणि वेअर हाऊसिंगसाठी विकास केंद्र निर्माण करणार, वाढवण बंदरामुळे १२ लाखांहून अधिक रोजगार, मासेमारांसाठी सातपाटी येथे अत्याधुनिक मत्स्यबंदर, आसपासच्या ४४ गावांत कौशल्य विकासाचे उपक्रम राबविणारमरीन शिपयार्ड क्लस्टर विकसित करणारमुंबई महानगर प्रदेशात २० लाख झोपडपट्टांचा पुनर्विकास करणार, १० लाख परवडणारी घरांची निर्मिती करणार, नवीन झोपडपट्टी होणार नाही, यासाठी 'नो न्यू स्लम फ्रेमवर्क' प्रणालीवडाळा ते गेटवे ऑफ इंडिया मेट्रो ११ २३,४८७ कोटींचा संपूर्णभूमिगत प्रकल्प, याचा पुढे धारावी, वांद्रे स्थानक, वांद्रे टर्मिनस असा विकासमुंबई विमानतळ ते नवी मुंबई विमानतळ मेट्रो ८ २२,८६२ कोटीतळोजा ते खांदेश्वर नवी मुंबई मेट्रो २ : ५५७५ कोटी मुंबईतील भुयारी मार्ग ऑरेंज गेट, पूर्व मुक्तमार्ग ते मरीनड्राईव्ह, गोरेगाव-मुलुंड, ठाणे ते बोरीवली, खारघर ते तुर्भे, वांद्रे-वरळी सागरी सेतू ते हायस्पीड रेल्वेस्थानक वांद्रे-कुर्ला संकुल ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबईमुंबई महानगरात गायमुख जंक्शन ते फाऊंटेन हॉटेल जंक्शन ते पुढे भाईंदर असा अनुक्रमे ६ आणि ९ कि.मी.चा भुयारी मार्गउन्नत मार्ग : शिवडी-वरळी, ऐरोली कटाई नका, ठाणे ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, अटलसेतू ते मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, छेडानगर ते आनंदनगर व आनंदनगर ते साकेत, ठाणेसागरी सेतू मुंबई ते वाढवण बंदर जोडण्यासाठी उत्तन ते विरार सागरी सेतू ५८,७५४ कोटी, स्वातंत्र्यवीर सावरकर वांद्रे-वसोवा सागरी सेतू तसेच वर्सोवा-दहीसर-भाईंदर ही कामे वेगाने सुरुकिनारी मार्ग : बाळकुम ते गायमुख, उलवे किनारी मार्गकल्याण ते लातूर ग्रीनफिल्ड द्रुतगती महामार्ग तयार करणारपनवेल-कर्जत उपनगरीय प्रकल्प ३ वी १४,९०७ कोटी, यातूनबदलापूर-कर्जत, आसनगाव ते कसारा, पनवेल ते वसई, ६९ कि.मी.चा नवीन उपनगरीय कॉरिडॉरपुणे-लोणावळा तिसरी आणि चौथी रेल्वेमार्गिका, ५१०० कोटी, पिंपरी-चिंचवड, आकुर्डी, तळेगावला लाभपुणे मेट्रो टुप्पा २ खडकवासला स्वारगेट-हडपसर-खराडीच्यामेट्रोच्या हडपसर ते लोणी काळभोर आणि हडपसर बसडेपो ते सासवड रोड या प्रकल्पांना मंजुरी/रामवाडी ते वाघोली या ११ कि.मी. व्या मेट्रोला मंजुरी/येरवडा ते कात्रज आणि हिंजेवाडी ते सिंहगड रोड या ५४ कि.मी. च्या दुहेरी भुयारी मार्गाचा डीपीआर तयार करण्यात येत आहे. राज्यातील मेट्रो नेटवर्क १२०० कि.मी.वर नेणार, ६००० कि.मी. पेक्षा अधिकचे द्रुतगती मार्गाचे जाळे तयार करणारनवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर दुसऱ्या टप्प्याची कामे, पुरंदर विमानतळासाठी एसपीव्ही, गडचिरोली विमानतळासाठी भूसंपादन, लातूर, बारामती, अमरावती, यवतमाळ येथे नाईट लैंडिंग, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, कराड, नाशिक, शिर्डी, रत्नागिरी, अकोला, यवतमाळ विमानतळांच्या विस्ताराच्या कामांसाठी निधीयेरवाडा ते कात्रज भुयारी मार्गाचा डीपीआरपुणे ते शिरूर उन्नत मार्ग ५३ किमी. ७५१४ कोटी रुपयेतळेगाव-चाकण उन्नतमार्ग २५ कि.मी. ६४९९ कोटी रुपयेचाकण-शिक्रापूर मार्गाचे सहापदरीकरण २८ कि.मी. ५२३२ कोटी रुपयेशिरुर ते छत्रपती संभाजीनगर ग्रीनफिल्ड महामार्गाचे सहापदरीकरण : १९२ कि.मी. १४,८८६ कोटीछत्रपती संभाजीनगर विमानतळ ते वाळूज एमआयडीसी उन्नत मार्गाचे काम दोन टप्प्यात करणारहडपसर ते यवत सहापदरीकरण ३१.५० कि.मी. ५२६२ कोटी सोलापूर-तुळजापूर-धाराशिव ८४ कि.मी. चा रेल्वे मार्गसमृद्धी महामार्ग : नागपूर-गोंदिया, भंडारा-गडचिरोली, नागपूर-चंद्रपूर आणि वाढवण बंदाला जोडण्यासाठी तवा भरवीर मालवाहतूक कॉरिडॉरमुंबई महानगराच्या धर्तीवर पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर ग्रोथ हबनवीन नागपूर व्यापार व वित्तीय केंद्र महाराष्ट्र अमृतकाल रस्ते विकास योजना ६२७२ कि.मी. द्रुतगतीमार्ग, १४,९१९ कि.मी. चे राज्य आणि जिल्हा मार्ग तयार करणार१००० पेक्षा अधिक लोकसंख्येच्या गावांना कॉंक्रिट रस्त्यांनी जोडणार, आशियाई बँकेच्या मदतीने ४५०० कोटींचा कार्यक्रम मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-३ २३ हजार कि.मी.ची कामे करणार (यापूर्वी टप्पा १ मध्ये ३० हजार कि.मी, टप्पा-२ मध्ये २४५० कि.मी.ची कामे पूर्ण) प्रधानमंत्री ग्रामसडक योजना भाग ४ लोकवस्तीशी न जोडलेल्यावाड्या-वस्त्या वारमाही रस्त्याने जोडणार असल्याचे आश्वासन. ५ हजार पेक्षा अधिक लोकसंख्येच्या सर्व वस्त्या आणि ४२४७ कि.मी.चे 'पर्यटन परिरथ ने जोडणारअसल्याचे सांगितलेप्रधानमंत्री आवास योजना २७.८७ लाख घरांना मंजुरी, ३.५७ लाख घरे पूर्ण, पीएम-जनमन आवास योजनेत ५४,१२९ घरे देणाररत्ने व आभूषणे धोरणातून १ लाख कोटींची गुंतवणूक, ५ लाख रोजगारनिर्मिती करणारबांबू विकास प्रकल्प : ५०,००० कोटींची गुंतवणूक करुन ५ लाखरोजगारनिर्मिती करणार, औष्णिक विद्युत प्रकल्पात ५ ते ७ टक्के बांबू बायोमासच्या वापराचे उद्दिष्ट. जीआयएस, एमआयएस, ब्लॉकचेन, ड्रोन इत्यादीतून बांबू मूल्यसाखळीचा विकास करणारगडचिरोली स्टिल हब २.६१ लाख कोटींची गुंतवणूक, ७०,८९५सिंधुदुर्ग, रत्नागिरी या दोन जिल्ह्यांसाठी सिंधुरत्न समृद्ध योजना आणखी ३ वर्षासाठी राबविणार. कोकण विभागातील साकव बांधणी, दुरुस्तीसाठी विशेष कार्यक्रम राबवणार २०२९ पर्यत ५० टक्के आणि २०३५ पर्यत ६५ टक्के हरित ऊर्जा प्राप्त करण्याचे उद्दिष्ट, ३ लाख कोटींची गुंतवणूक अपेक्षितप्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज महाराष्ट्र देशात दुसरा, ४.५७ लाख भरगुती ग्राहकांकडून १७३५ मे.वॅ. रुफटॉप सोलार स्थापित, ३२०० कोटी रुपये सबसिडी प्राप्त. आता शून्य ते १०० युनिट वीज वापरणाऱ्यांसाठी स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासिय रुफटॉप सोलार योजना मंजूर, यात ५ लाख लाभार्थ्यांना ६३५ कोटींचे अनुदान देणार ५५ उदंचन प्रकल्पांसाठी करार, ७८,२१५ मे.वॅ. वीजनिर्मिती पेक्षित, १.२८ लाख कोटींची गुंतवणूक, ६ प्रकल्पांचे काम सुरु, यातून १०,३०० मे.वॅ. वीजनिर्मिती क्षमता निर्माणचंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर येथील सागवान वारशाचे जतन, संशोधन, जनजागृतीसाठी 'टिंबर म्युझियम व झायललेरियम उभारणार असल्याचे म्हटले आहे. जुने बाहन निष्कासित करुन नवीन वाहन खरेदी केल्यास मोटार वाहन करात १५ टक्के सूटनवीन वाहने खरेदी करताना बीएस-४ व त्यावरील प्रदूषण मानके असलेल्या वाहनांना मोटर वाहन करात १६ टक्के, बीएस-३ आणि त्याखालील प्रक्षण मानके असलेल्या वाहनांना मोटर वाहन करात ३० टक्के सूटबीएस-४ व त्याखालील वायूप्रदूषणाची मानके असलेल्या परिवहनेतर खाजगी संवर्गातील वाहनांमुळे वायु प्रदूषण होत असल्याने अशा वाहनांवर पर्यावरण करामध्ये दुचाकी वाहनावर २००० रुपयांवरुन ४००० रुपये, हलकी मोटर वाहने ३००० वरुन ६००० रुपये, डिझेल हलकी मोटर वाहनांवर ३५०० वरुन ७००० रुपये करवाढ प्रस्तावित १२) सुशासन/गतिमानतापारदर्शक, गतिमान आणि उत्तरदायी सुशासनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सेवाप्रवेश नियमांचे एकत्रिकरण, प्रमाणीकरण, सुलभीकरण केले जाणारमहायुती सरकारमध्ये आतापर्यत १ लाख २० हजार पदभरती, आता आणखी ७५,००० पद्भरती करणार असल्याची घोषण करण्यात आली पण यासाठी पैसे कुठून येणार हे मात्र सांगितले नाही.

# राजकारण, समाजकारण, शैक्षणिक व साहित्य क्षेत्रात मूल्याधिष्ठीत संस्कृती जपणारे नेतृत्व हरवले!



मा. जे. एम. वाघमारे सर हे केवळ प्रशासक, प्राचार्य, कुलगुरू, लोकप्रतिनिधी एवढ्यापुरते मर्यादित न राहता मूल्ये, माणुसकी, विचार आणि राष्ट्रनिर्मिती यांचा दीप प्रज्वलित करणारे नेतृत्व होते. सर नेहमी सांगत,जीवन जगताना मूल्ये जपली पाहिजेत. द्वेष नव्हे, माणुसकी जपली पाहिजे. राजकारण हे पवित्र सेवेचे माध्यम असले पाहिजे. हीच भूमिका त्यांनी आयुष्यभर आपल्या कृतीतून दाखवली. शिक्षण हेच जीवनाचे केंद्र आहे मा. वाघमारे सरांचे संपूर्ण आयुष्य शिक्षण, ग्रंथ, विचार आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याभोवती फिरत राहिले. ते कायम पुस्तकांच्या, ग्रंथांच्या आणि वैचारिक सानिध्यात राहिले. त्यांचा ठाम विश्र्वास होता की विद्यार्थी घडला तर समाज घडतो आणि समाज घडला तर देश घडतो. लातूरच्या शैक्षणिक परंपरेला नवी ओळख - राजर्षि शाहू महाविद्यालय, लातूर येथे प्राचार्य म्हणून कार्यरत असतानाच सरांनी लातूरच्या शैक्षणिक चळवळीला नवी दिशा दिली. याच काळात पुढे संपूर्ण देशात ओळख निर्माण करणारा लातूर पॅटर्न विकसित झाला. या पॅटर्नच्या माध्यमातून विशेषतः वैद्यकीय आणि अभियांत्रिकी क्षेत्रात हजारो विद्यार्थ्यांना यशाचा मार्ग मिळाला. लातूर ही शैक्षणिक पंढरी म्हणून ओळखली जावी, हे स्वप्न सरांनी प्रत्यक्षात उतरवले. विद्यापीठ पातळीवर ऐतिहासिक नेतृत्व - मराठवाड्यात नव्याने स्थापन झालेल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे पहिले कुलगुरू होण्याचा बहुमान मा.जे.एम. वाघमारे सरांना मिळाला. कुलगुरू म्हणून त्यांनी, आधुनिक शैक्षणिक सुविधा उभारल्या, नवे अभ्यासक्रम सुरू केले, गुणवत्तावाढीवर भर दिला, डब्लूपीसी व कॉपीमुक्त परीक्षा पद्धती राबवली, प्रशासनात पारदर्शकता आणि शिस्त निर्माण केली हे निर्णय त्या काळात धाडसी आणि दिशादर्शक ठरले. शिक्षणातून थेट लोकसेवेकडे- कुलगुरूपदाचा कार्यकाल पूर्ण झाल्यानंतर सन २००१ मध्ये मा शरदचंद्रजी पवार साहेब यांनी आग्रह करून त्यांना नगराध्यक्षपदाची निवडणूक लढवावी असा आग्रह धरला तर माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर साहेब यांनी या निवडणूकीत तन-मन-धनाने साथ देऊन त्यांना निवडून आणले सरांनी नगरपालिकेच्या राजकारणात प्रवेश केला. लातूर नगर परिषदेची निवडणूक त्यांनी जनतेतून लढवली. त्या वेळी लातूरचे नेते आदरणीय विलासराव देशमुख साहेब हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते त्यांनीच पहिल्यांदा निवडणूका सोप्या जाव्यात म्हणून जनतेतून नगराध्यक्ष निवडण्याचा कायदा लागू केला होता अशा परिस्थितीत वाघमारे सर हे दहा हजार मतांनी निवडून आले होते हे या निवडणुकीचे वैशिष्ट्ये होते वरती सीएम खाली जे. एम. अशा घोषणांनी वातावरण रंगून गेले होते. सर बहुमताने नगराध्यक्ष म्हणून निवडून येऊनही नगरसेवकांमध्ये विरोधी पक्षाचे संख्याबळ अधिक असताना सुद्धा सरांनी संयम, शिस्त आणि संवाद यांच्या जोरावर नगरपरिषदेला आदर्श कार्यसंस्कृती दिली. नगरपरिषद कार्यकाळात, पारदर्शक प्रशासन, नियमबद्ध कामकाज, सर्वसामान्य नागरिकांना न्याय, राजकारणात सुसंस्कृत भाष्य, यामुळे लातूर नगरपरिषदेला नावलौकिक मिळाला.देश-विदेशात शैक्षणिक योगदान - प्राचार्य, कुलगुरू, लोकप्रतिनिधी आणि मार्गदर्शक या विविध भूमिकांमध्ये कार्य करत असताना सरांनी , महाराष्ट्रातच नव्हे तर देश व परदेशातही शैक्षणिक क्षेत्रात नेतृत्व केले, शैक्षणिक, सामाजिक आणि साहित्यिक चळवळीला बळ दिले, सुमारे पंधरा लाखांहून अधिक विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष योगदान दिले ८० ग्रंथसंपदा-वैचारिक ठेवा व सुमारे ८० ग्रंथांचे लेखन करून डॉ.वाघमारे सरांनी शिक्षण, समाज, संस्कृती, मूल्यशिक्षण आणि राष्ट्रनिर्मिती या विषयांवर मौलिक विचार मांडले. त्यांची ग्रंथसंपदा ही पुढील पिढ्यांसाठी वैचारिक मार्गदर्शक ठरते. आदर्श समाज निर्मितीचा ध्यास राजकारण असो वा शिक्षण सरांचा केंद्रबिंदू एकच होता आदर्श समाज निर्मिती.द्वेषमुक्त विचार, संवादातून समस्या सोडवण्याची भूमिका, आणि सार्वजनिक जीवनात आचार संहिता ही त्यांची खरी ओळख होती. मा. जे. एम. वाघमारे सर हे केवळ एका पदाचे नाव नव्हते, ते एक विचारधारा, एक संस्कारशील नेतृत्व आणि एक मूल्याधिष्ठित परंपरा जपणारे व्यक्तीमत्व होते. शिक्षणातून माणूस घडवणे, माणसातून समाज घडवणे, व समाजातून राष्ट्र घडवणे हा त्यांचा जीवनमंत्र आजही हजारो विद्यार्थ्यांच्या यशामध्ये जिवंत आहे. सरांच्या अकाली जाण्याने शिक्षण व राजकारण क्षेत्रात एक पोकळी निर्माण झाली आहे ही कधीही भरून निघणार नाही.

**- प्राचार्य मारुती सूर्यवंशी, श्री स्वामी विवेकानंद ज्युनिअर कॉलेज एमआयडीसी लातूर**

# वाहतूक समस्येवर महापालिका व वाहतूक पोलिसांनी संयुक्तिक मार्ग काढावा, अन्यथा अवजड वाहतूक रोखली जाईल; महापौर नारायण चौधरी यांचा इशारा




**भिवंडी : वार्ताहर**

भिवंडी शहरात वाहतूक कोंडी ही नित्याची बाब झाली आहे.यावर उपाय योजना करण्यात स्थानिक पालिका प्रशासन व वाहतूक पोलीस यांच्या उपायोजना कुचकामी ठरत असल्याने महापौर नारायण चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली पालिका अधिकारी व वाहतूक विभागाचे पोलीस अधिकारी व स्थानिक पोलीस ठाण्याचे प्रभारी यांच्या संयुक्त बैठकीत वाहतूक समस्येवर पालिका व वाहतूक पोलिसांनी संयुक्तिक मार्ग काढावा अन्यथा शहरात येणारी अवजड वाहन रस्त्या बाहेर रोखण्याचे काम आम्ही करू असा इशारा महापौर नारायण चौधरी यांनी दिला आहे. वाहतूक समस्येवर मार्ग काढण्यासाठी पालिका व पोलिस विभागाच्या संयुक्त बैठकीत महापौर नारायण चौधरी बोलत होते. या बैठकीस आमदार महेश चौघुले,आयुक्त अनमोल सागर, उपमहापौर तारिक मोमिन, वाहतूक विभागाचे सहाय्यक पोलिस आयुक्त शरद ओव्हाळ, वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक किशोर खरात, कोनगाव शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुधाकर यादव, भोईवाडा पोलिस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक रत्नपारखी,निजामपूर पोलिस ठाणे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विश्वास डगळे, शांतीनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विनायक गायकवाड,उपायुक्त विक्रम दराडे, कार्यकारी अभियंता जमील पटेल, अतिरिक्त कार्यकारी अभियंता सचिन नाईक, पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संदीप पटनावर, नगररचनाकार अजय साबळे विश्व प्रभागांचे सहाय्यक आयुक्त उपस्थित होते.

शहरात अनधिकृत रिक्षा व वाहनांवर कारवाई केल्यानंतर त्यांना ठेवण्यासाठी जागा उपलब्ध नसल्याने कारवाई करण्यात अडचणी येत असून, शहरात पार्किंग झोन नसण्याने रस्त्यावर उभी असणारी वाहने, फेरीवाला क्षेत्र निश्चित नसल्याने रस्त्यात ठिकठिकाणी उभे असलेल्या हातगाड्या फेरीवाले व ठिकठिणी खोदून ठेवलेले रस्ते व उड्डाणपूल अवजड वाहनांसाठी बंद असल्यामुळे वाहतूक कोंडी होत असून त्यास अटकाव घालण्याची पालिका प्रशासनाची जबाबदारी आहे असं वक्तव्य वाहतूक विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त शरद ओव्हाळ यांनी केले. शहरातील अनधिकृत रिक्षांवर मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्याची गरज असून वाहतूक नियम मोडणाऱ्या वाहन चालकांवर वाहतूक शाखेने सर्रास पणे दंडात्मक कारवाई करावी, दररोज शेकडो अनधिकृत विना परवाना सुरू असलेल्या रिक्षा जप्त कराव्यात त्यांना ठेवण्या साठी पालिका प्रशासनाने जागा उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार महेश चौघुले यांनी केली. पार्किंग झोनचा अधिकाधिक वापर कसा होईल यासाठी प्रयत्न पोलिस व पालिका कर्मचाऱ्यांनी करणे गरजेचे असल्याचे आयुक्त अनमोल सागर यांनी सांगत यापुढे रस्ता खोदकाम करताना वाहतूक पोलिसांची परवानगी सुद्धा आवश्यक करण्यात येईल असे स्पष्ट केले. तर अनधिकृत जप्त केलेली वाहने ठेवण्यासाठी भोईवाडा पोलिस ठाणे हद्दीत जागा उपलब्ध करून देत असतानाच तेथे सुरक्षेची जबाबदारी पालिका प्रशासन सांभाळेल असे सांगत, पालिका प्रभाग समिती निहाय सहाय्यक आयुक्त व मार्केट विभाग यांनी संयुक्तपणे रस्त्यावर अनधिकृत अतिक्रमण करणाऱ्या वाहनांसह इतर आस्थापनांवर कारवाई तत्काळ सुरू करावी असे आदेश आयुक्त अनमोल सागर यांनी दिले. शहरातील वाहतूक कोंडी सोडवण्याची वाहतूक पोलिस व पालिका प्रशासन या दोन्ही यंत्रणेची जबाबदारी आहे. त्यासाठी सर्वांनी संयुक्त कारवाई करावी विशेषतः शहरातून दिवसा सुरू असलेली अवजड वाहनांची वाहतूक पोलिसांनी थांबवणे गरजेचे आहे. त्यामध्ये कुचराई झाल्यास आम्ही स्वतः शहरातील सर्व रस्त्यांवर बेरेकेटिंग करून अवजड वाहनांची वाहतूक रोखू असा इशारा महापौर नारायण चौधरी यांनी दिला आहे.

# देवणी मांजरा नदीतील अवैध वाळू उपसा सुरूच
## तहसीलदारांनी तात्काळ कारवाई करण्याची मागणी



**देवणी : वार्ताहर**

तालुक्यातील मांजरा नदी काठावर दोन तीन जागी नियमानुसार वाळू उपसा निविदा प्रक्रियेद्वारे कंत्राट सुटले आहेत. शासकीय नियमानुसार या ठिकाणी बोट बसवून वाळू उपसा करता येत नाही वाळू उपसा करण्यासाठी बोटची परवानगी नसतानाही देवणी तहसीलदारांच्या आशिर्वादामुळे बोट लावून अनधिकृत वाळू उपसा केला जात आहे. त्यामुळे ज्या शासकीय कंत्राटदाराने अनधिकृत बोटी लावल्या आहेत. त्यावर कारवाई करून देवणी तालुक्यात गैरकृत्य करणाऱ्या तहसीलदार यांची चौकशी करावी अशी मागणी होत आहे देवणी तालुक्यात रमाई आवास योजनेअंतर्गत व प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत बरेच घरकुलाचे काम चालू आहेत. या लाभार्थ्याला ६०० रुपये प्रति ब्रास दराने वाळू उपलब्ध करून द्या असे शासकीय परिपत्रक असताना सुद्धा तालुक्यात मुबलक वाळू उपसा होतंअसताना तहसीलदार हे या शासकीय परिपत्रकांची अंमलबजावणी करीत नाहीत बोटीची परवानगी नसताना त्यांना वाळू उपसा करणाऱ्या वाळू तस्करांना सहकार्य करीत आहेत. त्यामुळे तहसीलदारांच्या कृष्ण कृत्याची चौकशी करा अशी मागणी केली जात आहे. रमाई व प्रधानमंत्री आवास योजने तील बऱ्याच लाभार्थ्यांनी तहसीलदार साहेब आम्हाला शासकीय नियमानुसार वाळू डेपो उभारून माफक शासकीय ६०० रुपये दरात वाळू उपलब्ध करून द्या, शासकीय परिपत्रकाचे पालन करा अशी विनंती केली जात आहे, मात्र तहसीलदार यांच्याकडून तालुक्यात वाळू उपलब्ध नाही, वाळू नसल्याचे उडवाउडवीचे उत्तरे दिली जात आहेत लाखोचा शासकीय महसूल बुडवून शासनाच्या डोळ्यात धुळफेक करणाऱ्या तसेच कंत्राटदारांना सहकार्य करणाऱ्या तहसीलदारांची चौकशी करा अशी मागणी जोर धरित आहे, मांजरा काठावर वसलेल्या बऱ्याच गावात वाळूचे साठे करून ठेवले गेले आहेत, ते वाळू साठे जप्त करून घरकुलासाठी देण्यात यावे, रात्री बेरात्री बोटी व वाळूच्या गाड्या पकडून कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी घरकुल लाभधरकातून होत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज स्मारक स्व.मीनाताई ठाकरे रंगायतन उभारण्याची शिवसेना ठाकरे गटाची मागणी



**भिवंडी : वार्ताहर**

भिवंडी शहरातील प्रमुख मानबिंदू म्हणून ओळखले जाणारे छत्रपती शिवाजी महाराज यांचे पूर्णाकृती पुतळ्याचे स्मारक तातडीने उभारण्यात यावे तर आठ वर्षापासून बंद पडलेल्या स्व.मीनाताई ठाकरे रंगायतनची दुरुस्ती तातडीने पूर्ण करून सुरू करावे अशी मागणी शिवसेना उ बा ठा गटाचे उपनेते विश्वास थळे यांनी भिवंडी महापौर नारायण चौधरी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी त्यांच्या सोबत पक्षाचे तालुका प्रमुख करसन ठाकरे, जिल्हा सचिव जय भगत, तालुका सचिव दीपक पाटील, पंचायत समितीचे माजी सभापती विकास भोईर, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक मोहन म्हणेरा, चक्रधरी पाटील आदी उपस्थित होते. शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौका मधील छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा भिवंडीतील ऐतिहासिक ओळख काही दिवसां पासून नजरेआड झाली आहे. त्या पुतळ्याची पुर्नस्थापना लवकरात लवकर व्हावी,आणि भिवंडीतील नागरीकांच्या आनंदात भर पडावी अशी अपेक्षा विश्वास थळे यांनी व्यक्त केली.तर भिवंडी शहरातील समस्त नागरीकांना मनोरंजनासाठी स्व. मीनाताई ठाकरे रंगायतन नाट्यगृह हे आठ वर्षापासून आज पर्यंत बंद आहे. भिवंडी शहरातील नागरीकांचा शैक्षणिक, सामाजिक,सांस्कृतीक उपक्रम सादर करण्याचे ते हक्काचे ठिकाण बंद असल्याने नागरिकांचा आनंद हिरावून घेतल्यासारखे आहे.स्व. मीनाताई ठाकरे रंगायतन ही भिवंडीतील सांस्कृतीक वास्तू आहे.ती लवकरात लवकर सुरू व्हावी अशी मागणी केली आहे.लवकरच या दोन्ही कामांचा आपण व्यक्तिशः आढावा घेऊन लवकरात लवकर दोन्ही काम मार्गी लागतील असे आश्वासन महापौर नारायण चौधरी यांनी दिले आहे.

# विलासराव देशमुख फाउंडेशनतर्फे ७४ महिलांना शिलाई प्रशिक्षण प्रमाणपत्र प्रदान




**लातूर : वार्ताहर**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून लातूर शहरात महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने प्रभाग क्रमांक १७ मधील तुळजाभवानी नगर येथे राबविण्यात आलेल्या मोफत शिलाई प्रशिक्षण केंद्राचा समारोप सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला. या उपक्रमांतर्गत ७४ महिलांनी आपले प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले असून, त्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांनी केवळ गृहिणी न राहता आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हावे, हा 'विलासराव देशमुख फाउंडेशन'चा मुख्य उद्देश आहे. राज्याचे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ट्वेंटीवन ग्री लि.च्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या विशेष पुढाकारातून हा उपक्रम राबवण्यात आला. कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून महिलांना घरबसल्या सन्मानाने रोजगार मिळवता यावा, या विचारातून या मोफत केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे. या प्रशिक्षण केंद्रामध्ये महिलांना केवळ प्राथमिक शिलाई न शिकवता, व्यावसायिक दृष्टिकोनातून तयार करण्यात आले. तीन महिन्यांच्या या सखोल अभ्यासक्रमात कपड्यांच्या अचूक मापांनुसार कटिंग करण्याचे तंत्र, बाजारपेठेतील मागणीनुसार नवनवीन फॅशन डिझाइन्स तयार करणे, शिलाई कामातून स्वतःचा लघुउद्योग कसा सुरू करावा, याचे मार्गदर्शन देण्यात आले. प्रशिक्षक क्रांती उफाडे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे प्रशिक्षणार्थी महिलांनी शिलाई कलेतील बारकावे आत्मसात केले असून, आता त्या स्वतःचे कापड दुकान किंवा बुटीक सुरू करण्यास सज्ज झाल्या आहेत. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांचा गौरव करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात अनेक मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली. प्रमुख पाहुण्या म्हणून लातूर शहर महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगरसेविका तबस्सुम शेख उपस्थित होत्या. त्यांनी महिलांशी संवाद साधताना सांगितले की, आजच्या युगात महिलांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे ही काळाची गरज आहे आणि फाउंडेशनचा हा उपक्रम त्या दिशेने टाकलेले एक आश्वासक पाऊल आहे. यावेळी विलासराव देशमुख फाउंडेशनच्या विभाग प्रमुख संगीता मोळवणे, चंद्रज्योती बिराजदार, विक्रम बिराजदार, प्रशिक्षक क्रांती उफाडे, गजानन बोयणे, सोमनाथ कावळे यांच्यासह भागातील प्रतिष्ठित नागरिक आणि मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. प्रमाणपत्र प्राप्त केल्यानंतर महिलांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आत्मविश्वास दिसून येत होता. घरची परिस्थिती बेताची असताना बाहेर जाऊन काम करणे कठीण होते, मात्र या प्रशिक्षणाने आम्हाला घरबसल्या पैसे कमवण्याची संधी मिळवून दिली आहे, अशी भावना अनेक प्रशिक्षणार्थी महिलांनी व्यक्त केली. विलासराव देशमुख फाउंडेशनच्या या उपक्रमामुळे प्रभाग १७ मधील ७४ कुटुंबांना आता आर्थिक हातभार लागणार असून, महिला सक्षमीकरणाचा हा 'लातूर पॅटर्न' जिल्ह्यासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

### विरार येथे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कारवाई
# वसई विरार मध्ये १०९ तळीरामांवर पोलिसांचा बडगा



**विरार : वार्ताहर**

होळी सणाच्या पार्श्वभूमीवर, मीरा-भाईंदर वसई-विरार आयुक्तालयाच्या अंतर्गत वाहतूक विभाग ३ ने विरार पूर्व येथील आरजे सिग्नल नाका येथे विशेष तपासणी मोहीम राबवली. उत्सवादरम्यान संभाव्य अपघात आणि गोंधळ टाळण्यासाठी या मोहिमेत शेकडो वाहनचालकांना दंड ठोठावण्यात आला. या नेमण्यात आलेल्या पथकांकडून मद्यपी वाहनचालकांवर करडी नजर ठेवण्यात आली होती. ब्रीथ ॲनालायझर यंत्राद्वारे वाहनचालकांची तपासणी सुरू होती. वसई वाहतूक विभागाच्या अखत्यारीत ५२ वाहन चालक मद्यपान करताना आढळून आले.तर विरार वाहतूक विभागाच्या अखत्यारीत ५७ मद्यपी अशा एकूण १०९ जणांवर कारवाई करण्यात आली असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. मद्यपान करून वाहन चालवणाऱ्या चालकांविरोधात ही विशेष मोहीम राबविण्यात आली असून संबंधितांवर मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पोलीस प्रशासनाकडून अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. वाहतूक पोलिस निरीक्षक महेश शेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष मोहीम राबविण्यात आली. मोहिमेचा एक भाग म्हणून, फुलपाडा आरजे सिग्नल परिसरात कडक नाकाबंदी करण्यात आली आणि दुचाकी आणि चारचाकी वाहनांची कसून तपासणी करण्यात आली. वाहतूक कर्मचारी रमेश तलवारे, राम रंधवे, संतोष चकोर आणि इतर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे ही कारवाई केली. तपासणी दरम्यान, हेल्मेटशिवाय गाडी चालवणे, ट्रिपल सीटवर गाडी चालवणे, सीटबेल्ट न लावणे, मद्यपान करून गाडी चालवणे आणि आवश्यक कागदपत्रे जवळ बाळगणे अशा प्रकरणांवर कडक कारवाई करण्यात आली. अनेक वाहनचालकांना जागेवरच चालान बजावण्यात आले, तर काही प्रकरणांमध्ये वाहने जप्त करण्यात आली. वाहतूक विभागाने स्पष्ट केले की होळीसारख्या सणांमध्ये निष्काळजीपणामुळे रस्ते अपघातांचे प्रमाण वाढते आणि हे रोखण्यासाठी ही विशेष मोहीम सुरू करण्यात आली. या कारवाईदरम्यान, पोलिसांनी वाहनचालकांना वाहतूक नियमांची जाणीवही करून दिली. अधिकाऱ्यांनी लोकांना रंगांचा सण सुरक्षितपणे साजरा करण्याचे आणि हेल्मेट आणि सीटबेल्टचा अनिवार्य वापर यासह वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आणि मद्यपान करून गाडी चालवणे टाळण्याचे आवाहन केले. वाहतूक विभाग ३ च्या या कडक कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आणि अनेक बेपर्वा वाहनचालक अधिक सतर्क झाले. रस्ता सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आणि नागरिकांना सुरक्षित वातावरणात हा सण साजरा करता यावा यासाठी येत्या काळात अशा विशेष मोहिमा सुरू राहतील असे संकेत विभागाने दिले आहेत.

# दिव्यांगांचा महापालिका मुख्यालयासमोर ठिय्या आंदोलन



**उल्हासनगर : वार्ताहर**

प्रहार जनशक्ती पक्षाच्या नेतृत्वाखाली दिव्यांगांनी आज उल्हासनगर महापालिका मुख्यालय समोर आंदोलन केलं, विशेष करून स्वयंरोजगाराच्या मागणीसाठी अपंगांना स्टॉल उपलब्ध करून देण्यास होत असलेला विलंब यामुळे दिव्यांग बांधव आक्रमक झाले होते. त्यामुळे यांनी महापालिका प्रशासनाविरोधात ठिय्या आंदोलन केलं. अनेक दिव्यांग व्हील चेअरवर बसून या आंदोलनात सहभागी झाले होते. गेल्या चार वर्षापासून महापालिकेच्या दिव्यांग विभागाकडून दिव्यांगांना स्टॉल उपलब्ध करून देण्यात आलेले नाहीत, शिवाय दिव्यांगांना मिळणारे मानधन देखील वाढवण्यात आलेले नाही. तसेच महापालिका अधिकाऱ्यांनी दिव्यांगांसाठी असलेल्या साहित्य खरेदीत कोट्यवधीचा भ्रष्टाचार केल्याचा गंभीर आरोप देखील आंदोलकांनी केला. आपल्या मागण्या तात्काळ मान्य कराव्यात, अन्यथा आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा दिव्यांग बांधवांनी यावेळी दिला आहे. यावेळी प्रहार पक्षाचे पदाधिकारी तसेच सुरेश मोकळ, रमाकांत सुतार, निलेश जाधव बबलू बेनिवाल व असंख्य दिव्यांग बांधव उपस्थित होते.

# 'घनकचरा व मलजल व्यवस्थापन व पुनर्विकास' शिबीर-प्रदर्शनाचे महापौर यांच्या हस्ते उद्घाटन





**वसई : वार्ताहर**

वसई विरार शहर महानगरपालिका आणि युनिट्रॅक मिडिया तसेच वसई तालुका हौसिंग फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'घनकचऱ्याचे व्यवस्थापन व मलजल व्यवस्थापन आणि पुनर्विकास' या विषयावर नागरिकांसाठी मोफत भव्य शिबिराचे व प्रदर्शनाचे आयोजन शनिवार दि.२८ फेब्रुवारी व रविवार दि.०१ मार्च २०२६ रोजी सकाळी ११.०० ते रात्री ०८.०० या वेळेत वसई विरार शहर महानगरपालिका मुख्य कार्यालय, दुसरा मजला, यशवंत नगर, विरार (पश्चिम) येथे करण्यात आले आहे. शनिवार दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी या शिबिर -प्रदर्शनाचे उद्घाटन वसई विरार शहर महानगरपालिकेचे महापौर अजीव पाटील, उप महापौर मार्शल लोपीस, मा.माजी महापौर राजीव पाटील, अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, अतिरिक्त आयुक्त दिपक सावंत व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. सदर प्रदर्शनामध्ये घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत खत निर्मिती करिता असलेले विविध तंत्रज्ञान व यंत्रणे विविध कंपन्यामार्फत मांडण्यात आले आहे. तसेच सौर उर्जा, पाणी व सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत रेन वॉटर हार्वेस्टींग तसेच गृहनिर्माण संस्थेचे पूर्न:विकास या विविध विषयांसबंधित प्रदर्शन मांडण्यात आलेले आहे. तसेच वसई तालुका हॉसींग फेडरेशनमार्फत गृहनिर्माण संस्थांशी सबंधित असलेल्या समस्यांचे निवारण करणेकरिता व घनकचरा व्यवस्थापन (ओल्या कचरापासून खत निर्मिती व सुखा कचऱ्याचे पुनर्वापर), पाणी व सांडपाणी व्यवस्थापन अशा विविध विषयांवर मार्गदर्शन करणेकामी सेमिनार (चर्चासत्र) आयोजित करण्यात आलेले आहे. सदर प्रदर्शन व सेमिनार दि. २८/०२/२०२६ ते दि. ०१/०३/२०२६ रोजी स. ११.०० ते सांय. ८.०० वाजेपर्यंत वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, यशवंतनगर, विरार (प.) नागरीकांसाठी उपलब्ध असणार आहे. तरी या शिबीर-प्रदर्शनाला महानगरपालिका क्षेत्रातील सर्व सर्व नागरिकांनी भेट द्यावी, असे आवाहन वसई विरार महापालिकेमार्फत करण्यात येत आहे.

09 TO 15 MARCH 2026 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 3/7/2026 8:23 PM Page 1



पान १ वरून....

## चारित्र्याचा संशय काळ ठरला...

खेडेगावातील विनोद राठोड याचा विवाह गेल्या १५ वर्षापूर्वी रुक्मीणीशी झाला. दोघांचा संसार बहरत फुलत असताना त्यांना दोन मुली आणि एक मुलगा अशी अपत्ये झाली. त्यातच घरची थोडी फार शेती जरी असली तरी त्यावर उपजिविका चालणे थोडेसे कठीण होते. मुली आणि मुलगा मोठे होत असल्याने त्यांच्या शिक्षणाचा ही खर्च होता. गावात सुरूवातीला दोघे नवरा बायको गावात मोलमजुरी करीत होते. परंतु त्यातून संसाराचा गाडा हाकत असताना कसरत करावी लागत होती. म्हणून विनोद याने मोलमजुरीसाठी गोव्याला जाण्याचा निर्णय घेतला. कारण गावातील त्याचे मित्र ही गोव्यातच मोलमजुरीसाठी गेले होते. तेथे ते चांगले पैसे कमवत असल्याचे विनोदला माहित होते. म्हणून तो ही पत्नी मुलांना घेऊन गोव्यात मोलमजुरी करण्यासाठी गेल्या चार पाच वर्षापूर्वी आला. गोव्यात आल्यानंतर पती पत्नी हे साळगाव जवळील मुड्डोवाडी येथे भाडयाने खोली करून राहू लागले. गोव्यातच त्यांनी मुलांना शिक्षणसाठी घातले. मुलांचे शिक्षण चालू असल्याने रोज सकाळी मुले शाळेला जात येत होते.तर नवरा बायको दररोज मोलमजुरी करू लागले. मोलमजुरी करीत असताना विनोदला दारू पिण्याचे व्यसन लागले तो रोज सकाळ संध्याकाळ दारू पिऊन घरात बायकोबरोबर भांडण करू लागला. घर भाडयाचे असल्याने प्रत्येक महिन्याला भाडे वेळेवर दयावे लागत होते. त्यातून मुलांच्या शिक्षणाचा खर्च होता. विनोदच्या मजुरीचा पैसा सगळा दारूच खर्च होऊ लागला होता. म्हणून रुक्मीणी त्याच्याशी या कारणातून भांडण काढत होती. ती त्याच्याकडे सारखे घरखर्चाला पैसे मागत होती. त्यात तिचे गैर असे काहीच नव्हते. परंतु विनोदच्या हातात दारुच्या व्यसनाने पैसे टिकत नसल्याने तो तिच्या सततच्या भांडणाला वैतागलेला होता. तो रोज रात्री दारू पिऊन रुक्मीणीला मारहाण करीत शिवीगाळ करीत होता. नवरा बायकोची सारखी भांडणे होत असल्याने घर मालकाने त्यांना आपली खोली रिकामी करण्यास सांगितले होते.तसे विनोद आणि त्याची बायको या महिन्या अखेरीस ती खोली रिकामी करणारच होते. त्यातच विनोद हा कामानिमित्य फेब्रुवारीच्या पहिल्या आठवडयात आपली गावी म्हणजे गदग येथे गेला होता.तो २२ फेब्रुवारीला परत गोव्यात आला होता. गेल्या महिनाभर रुक्मीणी ही गोव्यात आपल्या मुलासोबत एकटीच होती. कसे तरी करून ती मोलमजुरी करीत घराचा संसार करीत होती. पण त्याचे सोयर सुतक विनोदलला नव्हते. तो हल्ली तर तिच्या चारित्र्यावर ही संशय घेत होता. तु गोव्यात येवून धंदाच करतेस असे तो तिच्यावर संशय घेऊन बोलत होता. याचा राग तिला येत होता. कामाचे सगळे पैसे तो दारू पिण्यात खर्च करीत असल्याने ती त्याचेवर चिडत होती. परंतु तो तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन वेगळाच अर्थ काढत होता. एवढया लांब आपण गाव सोडून पैशासाठी येथे कामाला आलो आहे आणि हा नवरा नुसता दारू पिऊन पैसे खर्च करीत आहे म्हणून ती त्याच्यावर चिडत होती. त्याच्याबरोबर भांडत होती. त्याच्याकडे सारखे पैसे मागत होती. खरे तर ती पैसे घर संसारासाठी मागत होती. विनोद याचा स्वभाव हा रागीट आणि भांडखोर असल्याने तो काही भांडणात नमते घेत नव्हता. मुले मुली मोठी होत आली आहेत नवऱ्याने संसाराला हातभार लावावा म्हणजे मुलीच्या लग्नाची काही तरी बेजमी होईल या विचारात ती होती. परंतु तो रात्र आणि दिवस दारू पित असल्याने तीचा भ्रमनिरास होत होता. संसार म्हटले की भांडयाला भांडे लागणार त्याचा आवाज होणार हे दोघांना ही माहित होते. परंतु बायको विनाकारण सारखी आपल्याकडे पैसे मागत असते याचा त्याला राग येत होता. पैशांसाठी तिचा वणवा त्याला नको होता. तो भांडणात मी तुला काही पैसे देणार नाही तुझी मुले तुझा संसार तुझे तु बघ असे म्हणून तो हात झटकत होता. तो गावाकडे गेला असताना त्याच्या घरच्या लोकांनी आणि रुक्मीणीच्या माहेरच्या लोकांनी ही त्याला समजावून सांगितले की तु बाबा दारू पिऊ नकोस आणि रुक्मीणीला मारहाण करून त्रास देवु नकोस. तरी ही तो कोणाचे काही ऐकत नव्हता. तो आपल्या मनासारखेच वागत होता.त्याचे दारूचे व्यसन सुटत नव्हते.त्यासाठी तो पाण्यासारखा पैसा खर्च करीत होता. बायको म्हणून नवऱ्याला वठणीवर आणण्याचा प्रयत्न ती करीत होती. पण तो काही सरळ साधा माणुस नव्हता. त्याला एकदा लागलेली सवय सुटत नव्हती.इकडे रुक्मीणी त्याच्याकडे पैसे मागायचे काही सोडत नव्हती. मी असताना तुला पैसे कशाला लागतात असे तो तिला म्हणत होता. फेब्रुवारीच्या २२ तारखेला तो गावाकडून गोव्यात आला. त्याचे मन काही स्थिर नव्हते. तो गोव्यात आल्यापासून जास्तच दारू पिऊ लागला होता.तो दारू पिऊन आला की, रुक्मीणी त्याच्यासोबत भांडण करीत होती. शुक्रवार दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी रुक्मीणी ही घरात एकटीच होती. दोन्ही मुली आणि मुलगा शाळेला गेली होती. सकाळ पासूनच रुक्मीणीने पैशासाठी नवरा विनोदच्या मागे कटकट लावलेली होती. त्यातच तो आज सकाळ पासूनच दारूच्या नशेत होता. दोघांची भांडणे आणि वादावादी होत होती.कन्नड मध्ये ती त्याला शिव्या देत होती तर तिच्या विषयी वेगळेच बोलत तिच्या चारित्र्यावर संशय घेत होता. दारू पिण्यासाठी पैसे येतात आणि घर खर्चाला पैसे देत नाहीस म्हणून ती त्याच्यावर वैागतलेली वैतागलेली होती.दारू पिण्याच्या ऐवजी मुत पित जा. भाडया असे तिने त्याला कन्नडमध्ये बोलून शिव्या दिले. याचा राग त्याला आला तो रुक्मीणीच्या अंगावर मारायला गेला. तो तिला खाली पाडून लाथा बुक्यांनी मारत होता. ती त्याला कन्नडमध्ये शिव्या देत होती. रागाच्या भरात त्याने घरातील सुरी घेतली आणि रुक्मीणीच्या गळयावर सरर्कन फिरवली. त्यासरशी तिच्या गळ्यातून रक्ताची चिळकांडी उडाली. ती ओरडत खाली जमीनीवर पडली. तिच्या गळ्यातून मोठया प्रमाणात रक्ताची धार लागली होती. ती तशीच ओरडत निपचिप झाली. तिचा जागीच मृत्यु झाला. तिचा आपल्या हातून खून झाला आहे हे त्याच्या लक्षात आल्यावर त्याने खोलीचा दरवाजा बंद केला बाहेरून कडी लावली तो बाहेर निघून गेला. दुपारी १.३०च्या दरम्यान विनोद हा परत आपल्या १३ वर्षाच्या मुलग्याला घेऊन साळगाव येथील घरात आला. त्याने दरवाजा उघडला त्यावेळी त्या मुलाला आपली आई रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे दिसल्यावर त्याने बोंब ठोकली. त्याच्या ओरडण्याच्या आवाजाने घर मालक आणि आजुबाजुचे लोक घटनास्थळी आले. तोपर्यंत विनोद राठोड हा मुलग्याला घेऊन स्वत:हून साळगाव पोलीस स्टेशनला गेला. त्याने पोलीस अधिकाऱ्यांना मी माझ्या बायकोचा गळा सुरीने कापून तिचा खून केला आहे असे सांगितले. त्याच्या शर्टावर ही रक्ताचे डाग उडालेले होते. हे बघून पोलीसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याला घेऊन मुड्डोवाडी येथील घटनास्थळ गाठले. घटनास्थळी बघ्यांची गर्दी झाली होती.गर्दी बाजुला करीत पोलीसांनी तपासाला सुरूवात करीत पंचनामा केला. या घटनेची माहिती पोलीसांनी शेजाऱ्याकडून आणि घरमालकाकडून घेतली. घटनास्थळाचा पंचनामा उरकून पोलीसांनी या घटनेची माहिती मयत रुक्मीणीच्या नातेवाईकांना फोनवर सांगून त्यांना गोव्यात येण्यास सांगितले. पंचनाम्यानंतर पोलीसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. घटनास्थळी एसपी हरिशचंद्र मडकईकर आणि साळगाव पोलीस स्टेशनचे पो.निरी. दिनेश गाडेकर यांनी भेट देवून घटनेची पाहणी करून माहिती घेतली. रात्री उशिरापर्यंत रुक्मीणीचा भाऊ आणि इतर नातेवाईक गोव्यात दाखल झाले. मयत रुक्मीणीच्या भावाने दिलेल्या फिर्यादीनुसार साळगाव पोलीस ठाण्यात रुक्मीणी विनोद राठोड (वय ३५) रा.मुळ गाव गदग कर्नाटक सध्या मुड्डोवाडी साळगाव गोवा हिच्या खून प्रकरणी तिचा नवरा विनोद राठोड (वय ४०) रा.मुळ गाव गदग कर्नाटक सध्या मुड्डोवाडी साळगाव गोवा याच्या विरोधात आयपीसी कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.दुसऱ्या दिवशी पोलीसांनी विनोद राठोड याला म्हापसा येथील कोर्टात हजर केले असता मा.कोर्टाने विनोद राठोड याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला सुरा जप्त केला. या घटनेचा पुढील तपास साळगाव पोलीस स्टेशनचे पो.निरी दिनेश गाडेकर याच्या मार्गदर्शनाखाली साळगाव पोलीस करीत आहेत.

## जमिनीच्या वाटणीचे केवळ निमित्त ...

ओळखून पोलीस ठाण्यातील काही कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन घटनास्थळाकडे धाव घेतली. रामलिंग मुदगड गावापासून जवळच असलेल्या एका शेत शिवारात लोकांनी बरीच गर्दी केली होती. काही वेळेतच कासार शिरशी पोलीस ठाण्याची पोलीस गाडी गर्दी जवळ येऊन थांबली. घटनास्थळावर जोर जोरात विलाप सुरू होता. बहुतेक मयताचे नातेवाईक घटनास्थळावर हजर असावेत आणि त्यांनी हा विलास सुरू केला असावा असा प्राथमिक अंदाज कासार शिरशी पोलिसांनी लावला. पोलिसांना पाहताच गर्दी पांगु लागली. कासार शिरसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड यांनी घटनास्थळावर उपस्थित असलेल्या लोकांकडून घटनेची प्राथमिक माहिती जाणून घेतली. तेव्हा रामलिंग मुदगड या गावातील गुलाब विलास खरोसे हा तरुण कालव्यात निचपत पडला असून त्याचे नातेवाईक घटनास्थळावर हजर असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी घटनास्थळाचा ताबा घेत पंचनामा करण्यास सुरुवात केली. दरम्यान कासार शिरशी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड यांनी मयत गुलाब खरोसे यांच्या नातेवाईकांची भेट घेऊन घटनेची प्राथमिक माहिती घेतली. रामलिंग मुदगड येथील मूळ रहिवासी असलेले विलास राम खरोसे यांचा मुलगा गुलाब विलास खरोसे हा १८ फेब्रुवारी सकाळी घरातून शेताकडे गेला होता. मात्र तो रात्री घरी परत आला नाही. याच्यामुळे मयत गुलाब खरोसे याचे वडील विलास खरोसे हे शेताकडे आपल्या मुलाला हुडकण्यासाठी गेले असता गुलाब खरोसे हा कालव्यात पडलेला दिसला, तसेच त्याच्यावर मोटरसायकल देखील पडलेली दिसली. विलास खरोसे यांनी गुलाब खरोसे याला उठवण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांना गुलाब कडून कोणताच प्रतिसाद मिळाला नाही. तेव्हा विलास खरोसे यांनी जोर जोरात ओरडून आजूबाजूच्या शेतकऱ्यांना मदतीची हाक दिली तेव्हा आजूबाजूचे शेतकरी घटनास्थळावर आले. मात्र गुलाब खरोसे यांच्या हालचाली होत नसल्याने ही पोलिसा केस असल्याचे सांगून दक्ष नागरिकांनी कासार शिरशी पोलीस ठाण्यांना संपर्क केला एवढी माहिती पोलिसांच्या हाती लागली. पोलिसांनी पंचनामा सुरुवात केली. मयत गुलाब खरोसे याचा वरवर अपघात झाला असावा असा दिसणारा प्रकार पंचनाम्यात हळूहळू घातपाताचा वाटू लागला. गुलाब खरोसे याच्या डोक्यावर, शरीरावर जाड वस्तूने प्रहार केल्याच्या व त्यातून रक्तस्त्राव झाला आसल्याचे पोलिसांना स्पष्ट दिसत होते. त्यामुळे हा अपघात नसून घातपात असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांकडून वर्तविण्यात आला. पोलिसांनी पंचा समक्ष मयताच्या अंगावरून मोटरसायकल बाजूला काढली तेव्हा मयताच्या डोक्यात शरीरावर छातीवर रक्ताचा थारोळा साचला होता. कुणीतरी अज्ञात मारेकर्यांनी गुलाब खरोसे याचा खून करून तो अपघात असल्याचा बनवा रचला आहे ही गोष्ट पोलिसांच्या नजरेतून सुटला नाही. कासार शिरशी पोलिसांनी घटनास्थळावरून आवश्यक ती माहिती घेऊन आजूबाजूचा परिसर पिंजून काढला. मात्र कासार शिरसी पोलिसांना मनावा तेवढा सबळ पुरावा हाती लागला नाही. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरक्षक सुधाकर बावकर यांचा मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांचे एक पथक घटनास्थळावर दाखल झाले. त्याच वेळेस निलंगा उपविभागीय पोलीस अधिकारी ढुमे यांनी घटनास्थळाला भेट देऊन घटनेची प्राथमिक माहिती जाणून घेतली तसेच कासार शिरशी पोलिसांना योग्य त्या सूचना केल्या. कासार शिरशी पोलिसांनी घटनास्थळावरील पंचनामा ऑटोपवून मयत गुलाब खरोसे याचा मृतदेह उत्तरनीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्याची तजबीज केली. मयताचे वडील विलास राम खरोसे यांच्या फिर्यादीवरून कासार शिरशी पोलीस ठाण्यात गु.र.न. ३०/२०२६ कलम १०३(१) भारतीय न्याय संहिता प्रमाणे अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, निलंगा उपविभागीय पोलीस अधिकारी ढूमे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाचे सर्व सूत्र कासार शिरशी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड यांच्या हाती देण्यात आले. कासार शिरशी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड यांनी तपासाचे चक्र गतिमान करू या खून प्रकरणातील प्राथमिक माहिती घेण्यासाठी कासार पोलिसांचे एक पथक तयार केले. या पथकाने सर्वप्रथम मयताच्या नातेवाईकांची भेट घेवून त्यांच्याकडून अधिक माहिती जाणून घेतली. मयताचे कोणासोबत दुश्मनी अथवा आर्थिक देवाणघेवाण, काही वाद होती का याचीही माहिती पोलिसांनी घेतली. तेव्हा रामलिंग मुदगड येथील विलास राम खरोसे हे आपल्या पत्नीसह राहत होते. त्यांना गावापासून जवळच वडिलोपार्जित जमीन होती. या जमिनीत काबाडकष्ट करून खरोसे कुटुंबीया आपला उदारनिर्वाह चालवत होते. विलास खरोसे यांना दोन मुले होती. त्यांच्या मोठ्या मुलाचे नाव गुलाब होते तर लहान मुलाचे नाव उल्हास होते. आई-वडिलांसोबत गुलाब आणि उल्हास देखील शेतात काम करत होते. दरम्यान उल्हास खरोसे याचा विवाह देखील झाला होता. तर विलास खरोसे यांचा मोठा मुलगा गुलाब अविवाहित होता. दरम्यानच्या काळामध्ये जमिनीच्या वाटणी वरून खरोसे कुटुंबामध्ये वादावाद होत असल्याची महत्त्वपूर्ण माहिती पोलिसांच्या हाती लागली. दरम्यान स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने देखील समांतर तपासाला सुरुवात केली होती. या खून तपासात अधिक माहिती घेण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सुरू केला होता. तसेच काही खबर यांची नेमणूक करून अधिक माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न चालवला होता. एक खास खबर यांनी दिलेल्या माहितीवरून १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी गुलाब आणि उल्हास हे दोघे भाऊ सकाळी शेताकडे एकत्र गेले असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळाली होती. तसेच या दोघांच्या शेतामध्ये बराच वाद झाला असल्याची खात्रीलायक माहिती गुन्हे शाखेच्या पोलिसांच्या हाती आली होती. दरम्यानच्या काळात मयताचा लहान भाऊ उल्हास खरोसे हा वारंवार पोलीस ठाण्याकडे येऊन पोलिसांना या खून प्रकरणाची अधिक माहिती जाणून घेत असल्याचे व पोलिसांना दिशाहिन माहीती देत आसल्याचे देखील पोलिसांना खटकले होते. मयत गुलाब खरोसे याच्या खून प्रकरणातील महत्त्वपूर्ण धागा पोलिसांना अद्याप तरी मिळाला नव्हता. कासार सिरसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड या खून प्रकरणातील प्रत्येक बाजूचा अभ्यास करून तपासाची दिशा गतिमान करत होते. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना एक गुप्त खबऱ्यांने दिलेल्या माहितीवरून गुलाब खरोसे खून प्रकरणातील संशयित आरोपी उल्हास खरोसे हा असल्याचा महत्वपूर्ण पुरावा पोलिसांना मिळाला. यावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने गुलाब खरोसे खून प्रकरणातील संशयित आरोपी उल्हास खरोसे याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असतात त्यांनी पोलिसांना असमाधानकारक उत्तरे दिली. त्याला पोलिसीखाच्या दाखवतात त्यांनी आपल्या गुन्ह्याची कबुली देऊन सांगण्यास सुरुवात केली. गुलाब खरोसे आणि उल्हास खरोसे हे दोघे सख्खे भाऊ होते. काही वर्षांपूर्वी उल्हास खरोसे याचे लग्न झाले होते. मात्र कालांतराने पती-पत्नीमध्ये वाद झाल्याने उल्हास खरोसे याची पत्नी निघून गेली होती. काडीमोड झाल्यानंतर उल्हास खरोसे लग्नासाठी मुलगी शोधत होता. दरम्यानच्या काळात नवरा सोडून दिलेली एक महिला लग्नासाठी तयार असल्याची माहिती उल्हास खरोसे याला मिळाली होती. बहुतेक तिचाही काडीमोड झाला होता. उल्हास खरोसे यांनी त्या महिलेची लग्न केले होते. त्यांचा संसार सुखात चालला होता. आई- वडील दोघे भाऊ एकत्र राहत होते मात्र गेल्या काही काळापासून उल्हास खरोसे याला बाजूला राहायचे होते. त्याच्यासाठी तो आपल्या वडीलाकडे शेत जमिनीची वाटणी करून मागत होता. तेव्हा वडील विलास खरोसे उल्हास खरोसे याला एकत्र राहू असे समजावून सांगत होते. मात्र उल्हास खरोसे वडिलांचे काही ऐकण्यास तयार नव्हता. तेव्हा वडिलांनी त्यांचा मोठा मुलगा गुलाब खरोसे याला विचारून बघ तेव्हा मी तुम्हाला शेतजमिनीत वाटणी करून देतो असे सांगितले. तेव्हा उल्हास खरोसे यांने आपला मोठा भाऊ गुलाब खरोसे याच्याकडे शेत वाटून दे असा जगदा लावत होता. मात्र आई वडील जिवंत असेपर्यंत मी तुला शेत वाटणी करू देणार नाही असा गुलाब खरोसे सतत उल्हास खरोसे याला सांगत होता. तसेच तू बायकोचं ऐकून शेत वाटणी मागत आहेस असं टोमणे देखील गुलाब आपला लहान भाऊ उल्हास यास वारंवार देत होता. याचा राग उल्हास खरोसे याच्या मनात तयार झाला होता. शेत वाटणी करण्यास आपला मोठा भाऊ गुलाब खरोसे हाच अडथळा आसल्याची गाठ उल्हास खरोशे याच्या मनात तयार झाली होती. त्यामुळे उल्हास खरोसे हा गुलाब याच्यावर चिडून होता. गुलाब खरोसे याचा काटा काढल्याशिवाय आपल्याला शेतजमीन वाटूण मिळणार नाही. असा समज उल्हास खरोसे याचा झाला होता. त्यामुळे गुलाब खरोसे याचा काटा काढण्यासाठी उल्हास खरोसे योग्य संधीची वाट पाहत होता. दरम्यान फेब्रुवारी महिन्यात दोघा भावांमध्ये वाटणीवरून बऱ्याचदा वाद झाला होता. त्यांचा वाद विकोपाला गेला होता. १८ फेब्रुवारी २०२६ सकाळी खरोसे कुटुंबातील सर्वच लोक आपल्या आपल्या कामाला लागले होते. सकाळच्या सुमारास गुलाब खरोसे हा देखील आपल्या मोटरसायकलीवरून शेताकडे गेला होता. त्याच पाठोपाठ उल्हास देखील शेताकडे निघून गेला. शेतातील काम आटोपून झाल्यानंतर उल्हास आणि गुलाब याच्या मध्ये शेत वाटणीवरून पुन्हा वाद झाला. सायंकाळच्या सुमारास पर्यंत हा वाद पेटत गेला. चिडलेल्या उल्हास खरोसे यांने संधीची वाट पाहून बेसावध असलेल्या गुलाब खरोसे याच्यावर हल्ला चढवला. बेसावध गुलाबला खाली पाडून बोकांडी बसून हातात असलेल्या दगडाने गुलाब खरोसे याचे डोके ठेचले डोक्यातून रक्ताच्या धारा वाहू लागल्या. या झटापटीत गुलाब खरोसे शांत झाला. भानावर आलेल्या उल्हास खरोसे यांनी गुलाब खरोशी याच्या मृतदेहाची वाट लावण्याचे ठरवले. गुलाब खरोसे याचा मृतदेह कालव्यात नेऊन टाकला व त्याच्यावर मोटरसायकल टाकून अपघात झाल्याचा बनावा केला व तो गावाकडे निघून आला. या खुन प्रकरणातील तपासात पोलिसांनी रक्ताने माखलेले कपडे ,दगड आणि इतर वस्तू हस्तगत केल्या असून ही कामगिरी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, निलंगा उपविभागीम पोलीस अधिकारी ढुमे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांचे मार्गदर्शनाखाली कासार शिरशी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड पोलिस पथकामधील सहायक पोलीस निरीक्षक सदानंद भुजबळ, पोलीस उपनिरीक्षक राजेश घाडगे, पोलीस अंमलदार माधव बिलापटटे, नवनाथ हासबे, संजय कांबळे, राजेश कंचे, युवराज गिरी, पाराजी पुठेवाड, डावरगावे, श्रीनिवास जांभळे, संतोष खांडेकर, व्यंकटेश निटुरे, अंजली गायकवाड मांनी केली आहे.

## जमीन जाण्याच्या भीतीने पती कासावीस...

तो दारूच्या नशेत तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला सारखा मारहाण करू लागला. या घटनेची माहिती ललिता हिने आपल्या माहेरी वडिलांना आणि भावांना दिली. त्यांनी ही उदयला समजावून सांगून पाहिले, परंतु त्याचा उपयोग काही झाला नाही.एका दारूच्या व्यसनाने उदय पुरता बरबाद झाला. त्याचे दारू पिण्याचे व्यसन इतके वाढले की, नवरा बायकोच्या भांडणाला अंतच राहिला नाही. त्यातूनच ललिता हिने मागचा पुढचा विचार न करता ती आपल्या लहान मुलांना घेऊन माहेरी सोमपुर येथे गेली. तेथे ती आपल्या आई वडिलांच्या घरात राहत असताना नातेवाईकांनी खुद्द उदयने ही हा वाद मिटविण्याचा प्रयत्न केला परंतु हा वाद मिटण्याऐवजी वाढतच गेला. ललिताने या वादातून उदय विरूध्द धारवाड कोर्टात घटस्फोटासाठी केस दाखल केली.ही केस दाखल करून जवळ पास सहा सात वर्ष झाले. त्या अगोदर पासून ती उदय पासून वेगळे राहू लागली होती. जवळ पास १० एक वर्ष ती उदय पासून वेगळे राहू लागली होती. त्यामुळे उदयने ही कोर्टात ही केस चालविली.परंतु हल्ली ही केस अंतिम टप्प्यात असल्याने ललिताने आपल्या वकिलाच्या मार्फत उदयच्या प्रॉप्रटीत आपला हक्क सांगून उदयच्या वाटणीला येणाऱ्या शेत जमीनीपैकी बागायती पिकावू दोन एकर शेत जमीन आपल्याला मिळावी असे म्हणणे कोर्टात मांडले होते. त्यामुळे उदय हवालदिल झाला होता. दोन एकर शेत जमीन का म्हणून तिच्या नावे करायची.एक तर ती होऊन आपल्या पासून गेली दहा वर्ष वेगळी राहत आहे. माहेरी राहून ती आपल्या विरोधात खेळी करीत आहे आणि यामागे नक्कीच तिच्या आई वडिल भावाचा हात असणार हे त्याने ओळखले. कोर्ट येणाऱ्या तारखेला निकाल देताना कोर्ट आपली दोन एकर शेती तिला देण्यास आपल्याला भाग पाडणार म्हणून त्याने आता वेगळाच विचार केला. जर आपल्या मार्गातून आपल्या बायकोला बाजुला केले. तिला मारून टाकले तर आपोआपच घटस्फोटाचा विषय संपेल शिवाय तिला मारून टाकले तर तिला दयावी लागणारी दोन एकर शेत जमीन ही दयावी लागणार नाही असा विचार त्याने केला. आमीनभावी जवळील आपले मित्र नागाप्पा पडकेल, अभिषेक वरगेन्नकर,नागराज उप्पीन या आपल्या तिघा मित्रांना आपल्या कटात सामील करून घेतले. या तिघांना ही त्याने सगळी हकीकत सांगितली. आपली बायको ललिता हिला मारायचे आहे असे त्याना सांगितले. त्या तिघांना ही त्याने दारूची पार्टी दिली. दारूच्या पार्टीत उदय हतरगीने आपल्या मित्रांना आपल्या बायकोला मारण्यासाठी सुमारे ४० लाखांची सुपारी दिली. त्यातील काही रक्कम ही त्याने घटनेच्या आधी त्यांना दिली. दारूच्या पार्टीतच त्याने त्या तिघांना सांगितले की ललिताचा खून हा अपघात वाटला पाहिजे आपल्या मागे कोणतेही लचांड नको. त्या पार्टीतच त्यांनी ललिताला मारण्यासाठी एक प्लॅन केला. ललिताची हत्या ही अपघात वाटावी म्हणून त्यांनी एक थार एसयुव्ही भाडयाने घेतली. त्यानंतर उदयने बायको ललिता हिला २५ फेब्रुवारी २०२५ रोजी फोन करून आपल्यातील विषय आपण कोर्टाबाहेर मिटवूया. तुला दोन एकर शेत पाहिजे ना त्यावर आपण विचार करूया असे सांगत तिला दुसऱ्या दिवशी अमीनभावी नजिक असणाऱ्या हायवेवर असणाऱ्या दुर्गामाता मंदिर नजीक सकाळी १० वाजणेच्या सुमारास भेटण्यास येण्यास सांगितले. विषय मिटवायचा असल्याने नाही होय म्हणत ललिता ही आपल्या माहेरच्या कोणाला ही न विचारता नवरा उदयला भेटायला तयार झाली. ती आपल्याला नक्कीच भेटायला येईल याचा विश्वास उदय हतरगी याला होता. त्याने आधी ठरलेप्रमाणे दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुर्गामाता मंदिरापासून एक दीड किलो मीटर अंतरावर भाडयाने घेतलेली थार एसयुव्ही गाडी उभी केली. आपण स्वत: दुर्गामाता मंदिराच्या अलिकडे उभा राहिला. त्या आधी त्याने स्वत: आणि मित्रांना जमर दारू पाजली. त्या उभ्या असणाऱ्या थार एसयुव्ही गाडीत नागाप्पा पडकेल. अभिषेक वरगन्नवर आणि नागराज उप्पीन हे दारूच्या नशेत बसून होते. सकाळी १०.३०च्या दरम्यान उदयला बायको ललिता ही घाई घाईत आपल्याकडे येत असल्याचे दिसले. तिला लांबुन येताना बघुन त्याने थारएसयुव्ही मध्ये बसलेल्या आपल्या तिघा मित्रांना खुणविले. त्यांना आवश्क ती सुचना मोबाईलवरून दिली. त्याप्रमाणे थार गाडी चालविणारा नागाप्पा पडकेल हा सावध झाला. त्याने हळुच थार गाडी चालवित काही अंतरावर आणली. पुढे उभा असणाऱ्या उदयने सुचना दिल्यावर त्याने जोरात थार गाडी पुढे आणली. थार गाडी जोरात होती. परंतु तिच्या मागे कर्नाटक डेपोची एक बस त्या थार गाडीला ओव्हर टेक करून पुढे गेली. ती बस पुढे जात असताना त्या बसच्या डॅशबार्डवरील कॅमेऱ्यात मागील घडत असलेल्या घटना दिसत होत्या. रस्त्यावर कुणी काय करते कोणते वाहन आहे हे त्या डॅशबोर्डवरील कॅमेऱ्यात दिसत असल्याने त्या थार गाडीने मागे चालत येणाऱ्या एका महिलेला जोरात धडक दिली आणि निघून पुढे आल्याचे दिसत होते. त्या थार गाडीने उदयची बायको ललिता हिला जोरात धडक दिल्याने ललिता ही रस्त्यातच पडली.तिच्या डोक्यातून मेंदु बाहेर पडला. ती रक्ताच्या थारोळ्यात जागीच मृत्युमुखी पडली. एका महिलेला थार गाडीने उडवून देवून ती पुढे गेल्याचे अनेकांनी पाहिले होते. हा अपघात झाला आहे असे बघणाऱ्या लोकांना वाटत होते. घटनास्थळी बघ्यांची गर्दी झाली होती. मयत महिलेला बहुदा सर्वजण ओळखत होते. मयत महिला ही अमीनभावी जवळील सोमपुर येथील ललिता हतरगी ही असल्याचे अनेकांनी ओळखले. कुणी तरी या घटनेची माहिती धारवाड ग्रामीण पोलीसांना फोनवरून दिली. या घटनेची माहिती मिळताच धारवाड ग्रामीणचे पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. सकृतदर्शनी पोलीसांना हा अपघात वाटत होता. पोलीसांनी या घटनेची पाहणी करुन घटनास्थळी मयत ललिता हतरगी याच्या वडिलांना बोलावून घेतले. त्याच्याकडून पोलीसांनी या घटनेची माहिती घेतली असता त्यांनी पोलीसांना सांगितले की, आपली मुलगी ललिता आणि तिचा नवरा उदय याची कोर्टात केस चालू आहे. ललिताने घटस्फोट मिळण्याच्या बदल्यात उदयकडून दोन एकर शेती मागितली आहे. त्यामुळे चिडून जावून उदयने तिचा काटा काढला आहे. हा अपघात जरी वाटत असला तरी तिच्या नवऱ्याने माझ्या मुलीची हत्या केली असल्याचा संशय पोलीसा समोर तिच्या वडिलांनी व्यक्त केला. पोलीसांनी घटनेचा पंचनामा करून तपास चालू केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी धारवाड येथील सरकारी रुग्णालयात पाठवून देवून या घटनेची नोंद अपघात अशी केली. परंतु ललिताच्या वडिलांनी हत्येची शंका व्यक्त केल्याने पोलीस या घटनेचा तपास करीत होते. ही घटना घडून जवळ पास आठ दहा दिवस झाले. पोलीस पुरावा गोळा करीत असताना घटनेच्या दिवशी त्या वेळेस कर्नाटक डेपोची एक बस जात असल्याचे त्यांना समजले. त्यावरून पोलीसांनी त्या बसच्या ड्रायव्हरला बोलावून घेतले असता त्याने बसच्या डॅशबोर्डवरील कॅमेऱ्यात पाहिलेली घटना पोलीसांना सांगितली. त्या डॅशबोर्डवरील कॅमेऱ्यात त्या थार एसयुव्ही गाडीत तिघे जण बसले असल्याचे दिसत होते. तर दुर्गामाता मंदिरानजीक असणाऱ्या अलिकडे काही अंतरावर एक इसम उभा होता.तो इसम हा दुसरा तिसरा कुणी नसून तो मयत ललिताचा नवरा उदय हतरगी असल्याचे पोलीसांच्या लक्षात आले. ती महिला जशी घाई घाईत चालली होती त्यावेळेस तिच्या मागून काही अंतरावर ती थार गाडी हळ हळू येत होती तिच्या जवळ आल्यावर त्या थार गाडीच्या चालकाने गाडीचा वेग वाढविला आणि त्या महिलेला मागून जोराची धडक दिली. त्या धडकेत ती महिला मृत्युमुखी पडली. त्या बसच्या डॅशबोर्डवरील कॅमेऱ्यात ती महिला रस्त्याच्या कडेने जात असल्याचे दिसत होते. ती थार गाडी इकडून तिकडे वळण घेत त्या महिलेला जाणून बुजून धडक दिल्याचे दिसत होते.या माहितीवरून पोलिसांनी त्या थार एसयुव्ही गाडी मालकाचा शोध घेतला असता ती थार गाडी त्यावेळी उदय हतरगी याने भाडयाने घेतल्याचे त्या मालकाने पोलिसांना सांगितले. यावरून पोलीसांचा संशय आधिकच गडद झाला. त्यांनी संशयावरून उदय हतरगी याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे या घटनेची चौकशी करीत असताना त्याने आपला गुन्हा नाही होय करीत कबुल केला. मयत ललिता ही आपली पत्नी असून गेल्या दहा वर्षापासून ती आपल्या पासून वेगळे राहत आहे. तिने घटस्फोटच्या बदल्यात कोर्टात तिने आपली दोन एकर शेती मागितली असल्याने आपण चिडून जावून तिची हत्या केली. तिचा अपघात वाटावा म्हणून तिची हत्या करण्यासाठी आपण तिघाजणांना ४० लाखाची सुपारी ही दिल्याचे त्याने पोलीसांना सांगितले. त्याने या घटनेतील नागाप्पा पडकेल.अभिषेक वरन्नगकर आणि नागराज उप्पीन याची नावे पोलीसांना सांगितले. या तिघांना ही आपण सुपारी दिली असल्याचे उदयने पोलीसांना सांगितले.त्याने दिलेल्या माहितीवरून पोलीसांनी या तिघांना ही ताब्यात घेतले. या घटनेची लेखी फिर्याद मयत ललिताचे वडिलांना धारवाड ग्रामीण पोलीसात दिल्याने पोलीसांनी त्याच्या फिर्यादीवरून ललिता उदय हतरगी (वय ४२) रा.सोमपुर हिच्या हत्येप्रकरणी तिचा पती उदय हतरगी (वय ४९) त्याचा मित्र नागाप्पा पडकेल (वय ४०), अभिषेक वरन्नगकर (वय ४०) आणि नागराज उप्पीन (वय ३८) रा.तिघे ही अमीनभावी सौदंती यांच्या विरोधात आयपीसी कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. दरम्यान पोलीसानी या घटनेतील संशयीत थार एसयुव्ही गाडी जप्त केली. या चौघांना ही पोलीसांनी धारवाड येथील कोर्टात उभे केले असता मा.कोर्टाने या चौघांची ही रवानगी बेळगावी येथील कोर्टात केली. या घटनेची माहिती प्रसारमाध्यमांना जिल्हा पोलीस प्रमुख गुजंन आर्या यांनी दिली. या घटनेचा पुढील तपास धारवाड ग्रामीणचे पोलीस करीत आहेत.

02 TO 08 MARCH 2026 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 3/7/2026 8:24 PM Page 1



### वसई-विरार शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीच्या नियोजना संदर्भात महापालिकेत बैठक

# वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम आणि सुटसुटीत करण्याचे महापौरांचे निर्देश



**विरार : वार्ताहर**

वसई-विरार शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीच्या (ट्रॅफिक) नियोजना संदर्भात महानगरपालिका मुख्यालयात महापौर अजीव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विविध शासकीय विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक पार पडली. या बैठकीत शहरातील मुख्य रस्त्यावर, रेल्वे स्टेशन जवळ, चौक तसेच विविध रहदारीच्या ठिकाणांवर होत असलेल्या वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर योग्य त्या विविध उपाययोजना करून वाहतूक कोंडी सोडविण्याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. शहरातील वाहतूक व्यवस्थेत सुधारणा करणे, नागरिकांना सुरक्षित व सुलभ प्रवास सुविधा उपलब्ध करून देणे, फेरीवाल्यांविषयी योग्य त्या उपाययोजना करणे आणि भविष्यातील वाहतूक गरजा लक्षात घेऊन प्रभावी उपाययोजना राबविण्याबाबत महापौर यांनी उपस्थित शासकीय विभागांना सूचना दिल्या. सर्व विभागांनी समन्वयाने काम करून शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम व सुटसुटीत करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश महापौर यांनी यावेळी दिले. या बैठकीत शहरातील रहदारीच्या ठिकाणी अनधिकृतपणे बसणाऱ्या व नागरिकांना ये-जा करण्यास अडथळा निर्माण करणाऱ्या फेरीवाल्यांविरुद्ध कारवाई करणे, प्रमुख चौकांवरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, सिग्नल व्यवस्थेचे आधुनिकीकरण, पार्किंग व्यवस्थेचे नियोजन, तसेच वाहतूक शिस्तीबाबत जनजागृती करण्याबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. याशिवाय शाळा, महाविद्यालये व बाजारपेठ परिसरातील वाहतूक नियंत्रणासाठी विशेष नियोजन करण्याबाबतही चर्चा करण्यात आली. बैठकीत सुचविण्यात आलेल्या उपाययोजनांची लवकरात लवकर अंमलबजावणी करण्यासाठी संबंधित विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या असून, नागरिकांना अधिक सुकर आणि सुरक्षित वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न असल्याचे तसेच अनधिकृत फेरीवाल्यांविरुद्ध दररोज कारवाई करण्यात येत असल्याचे यावेळी आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी (भाप्रसे) यांनी यावेळी सांगितले. बैठकीत ट्रॅफिक नियोजन करणे बाबत कशा प्रकारे उपाययोजना करणे योग्य राहील याबाबतच्या नियोजनाचे व्हिडिओ द्वारे सादरीकरण उपस्थितांना दाखविण्यात आले. या बैठकीला महापौर अजीव पाटील, उपमहापौर मार्शल लोपीस, मा.स्थायी समिती सभापती प्रविण शेट्टी, आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी (भाप्रसे), माजी परिवहन सभापती भरत गुप्ता, अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, अतिरिक्त आयुक्त दिपक सावंत, प्र.शहर अभियंता प्रदीप पाचंगे, पोलीस उपआयुक्त सुहास बावचे, वाहतूक शाखा विरार पोलीस निरीक्षक महेश शेट्टे, महानगरपालिका परिवहन व्यवस्थापक धैर्यशील जाधव, महानगरपालिका सचिव विश्वनाथ तळेकर, नगररचनाकार श्रीम.श्वेता माने, महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# वाडा तालुक्यातील बिलोशी येथे श्री संत तुकाराम महाराज बीज उत्सव सोहळ्यानिमित्त ज्ञानेश्वरी वाटप



**वाडा : वार्ताहर**

वाडा तालुक्यातील बिलोशी येथे श्रीसंत तुकाराम महाराज बीज उत्सव सोहळा वर्ष ७६ निमित्त आयोजित करण्यात आलेल्या महिला हळदी-कुंकू कार्यक्रमाने यंदा एक अनोखी आणि आध्यात्मिक परंपरा निर्माण केली. पारंपरिक भेटवस्तूंऐवजी महिलांना भावार्थ दीपिका अर्थात ज्ञानेश्वरी हा पवित्र ग्रंथ भेट देत कार्यक्रमाला आध्यात्मिक उंची प्राप्त करून देण्यात आली. कार्यक्रमात मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. ज्ञानदान हेच श्रेष्ठ दान या भावनेतून आयोजक समितीने हा अभिनव उपक्रम राबविला. प्रत्येक महिलेला ज्ञानेश्वरी ग्रंथ प्रदान करताना संत ज्ञानेश्वर माऊलींच्या विचारांचा आणि तुकोबारायांच्या अभंगांचा संदेश देण्यात आला. हळदी-कुंकू हा केवळ सण नसून स्त्रीशक्तीचा सन्मान आहे. या माध्यमातून आध्यात्मिक संस्कारांची देणगी देण्याचा प्रयत्न करण्यात आला. अनेक महिलांनी या उपक्रमाचे कौतुक करत, ही भेट आयुष्यभराची प्रेरणा देणारी आहे अशी भावना व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मनिषा पाटील, सीमा पाटील, वैशाली पाटील व ललिता पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या समर्पण आणि मेहनतीमुळे कार्यक्रम भक्तिमय आणि संस्मरणीय ठरला.

# साठेपाडा येथे पर्यावरणपूरक होळी महोत्सव उत्साहात साजरा



**वाडा : वार्ताहर**

साठेपाडा गावात यंदाचा होळी महोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.ग्रामस्थांनी पारंपरिक पद्धती जपत, झाडांचे नुकसान टाळून आणि कमी लाकूड वापरून होळी साजरी केली. तसेच प्लास्टिकमुक्त आणि प्रदूषणमुक्त सण साजरा करण्याचा संदेश देण्यात आला. या उपक्रमात सरपंच साक्षी साठे यांच्या नेतृत्वाखाली गावातील रमेश मित्र मंडळ, महिला बचत गट, युवक, ग्रामस्थ आणि ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. नैसर्गिक रंगांचा जसे कि माती आणि झाडापाल्या पासून तयार केलेले रंग वापरून धुळवड साजरी करण्यात आली. ज्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण आणि आरोग्याची काळजी दोन्ही साध्य झाले. आबिटघर गावात होळीच्या निम्मिताने अभूतपूर्व एकीच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात होळी उत्सव पार पडला. या निमित्ताने आयोजित होळी उत्सवात गावाच्या सरपंच साक्षी साठे, उपसरपंच धनश्री पाटील, पोलीस पाटील सिमा पाटील, ग्रामपंचायत सदस्या सुप्रिया पाटील, मनीषा मुकणे तसेच कुलदीप पाटील यांनी आवर्जून उपस्थित राहून होलिका पूजन केले.

# संत गाडगेबाबा ग्रामसमृद्ध अभियानांतर्गत पाहणी समितीची आबिटघर ग्रामपंचायतीला भेट



**वाडा : वार्ताहर**

संत गाडगेबाबा ग्रामसमृद्ध अभियानांतर्गत पाहणी दौऱ्यावर असलेल्या पालघर जिल्हापरिषदेच्या पाहणी समितीने शुक्रवारी(दि.६) एजाज अहमद शरीक मसलत (सामान्य प्रशासन विभाग) यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायत अबिटघर येथे भेट देऊन ग्रामपंचायतीच्या मूल्यांकनासाठी पाहणी केली. यावेळी त्यांनी जिल्हा परिषद शाळा मोरघेपाडा, ग्रामपंचायत कार्यालय तसेच सार्वजनिक गावातील सार्वजनिक शौचालये, अंगणवाडी केंद्र, प्राथमिक आरोग्यकेंद्र येथे समितीमधील व्यंकटराव हुंडेकर(महिला बालविकास अधिकारी), मानसी वर्तक(पाणी पुरवठा सल्लागार), वैभव शिंदे (गटविकास अधिकारी वाडा) यांच्या सह जिल्हा परिषद शाळा साठेपाडा येथे भेट दिली. यावेळी येथील विद्यार्थ्यांनी ग्रामसभेचे महत्व जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी सादर केलेल्या प्रभावी पथनाट्याचे पालघर जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी एजाज अहमद यांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांनी ग्रामसभेचे महत्व, ग्रामविकासातील तिची भूमिका तसेच नागरिकांनी ग्रामसभेत सहभागी होण्याची गरज यावर आधारित पथनाट्य सादर केले. विद्यार्थ्यांच्या प्रभावी अभिनयामुळे उपस्थितांवर सकारात्मक परिणाम झाला. यावेळी एजाज अहमद यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत सांगितले की, अशा सामाजिक जाणीवा निर्माण करणाऱ्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण व सामाजिक जबाबदारीची भावना विकसित होते. ग्रामीण भागात ग्रामसभेचे महत्व जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी विद्यार्थ्यांनी केलेला हा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले. या उपक्रमासाठी त्यांनी शाळेतील शिक्षकांचेही विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच सामाजिक विषयांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. या प्रसंगी शाळेचे शिक्षक, ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.विद्यार्थ्यांच्या या पथनाट्यामुळे ग्रामसभेच्या महत्वाबाबत जागरूकता निर्माण झाली आहे. या वेळी सरपंच साक्षी साठे, उपसरपंच धनश्री पाटील, सदस्य कुलदीप पाटील, ग्रामपंचायत अधिकारी संजय पाटील हे जातीने उपस्थित राहून समितीचे स्वागत केले व त्यांच्या कामकाजात त्यांना सहकार्य केले.

### ग्रामपंचायत स्तरावर ८ ते २२ मार्चदरम्यान 'जल महोत्सव'

# पाणीपुरवठा यंत्रणा अधिक शाश्वत आणि सक्षम करण्यावर भर

**पालघर : वार्ताहर**

ग्रामीण पाणी पुरवठा व्यवस्था अधिक शाश्वत व सक्षम करण्यासोबतच पाणी व्यवस्थापनात ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये ८ मार्च ते २२ मार्च २०२६ या कालावधीत 'जल महोत्सव' साजरा करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी दिली असून ग्रामस्थांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण भागातील प्रत्येक घरापर्यंत वैयक्तिक नळजोडणीद्वारे दरडोई किमान ५५ लिटर गुणवत्तापूर्ण पाणीपुरवठा करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. याच अनुषंगाने जिल्ह्यातील शाळा, अंगणवाड्या, अनुदानित आश्रमशाळा तसेच शासकीय वसतिगृहांना देखील या योजनेअंतर्गत नळजोडण्या उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या जल महोत्सवाच्या निमित्ताने ग्रामपंचायत स्तरावर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. गावांमध्ये 'लोकजल उत्सव'




साजरा करून पाणी व्यवस्थापनाबाबत जनजागृती केली जाणार असून हा उपक्रम पूर्णपणे लोकसहभागावर आधारित असेल. ग्रामसभा व पाणी समित्यांच्या माध्यमातून पाणी संवर्धन व पाणीपुरवठा व्यवस्थापनाशी संबंधित प्रत्यक्ष कृतींवर भर दिला जाणार आहे. याचबरोबर महिलांच्या सहभागातून फिल्ड टेस्टिंग किटच्या माध्यमातून जल गुणवत्तेची तपासणी, गावातील जलस्रोतांचे संरक्षण, पाणी बचतीचे महत्त्व आणि पाणी व्यवस्थापनातील नागरिकांची भूमिका याबाबत जागरूकता निर्माण केली जाणार आहे. गावातील लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी एकत्र येऊन जलस्रोतांचे जतन व संवर्धन करण्यासाठी पुढाकार घेण्याचेही आवाहन करण्यात आले आहे. ग्रामीण पाणी पुरवठा व्यवस्था अधिक शाश्वत व मजबूत करण्यासाठी तसेच गावातील पाणीपुरवठा योजना सातत्याने कार्यरत राहण्यासाठी सामुदायिक सहभाग वाढविणे आवश्यक आहे. या उद्देशाने ८ ते २२ मार्चदरम्यान जिल्ह्यात 'जल महोत्सव' कार्यक्रम राबविण्यात येणार आहे, असे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) अतुल पारसकर यांनी सांगितले. दरम्यान, या कालावधीत गावांमध्ये जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, स्वच्छता मोहीम, तसेच पाणी पुरवठा योजनांचे औपचारिक हस्तांतरण करण्यात येणार आहे. ग्रामस्थांकडून सामुदायिक जलप्रतिज्ञा घेऊन पाणी संवर्धनाबाबत सामूहिक बांधिलकी व्यक्त केली जाणार असल्याची माहिती ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सचिन सुरूम यांनी दिली.

# डॉ. श्रद्धा वेखंडे यांना आयआयटी मुंबईतून एम.टेक. व मृदा आरोग्य विषयात पीएच.डी.



**वाडा : वार्ताहर**

वाडा तालुक्यातील डॉ. श्रद्धा विठ्ठल वेखंडे हिने भारतातील अग्रगण्य आणि अव्वल तीन तांत्रिक शिक्षण संस्थांपैकी एक असलेल्या आय.आय.टी. मुंबई येथून कृषीतील मृदा आरोग्य या विषयात पीएच.डी. पदवी तसेच एम.टेक. पदवी संपादन करत उल्लेखनीय शैक्षणिक यश प्राप्त केले आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. डॉ. श्रद्धा यांचे शालेय शिक्षण गोपाळ गार्डन हायस्कूल बोरीवली (मुंबई) येथे झाले आहे. ज्ञान आणि भक्ती यांचा सुंदर संगम असलेल्या या शाळेत मिळालेल्या शिक्षणाने त्यांच्या पुढील शैक्षणिक प्रवासाची पायाभरणी घडवली तसेच जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही आकारला, असे श्रद्धाचे वडील विठ्ठल वेखंडे यांनी सांगितले. श्रद्धा हिने वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजीकल इन्स्टिट्यूट, मुंबई येथून सिव्हिल अभियांत्रिकीमध्ये बिटेक पूर्ण केले असुन अभियांत्रिकी शिक्षणानंतर समाजातील प्रत्यक्ष प्रश्नांवर काम करण्याच्या उद्देशाने तिने याच महाविद्यालयातून पदव्युत्तर मधुन मृदा आरोग्य या विषयात संशोधन करत पीएच.डी. पूर्ण केली आहे. डॉ. श्रद्धा यांच्या मते माती ही केवळ शेतीची जमीन नसून अन्नसुरक्षा, पर्यावरण संतुलन आणि समाजाच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. मातीचे आरोग्य, पिकांची गुणवत्ता आणि मानवी आरोग्य यांचा परस्परांशी घनिष्ठ संबंध असल्याने या विषयातील वैज्ञानिक अभ्यास प्रत्यक्ष शेतीच्या वास्तवाशी जोडला जाणे आणि ते ज्ञान शेतकरी व समाजापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे असे डॉ. श्रद्धा हिने सांगितले. ज्ञानाचा उपयोग समाजाच्या उन्नतीसाठी व्हावा, हीच माझी पुढील कार्याची दिशा राहणार आहे असेही तिने सांगितले. साध्या पार्श्वभूमीतून सुरू झालेला श्रद्धा हिचा शैक्षणिक प्रवास परिश्रम आणि चिकाटीच्या बळावर उंचीवर पोहोचला असून अनेक विद्यार्थ्यांसाठी तो प्रेरणेचा स्रोत ठरत असुन तिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठाणतर्फे स्वच्छता अभियान



**वाडा: वार्ताहर**

ज्येष्ठ निरुपणकार महाराष्ट्रभुषण डॉ. नानासाहेब तथा नारायण धर्माधिकारी यांच्या जन्मदिनानिमित्त डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा, अलिबाग जि. रायगड यांच्या वतीने व पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी आणि रायगडभूषण सचिनदादा धर्माधिकारी यांच्या संकल्पनेतून संपूर्ण महाराष्ट्र स्वच्छ ठेवण्यासाठी महा स्वच्छता अभियान हाती घेण्यात आला. या अभियाना अंतर्गत रविवारी (दि.१मार्च) वाडा तालुक्यातील श्रीसदस्यांनी वाडा शहरातील खंडेश्वरी नाका परिसरात सकाळी एकत्र येऊन संपूर्ण वाडा शहरात ग्रूप तयार करून शहरात स्वच्छता केली. यामध्ये त्यांनी शहरातील कचरा एकत्र करून ट्रॅक्टरच्या मदतीने शहारा बाहेर आसलेल्या डम्पिंग ग्राउंडवर विल्हेवाट लावण्यासाठी नेऊन टाकला. डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठाण मार्फत गेल्या अनेक वर्षापासून संपूर्ण भारतभर नव्हे तर जगभरात बैठकीच्या माध्यमातून निरूपण देऊन एक आदर्श समाज घडावा यासाठी योगदान चालू आहे. तसेच प्रतिष्ठाण मार्फत रक्तदान शिबीर, स्वच्छता अभियान, आरोग्य शिबीर, शैक्षणिक साहित्य वाटप, वुक्ष लागवड व संवर्धन, निर्माल्य संकलन व खत निर्मिती, बंधारे निर्मिती असे अनेक विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जात असतात. खंडेश्वरीनाका नानासाहेब धर्माधिकारी यांच्या प्रतिमेचे पूजन करून स्वच्छता अभियानाची सुरुवात झाली यावेळी खासदार डॉ. हेमंत सावरा यांच्यासह वाडा नगरपंचायतीच्या नगेसेविका, नगरसेवक विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यावेळी नागरिकांनी प्रतिष्ठानच्या या समाजोपयोगी उपक्रमाचे कौतुक केले.

# क्राईम ब्रँचचे अधिकारी असल्याचे सांगत लुटणारी टोळी अटकेत

**वसई : वार्ताहर**

ठाणे क्राईम ब्रँच पोलीस असल्याचे भासवून एका इव्हेंट मॅनेजरला कारमध्ये बसवून लुटणाऱ्या पाच जणांच्या टोळीला आचोळे पोलिसांनी अवघ्या चार तासांत बेड्या ठोकल्या आहेत. या आरोपींकडून लुटलेली रक्कम, गुन्ह्यात वापरलेली कार व दुचाकी असा एकूण १४ लाख ६९ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. वसई विरार शहरात घरफोडी, वाहन चोरी, लूटमार अशा विविध प्रकारचे गुन्हे घडू लागले आहेत. नुकताच नालासोपारा येथे राहणारे नितेश उमेश सुरजन (२७) हे २० फेब्रुवारीला रात्री त्यांच्या मित्रांच्या सोबत युको बँक या परिसरातून २ लाख ६९ हजार रुपयांची रक्कम घेऊन जात होते. याच दरम्यान त्याठिकाणी एका अर्टिगा कारमधून आलेल्या अज्ञात टोळीने त्यांना 'आम्ही ठाणे क्राईम ब्रँचचे पोलीस आहोत' असे सांगून दमदाटी केली. आरोपींनी नितेश यांना जबरदस्तीने कारमध्ये बसवून आचोळे येथील स्मशानभूमी रोडवर नेले. तिथे त्यांना जेलमध्ये टाकण्याची भीती दाखवत मारहाण केली आणि त्यांच्याकडील २.६९ लाखांची रक्कम घेऊन पळ काढला.





या प्रकरणी आचोळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. गुन्हा दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुजित कुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेने तपास सुरू केला होता. तांत्रिक विश्लेषण आणि घटनास्थळाच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी सुधीर शांताराम लांडगे या संशयिताला ताब्यात घेऊन त्याची कसून चौकशी केली असता अन्य चार साथीदारांच्या मदतीने हा गुन्हा केल्याची कबुली दिली. यात सुधीर शांताराम लांडगे (३५), किरण जगन्नाथ दळवी (३४), राजेश सदाशिव गोसावी ( ४०), आदिल मोहम्मद हाफिज सय्यद (३२), सुंदर पालेराम चावरीया (४०) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे असून त्यांच्याकडून लुटलेली रोख रक्कम, गुन्ह्यात वापरलेली अर्टिगा कार, तीन मोटारसायकल आणि मोबाईल असा एकूण १४ लाख ६९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असल्याचे पोलिसांनी सांगितले. अटक करण्यात आलेल्या आरोपींपैकी सुधीर लांडगे आणि किरण दळवी यांच्यावर यापूर्वी ३ गुन्हे दाखल आहेत, तर सुंदर चावरिया याच्यावर २ गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी सांगितले.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुजितकुमार पवार, पोलीस निरीक्षक प्रफुल्ल वाघ, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे उपनिरीक्षक मंगेश वडणे, गुरुदास मोरे, दत्तात्रय दत्तात्रय दाईंगडे, शंकर शिंदे, निखील चव्हाण, विनायक कचरे व त्यांच्या पथकाने केली आहे.

# वसई-विरार महापालिकेच्या स्थायी समिती सभापतीपदी प्रवीण शेट्टी यांची बिनविरोध निवड

**वसई : वार्ताहर**

वसई विरार महापालिकेच्या महापौर, उपमहापौर, सभागृह नेता आणि विरोधी पक्षनेता निवडीनंतर आता सर्वांचे लक्ष स्थायी समिती सभापतीच्या निवडणुकीकडे लागले होते. गुरुवारी स्थायी समिती सभापती पदाची निवड प्रक्रिया पार पडली. यात बविआचे प्रवीण शेट्टी यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. प्रवीण शेट्टी हे महापालिकेचे ९वे स्थायी समिती सभापती ठरले आहेत. वसई विरार महापालिकेच्या सर्वात महत्त्वाच्या असणाऱ्या स्थायी समिती सदस्यांची निवड २० फेब्रुवारीला पार पडलेल्या पहिल्या महासभेत करण्यात आली होती. यावेळी १६ सदस्यांची निवड झाली होती. यात बहुजन विकास आघाडीचे प्रवीण शेट्टी, नरेंद्र पाटील, लॉरेल डायस, पंकज पाटील, रंजना थालेकर, प्रफुल्ल पाटील, चंद्रशेखर धुरी, सुनील आचोळकर, स्वप्निल कवळी व आलमगीर डायर या नगरसेवकांचा समावेश आहे. तर भाजपमधून प्रज्ञा पाटील, महेश सरवणकर, दर्शना त्रिपाठी, निलेश चौधरी, जितेंद्र पाटील, अभय कक्कड या नगरसेवकांची स्थायी समिती सदस्य पदी नियुक्ती करण्यात आली होती. त्यामुळे पुढील १ वर्षाच्या कालावधीसाठी १६ नगरसेवकांची स्थायी समितीत



वर्णी लागली आहे. या १६ सदस्यांमधून स्थायी समिती सभापतीची निवड करण्यात आली आहे. सभापती निवडीचा कार्यक्रम विभागीय आयुक्तांच्या सूचनेनुसार ५ मार्च २०२६ गुरुवारी महापालिकेच्या स्थायी समितीच्या सभागृहात पार पडला. यावेळी पिठासीन अधिकारी म्हणून पालघर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी डॉ इंदुराणी जाखड उपस्थित होत्या. या सभापती पदासाठी बहुजन विकास आघाडीतून प्रवीण शेट्टी तर भारतीय जनता पक्षातून निलेश चौधरी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र, या निवडणुकीत भाजपचे निलेश चौधरी यांनी सामंजस्य दाखवत उमेदवारी अर्ज मागे घेतला. त्यामुळे प्रवीण शेट्टी यांची स्थायी समितीच्या सभापती पदी बिनविरोध निवड झाली आहे. या निवडणूक प्रक्रियेवेळी पिठासीन अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी डॉ इंदुराणी जाखड, अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, दीपक सावंत, नगरसचिव विश्वनाथ तळेकर व स्थायी समिती सदस्य उपस्थित होते. प्रवीण शेट्टी यांनी २३ ऑगस्ट २०१९ ते २८ जून २०२० या काळात त्यांनी महापालिकेचे महापौर पद ही भूषविले आहे. तर नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत वसई पश्चिमेच्या भागातील पक्षाच्या सर्वाधिक जागा जिंकून देण्यात शेट्टी यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. या कामाचे फलित म्हणून गटनेते पदाची धुरा त्यांच्यावर सोपवली गेली. त्यानंतर स्थायी समिती सभापती पदी ही त्यांची बिनविरोध निवड झाली आहे.

वसई विरार महापालिकेत गेल्या दहा वर्षाच्या काळात ८ नगरसेवकांना स्थायी समिती सभापती पदाची संधी मिळाली आहे. हे सर्व सभापती बहुजन विकास आघाडीचेच होते. जितेंद्र शहा आणि नितीन राऊत या दोघांना या पदावर राहण्याची संधी दोन वर्षाच्या कालावधीसाठी मिळाली होती.तर नारायण मानकर, अजीव पाटील, संदेश जाधव, आफिफ शेख, सुदेश चौधरी आणि प्रशांत राऊत यांनी एका वर्षासाठी सभापती पद भूषविले होते. त्यानंतर आता नववे स्थायी समिती सभापती म्हणून प्रवीण शेट्टी यांची निवड करण्यात आली आहे. माझ्या पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे. तो सार्थ करून दाखवण्याची जबाबदारी माझ्यावर आहे. तिजोरीच्या चाव्या नाही लोकांचा विश्वास आहे आमच्या जोडीला. गेल्या पाच साडे पाच वर्षात जी कामं रखडलेली आहेत. ती पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न असेल. त्यासाठी १६ सदस्य स्थायी समिती सदस्य आणि ११५ नगरसेवक मिळून काम करू. अर्थसंकल्प सादरीकरणाच्या दृष्टीनेही येत्या काळात बैठक घेऊन आढावा घेतला जाईल, असे नवनिर्वाचित स्थायी समिती सभापती प्रवीण शेट्टी यांनी सांगितले.

# ज्येष्ठ साहित्यिक रमाकांत पाटील यांना राज्यस्तरीय कथा लेखनात प्रथम क्रमांक



**वसई : वार्ताहर**

कोकण मराठी साहित्य परिषद, वसई शाखेने अलीकडेच राजस्तरीय कथालेखन स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत केळवे -पालघर येथील कोमसाप पालघर शाखेचे माजी अध्यक्ष, तथा प्रतिभासंपन्न कवी रमाकांत पाटील यांच्या ताडोबाचा वाघोबा कथेस प्रथम पुरस्कार जाहीर होऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. रमाकांत पाटील यांचे यापूर्वी दोन काव्यसंग्रह व एक कथासंग्रह प्रकाशित झाले आहेत. कोमसाप पालघर शाखेचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असताना २०२४-२०२५ सालातील उत्कृष्ट शाखा म्हणून कोमसाप पालघर शाखेची निवड करण्यात आली होती, अशी माहिती साहित्यप्रेमी प्रकाश वैद्य यांनी दिली. अशा त्यांच्या एकंदरीत सुयशाबद्दल चोहीकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# भिवंडीत शिवजयंतीनिमित्त भव्य मिरवणुक



**भिवंडी : वार्ताहर**

तिथी नुसार साजरी होणारी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्सव सोहळा व भव्य मिरवणूक भिवंडी शहरात उत्साहात साजरी करण्यात आली. भिवंडी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त दोन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी करण्यात आले होते. तर शुक्रवारी सायंकाळी भव्य मिरवणुकीचे आयोजन शहरातील छ. शिवाजी नगर ते छत्रपती शिवाजी महाराज चौक येथ पर्यत करण्यात आले होते. येथे महापौर नारायण चौधरी व पोलिस उपायुक्त शशिकांत बोराटे यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून या मिरवणुकीस प्रारंभ झाला. या मिरवणूकीत छत्रपती शिवाजी महाराज तसेच राजमाता जिजाबाई व इतर महापुरुषांच्या वेशभूषा साकारण्यात आल्या होत्या. तर युवकांचे दांडपट्टा पथक, ढोलताशा पथक हे सर्वांच्या आकर्षणाचे केंद्र बनले होते. यावेळी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने शिवप्रेमी पुरुष व महिला भगवे फेटे घालून सहभागी झाले होते.

# राष्ट्रीय विज्ञान दिनी रस्त्यावरील बालकांसाठी नेहरू विज्ञान केंद्राची सफर

**विरार : वार्ताहर**

आज रस्त्यावर दारिद्र्याच्या कारणाने वंचित अवस्थेत जीवन जगत असलेली बालके, उद्याच्या भारताचे नागरिक आहेत. त्यांना आनंददायी शिक्षणाची संधी आणि शिक्षणाचा हक्क मिळायला हवा, असे प्रतिपादन जीवन आनंद संस्थेने नेहरू विज्ञान सेंटर येथे आयोजित केलेल्या सहलीच्या पार्श्वभूमीवर बोलताना संस्थेचे अध्यक्ष संदिप परब यांनी केले. रस्त्यावर राहणाऱ्या बेघर वंचित बालकांच्या आयुष्यात आनंद आणि प्रेरणेचा क्षण निर्माण करत जीवन आनंद संस्थेतर्फे कार्यरत कार्व्हर डे सेंटरने राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विशेष अभ्यास सहलीचे आयोजन केले. नेहरू सायन्स सेंटर येथे संपन्न झालेल्या या सहलीला जाण्यासाठी बालकांनी जीवनात प्रथमच सांताक्रूझ ते नेहरू विज्ञान सेंटर असा भुयारी मेट्रो प्रवासाचा आनंद घेतला. जीवन आनंद संस्था रस्त्यावरील निराधार, बेघर वंचित बांधवांच्या पुनर्वसनासाठी तसेच त्यांना सन्मानाने जगता यावे यासाठी मुंबई, पालघर, सिंधुदुर्ग तसेच गोवा राज्यात आश्रम व शेल्टर होमच्या माध्यमातून कार्यरत आहे. मुंबईतील खाररोड येथे दारिद्र्यामुळे कुटुंबासह पदपथावर राहणाऱ्या नागरिकांच्या बालकांसाठी संस्था डे केअर सेंटर



चालवित आहे. राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या अभ्यास सहलीत कार्व्हर डे सेंटरमधील १७ बालकांनी तसेच संस्थेच्या मुंबई विभागातील कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला. विज्ञानाची गोडी निर्माण व्हावी आणि बालकांच्या जिज्ञासेला चालना मिळावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. नेहरू सायन्स सेंटरमध्ये बालकांनी विविध वैज्ञानिक प्रयोग, हाताळणीद्वारे शिकवणारे मॉडेल्स आणि विज्ञानाधारित खेळ अनुभवले. प्रत्यक्ष सहभागातून विज्ञान समजून घेताना त्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्सुकता स्पष्टपणे दिसून येत होती. या उपक्रमामुळे रस्त्यावरच्या वंचित बालकांना केवळ शैक्षणिक अनुभवच नव्हे तर समाजात आपणही तितकेच सक्षम आहोत, हा आत्मविश्वास देणारा सकारात्मक अनुभव मिळाला. जीवन आनंद संस्थेचे असे उपक्रम सामाजिक बांधिलकी जपत वंचित बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रेरणादायी ठरत आहेत. कार्व्हर डे सेंटरचे मिना पटेल, श्रेया घाडीगावकर, कविता कदम, गोविंद मार्गी, रूपेश गावडे यांची सहलीच्या संयोजनात मुख्य भूमिका राहिली. यात संस्थेचे विश्वस्त ॲड. किसन चौरे आणि प्रज्ञा राणे यांचा सहभाग होता.

# अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयात 'स्त्रियांची शतपत्रे' अभिवाचन कार्यक्रम

**वसई : वार्ताहर**

वसई येथील अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयाच्या महिला विकास कक्ष आणि अंतर्गत दर्जा हमी कक्ष (IQC) यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने स्त्रियांची शतपत्रे' हा साहित्यिक अभिवाचन कार्यक्रम शनिवार, दिनांक ७ मार्च रोजी महाविद्यालयात उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या उपस्थितीत आदरणीय तारामाई वर्तक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे औचित्य आणि प्रस्तावना महिला विकास कक्षाच्या समन्वयक प्रा. बीना पाटील यांनी मांडली. त्यांनी आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे महत्त्व सांगताना स्त्रियांच्या हक्क, समानता आणि स्वाभिमानाच्या लढ्याची ऐतिहासिक परंपरा अधोरेखित केली. प्राचार्य डॉ अरविंद उबाळे यांनीही महिला दिनानिमित्त महिला



सक्षमीकरणासंदर्भात विचारप्रवृत्त होण्याचा संदेश उपस्थितिदांना दिला. विलास पागार यांनी दिग्दर्शित केलेल्या या कार्यक्रमात १८५० ते १९५० या कालखंडातील स्त्रियांची मनोगते, आकांक्षा, कैफियती आणि विचार व्यक्त करणाऱ्या निवडक १५ पत्रांचे प्रभावी अभिवाचन सुमित्रा देवधर, दीपाली शहाणे, नमिता तेंडुलकर आणि नेहा किणी- सैंदाणे यांनी सादर केले. स्त्रीच्या अनुभवविश्वाला शब्दरूप देणाऱ्या या अभिवाचनाने उपस्थितांना भावनिक आणि विचारप्रवर्तक अनुभव दिला. अभिवाचन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागर रानडे यांनी केले. यावेळी महिला विकास कक्षातर्फे आयोजित विविध स्पर्धांतील यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके व प्रशस्तिपत्रके प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन प्रा. बीना पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. वैखरी नवेले यांनी केला करून दिला तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शैलेश औटी यांनी केले. महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी यांनी या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तसेच वसई आणि परिसरातील कला, साहित्य आणि नाट्यक्षेत्रातील नामवंतांनीही या कार्यक्रमाला आवर्जून हजेरी लावली.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानांतर्गत वसईत विविध ठिकाणी शिबिरांचे आयोजन

## नागरिकांनी व विद्यार्थ्यांनी शिबिरांचा लाभ घ्यावा -दीपक गायकवाड

**वसई : वार्ताहर**

महसूल विभाग अंतर्गत क्षेत्रीय स्तरावर ग्रामीण भागात सर्वसामान्य जनता शेतकरी विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी सत्वर निकाली काढणे तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील तालुक्यांमध्ये मंडळ स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान अंतर्गत वसई तालुक्यात नऊ ठिकाणी राजस्व शिबिराचे आयोजन केले आहे. या शिबिराचा तालुक्यातील नागरिक महिला, विद्यार्थी, जनता, शेतकरी यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन



वसई तहसीलदार दीपक गायकवाड यांनी केले आहे. महसूल विभागाच्या वतीने ७ मार्च ते १५ मे २०२६ या कालावधीत नऊ ठिकाणी ही शिबिरे भरविण्यात येणार असून नागरिकांनी या संधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन वसईचे तहसीलदार दीपक गायकवाड यांनी केले आहे. या शिबिरांमध्ये महसूल विभागाच्या एकूण १५ प्रकारच्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. यामध्ये प्रलंबित फेरफार, सातबारा उताऱ्यातील दुरुस्ती, डिजिटल सातबारा व ८-अ उतारा वाटप, उत्पन्न, जात व रहिवासी प्रमाणपत्र, नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्र, इत्यादी दाखले विद्यार्थ्यांना देणे. सनद प्रक्रियेची माहिती, सामाजिक अर्थसाहाय्य लाभ, अकृषिक तरतुदी मार्गदर्शन, तुकडेबंदी कायदा प्रकरणे, पानंद रस्ते मान्यता आदेश, घररपट्टे वाटप, मोजणी अर्ज, ग्रीस्टॅक व पीएम किसान नोंदणी, भूसंपादन नोंदी आदी सेवांचा समावेश आहे. पुढील ठिकाणी या शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. ७ मार्च रोजी महावीर धाम जैन मंदिर (शिरसाट) ...पान २ वर

# आयुक्त मनोज कुमार सूर्यवंशी यांचे अधिकाऱ्यांकडून अभिनंदन



**विरार : वार्ताहर**

वसई विरार शहर महापालिकेचे आयुक्त मनोज कुमार सूर्यवंशी यांना नुकताच मिळालेल्या 'सकाळ सन्मान २०२६' पुरस्कारानिमित्त गुरुवारी विरार पश्चिम येथील महानगरपालिका मुख्यालयात त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. या वेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे आणि दीपक सावंत यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान आयुक्त सूर्यवंशी यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले. उपस्थित अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यशैलीचे आणि शहराच्या विकासासाठी केलेल्या उपक्रमांचे कौतुक केले. या प्रसंगी महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उल्लेखनीय आहे की, बुधवारी वसई-विरार शहर महापालिकेचे आयुक्त मनोज कुमार सूर्यवंशी यांना सकाळ सन्मान २०२६ या प्रतिष्ठित पुरस्काराने गौरविण्यात आले. महाराष्ट्र सरकारचे मंत्री दादाजी भुसे आणि बृहन्मुंबई महापालिकेच्या प्रतिनिधी रीतु तावडे यांच्या हस्ते त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामुळे वसई-विरार महानगरपालिकेचा आणि शहराचा गौरव वाढल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## निसर्ग किमया काव्यसंग्रहाचे दिमाखात प्रकाशन

# निसर्गाला देखील संघर्ष करावा लागत असतो -कवियत्री स्नेहा पंडित



**वसई : वार्ताहर**

कवितेचे खरे सौंदर्य खुलते ते शब्दालंकारांनी, निसर्ग म्हणजे शाश्वत चमत्कार आहे. निसर्गात रमणाऱ्या या सखीत मुळात असणारा भाबडा जीव हाच काव्याचा आत्मा आहे. त्यामुळेच त्यांच्या कवितेचा चेहरा निसर्गाचा होऊन बोलतो. निसर्गाला देखील संघर्ष करावा लागत असतो अशा शब्दात निसर्ग किमया हा काव्यसंग्रहाचे कवियित्री स्नेहा संदीप पंडित यांनी व्यासपीठावरून आपले विचार मांडले. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त वसई माणिकपूर येथील समाजउन्नती सभागृह येथे साहित्य जल्लोष प्रतिष्ठान, समाज उन्नती मंडळ संचलित मनोहर वाचनालय विभाग यांच्यावतीने जागर मराठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कवियित्री स्नेहा संदीप पंडित यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन दूरदर्शन सह्याद्री वाहनाच्या वृत्तनिवेदिका दीपाली केळकर यांच्या हस्ते निसर्ग किमया काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले यावेळी साहित्यिक अँड्रयू कोलासो, स्थायी समितीचे माजी सभापती संदेश जाधव, फा. ज्यो आल्मेडा, डिंपल पब्लिकेशनचे अशोक मुळे, यार्देना सानकर (इस्रायल), उपमहापौर प्रकाश रॉड्रिग्ज, नगरसेवक कल्पेश मानकर, अजय रॉड्रिग्ज, नगरसेविका पुष्पा जाधव, प्रमिला पाटील, सुवर्ण पाटील, मार्शलीन चाको वर्जेश सोलंकी, मुस्कान चुहीकर, वसई तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप पंडित यांच्यासह मोठ्या संख्येने साहित्यिक, लेखक, कवी तसेच वाचक प्रेमी उपस्थित होते. कविता वाचकांसमोर मांडताना त्यांनी 'पर्यावरण' या विषयाला अधोरेखित करत समाजातील ज्वलंत विषयाला निसर्ग किमया या काव्यसंग्रहातून कवियित्री स्नेहा पंडित यांनी समाजासमोर आणले आहे. कवियित्री पंडित पुढे म्हणाल्या की, कविता करताना प्रथम वाचन महत्वाचे आहे.निसर्गाची किमया काव्यसंग्रहातून निसर्गाची बारीकसारीक हालचाल ,हिरवळीचा साज, वादळात देखील आम्ही तग धरून आहोत मग माणसा तू का घाबरतो, निसर्ग आपल्याला भरभरून देतो मात्र प्राणी, झाडेझुडपे, निसर्ग साऱ्यांनाच संघर्ष करावा लागतो अशा अनेक विषयांवर अनेक कविता केल्या आहेत पृथ्वीच्या श्वास असलेल्या हिरव्या छटांचा जिवंतानुभव या काव्यसंग्रहातून मांडण्यात आला ...पान २ वर

# अंतरराज्यीय युवा आदान-प्रदान कार्यक्रमात सेलिना डी'सूझाने केले महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व



**वसई : वार्ताहर**

वसई तालुक्यातील सेलिना डी'सूझा हिने अंतरराज्यीय युवा आदान-प्रदान कार्यक्रमात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले आहे. पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्यातील रहिवासी सेलिना डी'सूझा हिने भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयांतर्गत 'मेरा युवा भारत (MY Bharat)' उपक्रमाअंतर्गत आयोजित प्रतिष्ठित अंतरराज्यीय युवा आदान-प्रदान कार्यक्रमात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. हा कार्यक्रम झारखंड राज्यातील जमशेदपूर येथे पार पडला. या उपक्रमाद्वारे सेलिनाने सांस्कृतिक आदान-प्रदान, नेतृत्व विकास सत्रे तसेच विविध युवा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवला. या कार्यक्रमामुळे तिला भारताच्या विविध संस्कृतींचा अनुभव घेण्याची तसेच राष्ट्रीय एकात्मता दृढ करण्याची संधी मिळाली. तिची ही कामगिरी पालघर जिल्ह्यातील युवकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.